सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | शनिवार, १५ मार्च २०२५ । युगाब्द ५१२६ । वर्ष ४१ वे अंक १२६ । पाने १२ । किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

# सोलापुरात बर्ड फ्लूचा शिरकाव

- शहरात १२ कावळे, २ घार, १ बगळा मृत्युमुखी
- शहरातील तीन ठिकाणे २१ दिवस प्रतिबंधित
- लोकांना कोणतीही भीती नाही मात्र दक्षता घ्यावी





**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ मार्च-**

सोलापूर शहरात विविध ठिकाणी बारा कावळे, दोन घार व एक बगळा मृत्युमुखी पडल्याची घटना घडली. दरम्यान, याचा तपासणी अहवाल प्राप्त झाला असून एच ५ एन १ बर्ड फ्लूमुळे त्या पक्षांचा मृत्यू झाला असल्याचे स्पष्ट झाले आहे. आरोग्य प्रशासन सर्वच पातळीवर सज्ज झाले आहे. या पक्षाच्या आजाराची लोकांना लागण होऊ शकणार नाही मात्र नागरिकांनी दक्षता घेण्याची गरज आहे. यामुळे शहरातील विविध तीन ठिकाणे २१ दिवस प्रतिबंधित करण्यात आले आहेत.

पार्क चौपाटी नजीक असलेल्या किल्ला खंदकबाग, श्री सिद्धेश्वर तलाव परिसर आणि धर्मवीर संभाजी महाराज तलाव (कंबर तलाव) या तिन्ही ठिकाणी जिल्हा पशुसंवर्धन विभागाचे उपायुक्त डॉ. विशाल येवले, सहाय्यक आयुक्त डॉ. भास्कर पराडे आणि महापालिकेचे पशु शल्य चिकित्सक डॉ. सतीश चौगुले यांनी आज दुपारी साडेबाराच्या सुमारास प्रत्यक्ष पाहणी केली. संबंधित विभागाच्या कर्मचाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या.सोलापूर शहरातील धर्मवीर संभाजी महाराज तलाव या ठिकाणी बारा कावळे मृत्युमुखी पडल्याचे वन विभागाने पशुवैद्यकीय चिकित्सालय विभागाला कळविले. ९ मार्च रोजी ही घटना घडली. १२ मृत कावळे वन विभागाने पशु चिकिस्तालयात जमा केले होते.

तसेच दोन घार व एक बगळा पक्षीही अचानक मृत्युमुखी पडले होते. तत्पूर्वी सहा मृत कावळे ९ मार्चपूर्वी जमा करण्यात आले होते. त्यांचे शवविच्छेदन केले. त्यावरून हिट स्ट्रोक मुळे किंवा विषबाधेमुळे मृत्यू झाला असेल असा प्राथमिक अहवाल जिल्हा आयुक्तांना पाठवला होता. त्यानंतर ९ मार्चला मृत पाच पक्षीचे नमुने पुण्यात तपासणीसाठी पाठवण्यात आले. नुकताच भोपाळ येथील हाय सिक्युरिटी निमल डिसीज प्रयोगशाळेतून त्याचा अहवाल प्राप्त झाला आहे. जवळपास ३४ नमुने तपासणीसाठी पाठविले होते. सर्व नमुने एच५ एन १ या व्हायरसने पॉझिटिव्ह आढळले आहेत. त्यामुळे काल जिल्हा पशुवैद्यकीय सर्वच चिकित्सालय विभागाचे उपायुक्तांनी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांना ही माहिती दिली. त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयाने नोटिफिकेशन काढले. सर्व संबंधित विभागांना सतर्क राहण्याचे आदेश दिले आहेत, अशी माहिती डॉ. भास्कर पराडे यांनी दिली. वन्य पक्षांमध्ये बर्ड फ्लूचा अहवाल पॉझिटिव्ह आला आहे पण घरगुती कोंबड्या, बदके किंवा इतर पक्षी यांना कोणताही आजार अथवा लागण झाल्याचे निदर्शनास आले नाही. कुक्कुटपालन केंद्र येथेही एक ही मृत्यू आढळला नाही. घरगुती पक्षाचे सुमारे ५० नमुने संकलित केले. ते पुण्यातील प्रयोगशाळेत पाठविण्यात आले आहेत. येथे चार दिवसात त्याचा अहवाल प्राप्त होणार आहे. जर घरगुती पक्षात बर्ड फ्लू पॉझिटिव्ह आढळला तर ० ते १ किलोमीटर परिसर प्रतिबंधित करण्यात येणार आहे. दरम्यान, शास्त्रीय पद्धतीने मृत पक्ष्यांची विल्हेवाट लावली जाणार आहे. प्राथमिक खबरदारी घेतली जात आहे. संबंधित तिन्ही ठिकाणी स्वच्छता आणि औषध फवारणी केली जात आहे.

### २१ दिवस तीन परिसर प्रतिबंधित : डॉ. चौगुले

हे तिन्ही परिसर अलर्ट झोन म्हणून जाहीर केले आहेत. लोकांना येण्यास प्रतिबंध केला आहे. २१ दिवस हा परिसर प्रतिबंधित करण्यात आला आहे. लोकांनी घाबरू नये. वन्य पक्षांच्या आजाराची लागण मनुष्यास होत नाही. लोकांनी घाबरून न जाता आवश्यक ती दक्षता घ्यावी, असे आवाहन महापालिकेचे पशु शल्य चिकित्सक डॉ. सतीश चौगुले यांनी केले आहे.

### खंदक बागेसह पार्क चौपाटीवरही मृत कावळे

दरम्यान आज विविध प्रशासकीय विभागाच्या अधिकाऱ्यांनी खंदक बाग परिसराची दुपारी साडेबाराच्या सुमारास पाहणी केली. यावेळी खंदक बागेत तीन आणि पार्क चौपाटी परिसरात एक कावळा मृत आढळून आला. पार्क चौपाटी परिसरात मृत कावळ्याच्या शेजारीच चायनीज गाड्यावर पदार्थ बनविण्याचे काम सुरू होते. वर्दळही तशीच होती. मृत कावळा उचलण्याची कार्यवाही झाली नव्हती.

### नागरिकांनी अंडी आणि कोंबडीचे मांस उकळून खावे : डॉ. पराडे

नागरिकांनी घाबरून जाण्याचे कारण नाही. शंभर वर्षांमध्ये पक्षापासून मानवास आजार झाल्याचे अद्यापही आढळून आलेले नाही. तरीही नागरिकांनी अंडी आणि कोंबडीचे मांस उकळून खावे. उकळलेल्या पाण्यात १०० अंश सेल्सिअस तापमान असते. त्यात कुठलाही व्हायरस (जंतू ) जिवंत राहत नाही. त्यामुळे कोणताही धोका मानवी जीवास नाही. दुकानदारांनी कोंबड्यात आजार आढाळल्यास माहिती द्यावी.दुकानदारांचाही सर्व्हे केला असता अद्याप कोंबड्यांचा आजार आढळला नाही. नागरिकांनी घाबरू नये मात्र दक्ष रहावे, असे आवाहन जिल्हा पशुवैद्यकीय चिकित्सालय सोलापूरचे सहाय्यक आयुक्त डॉ. भास्कर पराडे यांनी केले आहे.

### चार दिवसात प्रयोगशाळेचा अहवाल प्राप्त होईल : उपायुक्त डॉ. येवले

वन्य पक्षांना बाधित झालेला हा बर्ड फ्लू आजार माणसांमध्ये जाऊ शकत नाही. संबंधित तीन ठिकाणचा परिसर प्रतिबंधित करण्यात आले आहे. सध्या अलर्ट झोन मध्ये आहे. चार दिवसात पुणे येथील प्रयोगशाळेचा अहवाल प्राप्त होईल. जर घरगुती कोंबड्यात आजार आढळला तर पुढील नियमानुसार कार्यवाही करण्यात येणार आहे. क्शन प्लॅन नुसार सर्व दक्षता घेण्यात येत आहे. कुठे मृत पक्षी आढळल्यास नागरिकांनी पशु शल्य चिकित्सालय विभाग, वन विभाग आणि महापालिका प्रशासनाला कळवावे, असे आवाहन जिल्हा परिषद संवर्धन विभागाचे उपायुक्त डॉ. विशाल येवले यांनी केले आहे.

### तिन्ही ठिकाणी केली औषध फवारणी

सोलापूर शहरातील किल्ला खंदकबाग, श्री सिद्धेश्वर तलाव येथील गणेश घाट परिसर, विजापूर रोडवरील धर्मवीर संभाजी महाराज तलाव बोटिंगचा परिसर आदी तीन ठिकाणी महापालिका आरोग्य प्रशासनाकडून औषध फवारणी करण्यात आली आहे. या भागात २ टक्के सोडियम हायपोक्लोरेट, दोन टक्के पोटॅशियम परमॅग्नेट या द्रावणाची फवारणी फवारणी करून परिसर निर्जंतुकीकरण केला आहे. महापालिकासह विविध संबंधित प्रशासकीय विभाग सर्व पातळीवर सज्ज आहे. सर्व परिसर परिसराची स्वच्छता केली, अशी माहिती महापालिकेचे पशु शल्य चिकित्सक डॉ. सतीश चौगुले यांनी दिली.

# महाराष्ट्रासह राजस्थान व गुजरातमध्ये उष्णतेची लाट



**तभा वृत्तसेवा,**
**नागपूर, दि. १४ मार्च-**

महाराष्ट्रासह राजस्थान आणि गुजरातमधील अनेक जिल्ह्यात उष्णतेची लाट तीव्र झाली आहे. महाराष्ट्रात सर्वाधिक ४२ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद ब्रम्हपुरी या शहरात झाली. तर अनेक शहरांमध्ये तापमान ४०, ४१ अंश सेल्सिअसच्या पुढे आहे. गुजरात व राजस्थानमधील अनेक शहरांमध्ये तापमानाने ४० अंश सेल्सिअसचा टप्पा ओलांडला आहे.

महाराष्ट्र, गुजरात आणि राजस्थानमधील १७ शहरांमध्ये सलग दुसऱ्या दिवशी कमाल तापमान ४० अंश सेल्सिअसपेक्षा जास्त नोंदवले गेले. गुरुवारपासून गुजरात व लगतच्या राजस्थान आणि पश्चिम किनारपट्टीच्या कोकण भागात तापमानात घट होण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली असली तरी उष्णतेची लाट कायम राहणार आहे. महाराष्ट्रात विदर्भात १४ मार्चपर्यंत, ओडिशात १६ मार्चपर्यंत, झारखंडमध्ये १६ मार्चपर्यंत आणि पश्चिम बंगालमध्ये १८ मार्चला तीव्र उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. तर पुढील आठवड्यात मध्यप्रदेशात देखील उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे. दरम्यान, गुजरात, महाराष्ट्र, गोवा, पश्चिम राजस्थान यासह संपूर्ण पश्चिम भारतातही पुढील चार ते पाच दिवसांत दोन ते तीन अंशांनी घसरण होण्याची शक्यता आहे. तर छत्तीसगडसह मध्य भारतातील कमाल तापमानात पुढील तीन दिवसांत किमान दोन अंश सेल्सिअसने वाढ होण्याची शक्यता आहे आणि त्यानंतर तापमान स्थिर राहील. बिहार, झारखंड, पश्चिम बंगाल आणि ओडिशासह पूर्व भारतात कमाल तापमान किमान पाच अंशांनी वाढण्याची शक्यता आहे. पंजाब, हरियाणा, दिल्ली, राजस्थान, उत्तरप्रदेश आणि बिहारमध्ये पुढील आठवडाभरात जोरदार वारे आणि धुळीचे वादळ येण्याची शक्यता आहे. दक्षिणेतील तेलंगणामध्ये बुधवारी सलग दुसऱ्या दिवशी उष्णतेची लाट होती. १८ मार्चपर्यंत ही स्थिती कायम राहणार आहे. मध्य भारतातील छत्तीसगडमध्ये तीन दिवसात तापमान दोन अंशांने वाढण्याची शक्यता आहे.

### सोलापुरात तापमानाचा पारा ४१ अंशांवर

सोलापुरात बुधवारी होळीच्या दिवशी होळी पेटत असताना तापमानाचा पारा ४१.१ अंश सेल्सिअसवर पोहोचला. यंदाच्या उन्हाळ्यात सुरूवातीलाच तापमान चाळिशी पार करून पुढे गेल्यामुळे सोलापूरकरांची अस्वस्थता वाढली आहे. किमान तापमान २४.२ अंश इतके नोंदले गेले आहे. यंदा फेब्रुवारीपासूनच उन्हाच्या झळा चांगल्याच जाणवत आहेत. ३५ अंशाच्या खाली नसलेला तापमनाचा पारा हळूहळू चाळिशीच्या दिशेने सरकत होता. त्याप्रमाणे बुधवारी ४१ वर तापमानाची नोंद झाली आहे.

# काँग्रेसची एकनाथ शिंदे व अजित पवारांना थेट मुख्यमंत्रिपदाची ऑफर



**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि. १४ मार्च-**

काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष व आमदार नाना पटोले यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांना थेट मुख्यमंत्रिपदाची ऑफर दिली आहे. आमच्याकडे या, आम्ही तुम्हाला पाठिंबा देऊ, असे पटोले यांनी म्हटले आहे. नाना पटोले यांनी शिंदे व पवार या दोघांना मुख्यमंत्रिपदाची खुली ऑफर दिली आहे. आता यावर महायुतीच्या नेत्यांकडून काय प्रतिक्रिया येते हे पाहणे औत्सुक्याचं ठरणार आहे. एकनाथ शिंदे आधीच्या सरकारमध्ये मुख्यमंत्री होते. त्यांची नव्या सरकारचं नेतृत्व करण्याची इच्छा होती. तसेच अजित पवारांना मुख्यमंत्री होण्याची इच्छा आहे. याच पार्श्वभूमीवर नाना पटोले यांनी हे वक्तव्य केलं आहे.

नाना पटोले यांनी एका वृत्तवाहिनीशी बातचीत केली. यावेळी त्यांनी राज्यातील जनतेला होळीच्या शुभेच्छा दिल्या. ते म्हणाले, आपण सर्वजण होळीचा सण हसत खेळ साजरा करतो. मी राज्यातील जनतेला होळीच्या शुभेच्छा देतो. तसेच मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना देखील शुभेच्छा देतो. त्यांनी राज्यासाठी लढावे असे मला वाटते. पूर्वी ते भूमिका घ्यायचे आताही तशीच भूमिका घ्यावी, यासाठी मी शुभेच्छा देतो.

दरम्यान, पटोले यांना यावर विचारण्यात आलं की तुम्ही दोन उपमुख्यमंत्र्यांना म्हणजेच एकनाथ शिंदे व अजित पवार यांना काय शुभेच्छा देणार? त्यावर पटोले म्हणाले, त्या दोघांची गत फार वाईट आहे. आपल्या पक्ष टिकेल की नाही अशी त्यांची अवस्था आहे, किंवा त्यांच्या मनात भीती आहे. ही भारतीय जनता पार्टी त्यांना जगू देणार नाही. कारण भाजपाची ती सवयच आहे. देशात त्यांनी जिथे-जिथे, ज्या-ज्या पक्षांबरोबर युती केली त्या सर्वांना भाजपाने संपवून टाकलं. आता तुम्ही पाहतच आहात की भाजपाने एकनाथ शिंदे यांच्या सर्व योजना बंद केल्या आहेत. त्यामुळे मला वाटतं की आता एकनाथ शिंदे व अजित पवार या दोघांनी सतर्क व्हायला हवे. आम्ही त्यांच्याबरोबर आहोतच. आम्ही त्यांना पाठिंबा देऊ. आम्ही त्यांना मुख्यमंत्री करू. त्या दोघांचीही तशी इच्छा आहे. अजित पवार यांना मुख्यमंत्री होण्याची ओढ लागली आहे. त्यामुळे आम्ही एकाला काही दिवस आणि दुसऱ्याला काही दिवस असे दोघांनाही मुख्यमंत्री बनवून टाकू, असे पटोले म्हणाले.

### भगवा रंग ज्याला आवडेल त्यांनी आमच्याबरोबर यावे; उपमुख्यमंत्री शिंदेंनी नाना पटोलेंना दिले प्रत्युत्तर

भगवा रंग ज्याला आवडेल त्यांनी आमच्याबरोबर यावं, उपमुख्यमंत्री शिंदे यांचे विधान, नाना पटोलेंनाही दिले प्रत्युत्तर काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष व आमदार नाना पटोले यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांना थेट मुख्यमंत्रिपदाची ऑफर दिली आहे. आमच्याकडे या, आम्ही तुम्हाला पाठिंबा देऊ, असे पटोले यांनी म्हटलं आहे. नाना पटोले यांनी शिंदे व पवार या दोघांना मुख्यमंत्रिपदाची खुली ऑफर दिली आहे. आता यावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

# आयआयटीनंतर आता मुंबईत आयआयसीटी

## मुख्यमंत्री फडणवीसांची घोषणा; ४०० कोटी मंजूर

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि. १४ मार्च-**



आयआयटी अर्थात इंडियन इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजीच्या देशभरातील संस्थांमध्ये मोठ्या प्रमाणावर दरवर्षी विद्यार्थी प्रवेश घेत असतात. पण आता आयआयटीबरोबरच आयआयसीटी देखील देशभरात शिक्षण क्षेत्रात नव्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी सज्ज झाली आहे. विशेष म्हणजे पहिली आयआयसीटी संस्था मुंबईत उभारली जाणार असून त्यासाठी गोरेगावमधील फिल्म इंडस्ट्रीत जागा उपलब्ध करून दिली जाणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

मुंबईत १ ते ४ मे २०२५ दरम्यान मुंबईतल्या जिओ कन्व्हेन्शन सेंटरमध्ये 'वर्ल्ड ऑडिओ-व्हिज्युअल अँड एंटरटेन्मेंट समिट २०२५ अर्थात वेव्हज २०२५' या परिषदेचं आयोजन करण्यात आलं आहे. यासंदर्भातल्या प्राथमिक सत्राचं आयोजन दिल्लीतील सुषमा स्वराज भवन येथे करण्यात आलं होतं. यावेळी देवेंद्र फडणवीस बोलत होते. मुंबईत उभारल्या जाणाऱ्या आयआयसीटीसंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी यावेळी सविस्तर भाष्य केलं. यानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना त्यांनी या नव्या संस्थेची माहिती दिली. या संस्थेच्या माध्यमातून मुंबईला जागतिक स्तरावरील 'क्रिएटिव्ह हब' बनवण्याचा सरकारचा मानस असून केंद्र सरकारकडून या संस्थेच्या उभारणीसाठी ४०० कोटींची आर्थिक सहाय्यता दिली जाणार आहे. फक्त महाराष्ट्रच नव्हे, तर संपूर्ण देशाच्या क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजी क्षेत्रासाठी हा उपक्रम मैलाचा दगड ठरेल, असे फडणवीसांनी स्पष्ट केले. याशिवाय, आयआयसीटीमधील समाविष्ट बाबींची फडणवीसांनी माहिती दिली. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजी, ही संस्था केवळ चित्रपट निर्मितीपर्यंत मर्यादित न राहता इथे डिजिटल कंटेंट, व्ही. एफ. एक्स, ॲनिमेशन, ऑडिओ-व्हिज्युअल स्टोरीटेलिंग, मीडिया इनोव्हेशन आणि वेब ३.० तंत्रज्ञान अशा क्षेत्रांमध्ये संशोधन व प्रशिक्षण देण्यात येईल. आयआयटी मुंबईप्रमाणेच ही नवी संस्था क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजीसाठी देशातलं सर्वोत्तम केंद्र बनेल, असं मुख्यमंत्री म्हणाले.

### बॉलिवुडपाठोपाठ आयआयसीटी मुंबईची ओळख बनणार!

दरम्यान, बॉलिवुडपाठोपाठ आयआयसीटीमुळे क्रिएटिव्ह इंडस्ट्रीला मुंबईत जागतिक दर्जाचं व्यासपीठ मिळणार असल्याचं फडणवीसांनी यावेळी नमूद केलं. दावोस ज्याप्रमाणे आर्थिक क्षेत्रासाठी महत्त्वाचं आहे, त्याचप्रमाणे हे व्यासपीठदेखील क्रिएटिव्ह तंत्रज्ञान क्षेत्रासाठी जागतिक ब्रँड तयार करणारे ठरेल, असा विश्वास देवेंद्र फडणीसांनी व्यक्त केला आहे.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त

### भानामती काढण्याच्या बहाण्याने दागिने लंपास करणारे अटकेत

**सोलापूर, दि. १४ मार्च-**

यलगुलवार प्रशालेजवळील आकांक्षा सोसायटीत भानामती काढण्याच्या बहाण्याने पावणेदोन लाखाचे दागिने लंपास केले. हे आरोपी सराईत असून ते चोरी करून दिल्ली येथे जाण्याच्या तयारीत असताना पथकाने केवळ एक तासाच्या आत ताब्यात घेत मुद्देमाल हस्तगत केला.

**सदर बझार पोलिसांची कामगिरी**

याबाबत रेखा तानाजी हेबळे (वय ४५, रा. आकांक्षा सोसायटी) यांनी सदर बाजार पोलिसात फिर्याद दिली होती. बुधवारी सायंकाळी सहाच्या सुमारास एक महिला व पुरुष त्यांच्या घराजवळ आले. त्यातील महिलेने घरात येऊन तुमच्या घरात पूजा करते, सर्व करणी भानामती काढते, असे सांगून पूजा करण्याचा बहाना केला. त्यानंतर त्यांच्या जवळील एक लाख ७६ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने तिने आणलेल्या पणत्यामध्ये पूजे करता ठेवायला सांगितले. तसेच घरात वेगवेगळ्या ठिकाणी पणत्या लावण्यात फिर्यादीला गुंतवून दागिने लंपास केले होते. याबाबत गुन्हा दाखल होताच महिलेच्या वर्णनावरून रेल्वे स्थानक परिसरात शोध घेतला त्यावेळी रात्री साडेनऊच्या सुमारास त्या ठिकाणी ती महिला व पुरुष आढळून आले. त्यांना ताब्यात घेऊन विचारपूस केली. चौकशीत त्यांनी गुन्हा कबूल केला. नगीना मो. आरीफ (वय ३७ राम पार्क गाजियाबाद) व हाबीद रसीद (वय ५५, रा मोहन नगर गाजियाबाद उत्तर प्रदेश) अशी त्यांची नावे आहेत. त्यांच्याकडून चोरीस गेलेले तीन ग्रामचे सोन्याचे गंठण, दहा ग्रॅमचे सोन्याचे नेकलेस व अडीच ग्रॅमची अंगठी तर साडेसहा तोळ्याचे झुमके असा ऐवज जप्त केला आहे. ही कारवाई पोलिस आयुक्त एम. राज कुमार, उपायुक्त विजय कबाडे, सहाय्यक पोलीस आयुक्त यशवंत गवारी, पोलीस निरीक्षक अजित लकडे, भालचंद्र ढवळे यांच्या मार्गदर्शनाखाली डीबी पथकाचे फौजदार नितीन शिंदे, सहायक फौजदार औदुंबर आटोळे, पोलीस अंमलदार संतोष पापडे, शहाजान मुलाणी, सागर सरतापे, राजेश चव्हाण ज्योती बेटकर, सागर गुंड, सोमनाथ सुरवसे, अनमोल लट्टे, उमेश चव्हाण, हनुमंत पुजारी, राम भिंगारे, परशुराम म्हेत्रे यांनी केली.

### चक्कर येऊन पडल्याने एकाचा मृत्यू

**सोलापूर, दि. १४ मार्च-**

भैय्या चौकातील स्वाद दालचावल येथे नाष्टा केल्यानंतर अचानक चककर येऊन पडल्याने बेशुध्द झालेल्या व्यक्तीचा मृत्यू झाला. हा प्रकार गुरुवारी सकाळी ७.३० वाजता घडला. सुरेश नागय्या सांगे (वय ४६, रा. दक्षिण सदर बझार) असे मृत व्यक्तीचे नाव आहे. सुरेश हे गुरुवारी सकाळी भैय्या चौकात कामानिमित्त गेले होते. त्यांनी तेथील स्वाद या दालचावल विक्री करण्याच्या ठिकाणी नाष्टा केला. यानंतर त्यांनी पाणी पिल्यानंतर त्यांना चक्कर आल्याने त्यांची शुध्द हरपली. त्याच अवस्थेत भाऊ जयराज यांनी सकाळी ९.१० वाजता शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केले. परंतु उपचारापूर्वीच ते मृत पावल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. या घटनेची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### शौचास गेलेल्या व्यक्तीचा रेल्वे धडकेत मृत्यू

**सोलापूर, दि. १४ मार्च-**

हत्तुरे वस्तीजवळील रेल्वे ट्रॅकजवळ शौचास गेलेल्या व्यक्तीचा रेल्वेच्या धडकेंत मृत्यू झाला. हा प्रकार ८ मार्च रोजी रात्री आठ वाजता घडला होंता. उपचारादरम्यान शुक्रवार सकाळी ८.४५ वाजता ते मृत पावले. भिमाशंकर मळसिध्द विरसुर (वय ४०, रा. लक्ष्मी नगर, हत्तुरे वस्ती) असे मृत व्यक्तीचे नाव आहे. हत्तुरे वस्तीपासून काही अंतरावर रेल्वे ट्रॅक आहे. या परिसरात भिमाशंकर हे आठ मार्चच्या रात्री आठच्या सुमारास शौचास गेले होते. त्यादरम्यान रेल्वे ट्रॅक ओलांडत असताना रेल्वे गाडीचा कट लागला. त्यात डोकयाला गंभीर जखम व डाव्या हाताला मार लागल्याने त्यांची शुध्द हरपली होती. रात्री १० वाजता पत्नी कविता यांनी उपचारास शासकीय रुग्णालयात दाखल केले होते. उपचारादरम्यान १४ रोजी सकाळी ८.४५ वाजता त्यांचा मृत्यू झाला.

### तरुणाचा श्वास घेण्यास त्रास झाल्याने मृत्यू

**सोलापूर, दि. १४ मार्च-**

मोहोळ तालुक्यातील वडवळ येथील तरुणाचा दम लागून श्वास घेण्यास त्रास झाल्याने मृत्यू झाला. हा प्रकार शुक्रवारी सकाळी १०.३० वाजता घडला. अजय संजय शिवपुजे (वय ३९, रा. वडवळ ता. मोहोळ) असे तरुणाचे नाव आहे. शुक्रवारी अजय यास वडवळ येथील राहते घरात दम लागून श्वास घेण्यास त्रास होऊ लागला. यातच त्याची शुध्द हरपल्याने त्यास मामा बसवराज तोडकरी यांनी सकाळी १०.३० वाजता शासकीय रुग्णालयात दाखल केले. परंतु उपचारापूर्वीच तो मृत पावल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. या घटनेची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### विडी घरकुलमधील ८६ वर्षीय वृध्द बेपत्ता

**सोलापूर, दि. १४ मार्च -**



शहरातील नरसिंह विडी घरकुल परिसरात विठ्ठलराव दत्तात्रय गोसकी हे ८६ वर्षीय वृध्द १० मार्चपासून बेपत्ता झाले आहेत. गोसकी हे १० मार्च रोजी सकाळी सात वाजता नेहमीप्रमाणे प्रभात फेरीसाठी गेले होते. ते परत घरी आले नाहीत. त्यांचा सर्वत्र शोध घेतला, परंतु ते परत आलेले नाहीत. त्यामुळे त्यांचा मुलगा गणेश गोसकी यांनी एम आयडीसी पोलिस ठाण्यात विठ्ठलराव गोसकी यांच्या बेपत्ताबाबत माहिती दिली आहे. पोलिस हवालदार दीपक डोके तपास करीत आहेत. गोसकी यांच्याबद्दल कोणालाही काहीही माहिती मिळाल्यास त्यांनी एमआयडीसी पोलिसांशी संपर्क साधण्याचे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

### महामानव डॉ. आंबेडकर ट्रेड युनियनचे अतिरिक्त आयुक्तांना निवेदन

**सोलापूर, दि. १४ मार्च-**

महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर ट्रेड युनियनच्या वतीने महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. महापालिका घनकचरा व्यवस्थापन विभागाकडून दैनंदिन साफसफाईचे काम प्रचलित वेळेनुसार सकाळी ६ ते दुपारी २ या वेळेत होत असते. सध्या सोलापूर शहरात कडक उन्हाळा चालू असून उन्हात कर्मचाऱ्यांना काम केल्यामुळे आरोग्यास त्रास होतो. अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांनी काढलेल्या परिपत्रकानुसार पहाटे ५:३० ते दुपारी १:३० अशी वेळ असून या वेळेमध्ये आपण बदल करून सकाळी ६ ते दुपारी १२:३० पर्यंत ही वेळ करावी. घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील कायम व बदली रोजंदारी कर्मचाऱ्यांना प्रत्येक वर्षी प्रमाणे महिला झाडूवाली यांना दोन साड्यांचे वाटप करावे. बदली रोजंदारी कर्मचारी, सफाई कर्मचारी यांना खाकी रंगाचा ड्रेस व शिलाई भत्ता मिळावा. सोमपा व घनकचरा व्यवस्थापन विभाग कडील वर्ग चारच्या कर्मचाऱ्यांना कामाचे साहित्य वाटप करावे आदी मागण्यांचा समावेश आहे.

---

**आकाश खुर्द हत्या प्रकरण**

# प्रेमप्रकरणाची किनार; प्रेयसी तिचा पती व इतर एकजण ताब्यात

**तभा वृत्तसेवा**
**पिलीव दि १४ मार्च-**



माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील आकाश अंकुश खुर्द या युवकाचा सोमवारी रात्री अतिशय निर्घृणपणे खुन करुन पिलीव-चांदापुरी रस्त्यावरील वनविभागाच्या हद्दीत नग्न अवस्थेत मृतदेह फेकुन दिला होता. माणुसकीला काळीमा फासणाऱ्या या घटनेने अक्षरशः महाराष्ट्र हादरला कारण आकाशच्या शरीरावर एवढे विचीत्र चटके दिले होते तसेच गुप्तांग कापले होते. तोंडात सुद्धा सळ ईचे चटके दिले होते. एवढया विचीत्र पद्धतीने आकाशची हत्या केल्यामुळे खरेतर हे माणुसकीला काळीमा फासणाऱ्या या घटनेचा तपास करणे पोलीसांपुढे एक मोठे आवाहन होते.

सोमवारी रात्री उशीरा आकाशला आलेल्या फोनमुळे या हत्येला वाचा फुटली. चांदापुरी येथील एका महीलेचे व आकाशचे गेल्या पाच-सहा वर्षापासुन प्रेम संबंध होते. त्याचे येणे जाणे, फोनवरुन बोलणे, सोशल मीडियावरुन बोलणे सुरू होते.यामुळे एवढया रात्री आपल्या प्रियसीचा फोन आला म्हटल्यावर आकाश आपल्या आई व पत्नीला मी दहा मिनिटात परत येतो म्हणून गेला तो लवकर परत येईणा म्हटल्यावर आईने रात्री खुप उशीरा फोन केला पण तो फोन उचलतच नव्हता. प्रियसीच्या मदतीनेच आकाशला त्याठिकाणी बोलावुन नवरा व इतर नातेवाईकाच्या मदतीने अमानुषपणे हत्या करणयात आली. वनविभागाच्या हद्दीत नग्न अवस्थेत मृतदेह फेकुन दिला. शेजारीच त्याची मोटारसायकल होती. मंगळवारी सकाळी मेटकरी मळा येथील लोकांनी हा मृत्यदेह पाहुन पोलीस स्टेशनला खबर दिली तसेच याच वेळ यश चोरमले याने आकाशच्या आईला खबर दिली. यावेळी पोलीसांनी रितसर पंचनामा करुन व माळशिरस येथे शवविच्छेदन करुन रात्री उशीरा मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात दिला. यानंतर पोलीसांनी तपासची सत्रे अतिशय वेगाने फिरवली. यामध्ये प्रियसीने केलेल्या फोनवरुन बराच उलगडा झाला. यामध्ये एक अल्पवयीन मुलगा, प्रियसी हिला पोलीसांनी ताब्यात घेतले तर तिचा नवरा फरार होता. मात्र, बुधवारी रात्री पोलीसांनी त्याच्या मुसक्या आवळल्या व त्याला ताब्यात घेतले. यामुळे आता या हत्येच्या मागे इतर कोण कोण सामील आहेत याचा उलगडा लवकरच होणार आहे. प्रियसीनेच आपला प्रियकर आकाश याला बोलावुन घेऊन नातेवाईकांच्या मदतीने आकाशचा अमानुषपणे खुन केल्याचा तपासात निष्पण झाले आहे. यामधील प्रियशीचे लग्न झालेले आहे, तिचा पती परदेशात नोकरीला आहे. तर आकाशचेही लग्न झाले असुन त्याला फक्त दोन महीन्याचा मुलगा आहे. चार वर्षापुर्वी आकाशच्या वडीलाचे निधन झाले असुन तो शेती तसेच ग्रीलचा व्यवसाय करुन आपली उपजिवीका करीत होता. या घटनेमुळे आकाशची आई अनिता व पत्नी ऐश्वर्या हिने अक्षरशः हंबरडा फोडला असुन हृदय पिटाळून टाकणाऱ्या या हत्येने अक्षरशः महाराष्ट्र हादरला आहे. माणुसकीला काळीमा फासणाऱ्या या घटनेत निश्चित अजुन किती आरोपी आहेत याचा तपास पोलीस करीत आहे.

# 'डब्ल्यूआयटी'ला पाच लाखाचा संशोधन निधी

**नरेंद्र काटीकर, भाग्येश देशमुख यांचा समावेश**





**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ मार्च-**

महाराष्ट्र शासनाच्यावतीने विद्यापीठाच्या माध्यमातून दिला जाणारा, 'राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोगाचा' संशोधन निधी यंदाच्या वर्षी डब्ल्यु.आय.टी. च्या मेकॅनिकल इंजिनिअर विभागातील डॉ. नरेंद्र काटीकर व विभाग प्रमुख डॉ. भाग्येश देशमुख यांना मिळाला असून संशोधनासाठी पाच लाख मंजूर करण्यात आले आहे. हा संशोधन प्रकल्प, प्रमुख संशोधक म्हणून प्राध्यापक- डॉ. नरेंद्र काटीकर व सहसंशोधक म्हणून डॉ. भाग्येश देशमुख यांनी हा प्रस्ताव सादर केला होता. नुकत्याच पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्या वतीने मागविण्यात आलेल्या संशोधन प्रस्तावांतर्गत, आयोगाच्या राज्यस्तरीय समितीने परीक्षण करून या प्रस्तावास त्वरित निधी मंजूर केला. या निधीच्याद्वारे अत्यंत अद्यावत अशा थ्रीडी प्रिंटिंग टेक्नॉलॉजीच्या माध्यमातून या संरचनेची निर्मिती केली जाणार आहे. त्याचा वापर सर्वसामान्य कामगार व इतर भार वाहणारे यांच्यासाठी होणार असून, त्यांच्या एकूणच शारीरिक आरोग्य चांगले राखण्यामध्ये, अत्यंत आमुलाग्र बदल घडवणारी ही संरचना असणार आहे. वालचंद शिक्षण समूहाचे मानद सचिव डॉ. रणजित गांधी आणि समस्त विश्वस्त व प्राचार्य डॉ. विजय आठवले, सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी संशोधन निधी प्राप्त प्राध्यापकांचे अभिनंदन केले आहे.

---



## इतिहास हा वादाचा संस्कृती संक्रमण व सहिष्णुतेचा विषय : डॉ. चंद्रकांत चव्हाण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ मार्च-**

जागतिक विषयाच्या इतिहासाचे ज्ञान असल्यापेक्षा स्थानिक इतिहासाचे ज्ञान असणं खूप गरजेचे आहे. त्यातूनच विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाचे मूल्यांची रुजवणूक करणे विद्यार्थ्यांना विचारांची पुनर्बांधणी कशी करावी आणि त्यासोबत कोणती मूल्य जोपासावी त्याचे ज्ञान मिळते, असे प्रतिपादन वालचंद कला व शास्त्र महाविद्यालयाचे इतिहास प्रमुख डॉ. चंद्रकांत चव्हाण यांनी केले. कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्ये इतिहास मंडळाची स्थापना करण्यात आली. विद्यार्थी हस्तलिखित कार्यक्रम पत्रिकेचे प्रकाशन करण्यात आले. इतिहास मंडळाच्या फलकाचे अनावरण करण्यात आले. यावेळी डॉ. चव्हाण बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.अश्विन बोन्दार्डे होते. इतिहास विभाग प्रमुख डॉ. दत्ता वाघमारे यांनी प्रास्ताविक केले. प्रारंभी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या ही प्रतिमेच्या पूजन करण्यात आले. सूत्रसंचालन बी.एड. द्वितीय वर्षाची विद्यार्थीनी शिक्षिका भाग्यश्री होटगे यांनी केले. पूनम कोरे यांनी आभार मानले. कार्यक्रमानंतर विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या इतिहास विषयाच्या अध्यापनासाठी विविध शैक्षणिक साहित्याचे ही प्रदर्शनाचे उदघाटन करण्यात आले.

# वालचंदच्या विद्यारयण अंकाची हॅटट्रिक

**विद्यापीठाच्या नियतकालिक स्पर्धेतील यश**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ मार्च-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाकडून आयोजित केलेल्या सृजनरंग या वार्षिक नियतकालिक स्पर्धेमध्ये सलग तिसऱ्यावर्षी वालचंद महाविद्यालयाने प्रथम क्रमांक पटकावून हॅटट्रिक संपादन केली. या भरीव कामगिरीबद्दल विद्यापीठाच्या परिसरात वालचंद महाविद्यालयाच्या नावलौकिकात आणखी भर पडली आहे. विद्यापीठात झालेल्या एका कार्यक्रमात संपादक डॉ महावीर शास्त्री, डॉ सिद्राम सलवदे, डॉ संगमेश्वर नीला, डॉ महावीर साबळे, नानासाहेब गव्हाणे, डॉ गोरख पांडगळे यांनी विद्यार्थ्यांसह छत्रपती संभाजीनगर येथील ज्येष्ठ कवी साहित्यिक डॉ दासू वैद्य यांच्या हस्ते चषक प्राप्त केला.

यावेळी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ प्रकाश महानवर, प्रो कुलगुरू डॉ लक्ष्मीकांत दामा, कुलसचिवा डॉ योगिनी घारे, विद्यार्थी कल्याण केंद्राचे प्रमुख केदारनाथ काळवणे, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ राजेंद्र वडजे, उपकुलसचिव डॉ शिवाजी शिंदे यांच्यासह सर्व पदाधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. हेच विद्यार्थी उद्याचे लेखक, कवी व नियतकालिकांचे संपादक होऊ शकतील असे दासू वैद्य यांनी याप्रसंगी उद्गार काढले. सृजनरंग या स्पर्धेमध्ये महाविद्यालयाच्या एकूण २३ विद्यार्थ्यांना पुरस्कृत करण्यात आले आहे. प्राचार्य डॉ. संतोष कोटी व संस्थेच्या सर्व विश्वस्तांनी यशस्वी विद्यार्थी व संपादक मंडळाचे अभिनंदन केले.

**यश मिळविलेले विद्यार्थी**

मराठी भाषाः काव्यात्म लेखन - रोहित सुरवसे, ललित गद्यात्म लेखन - रोहिका हिरेमठ, वैचारिक लेखन- अनुजा मलशेट्टी, मुलाखत विभाग- शिवानंद पवार (सर्व प्रथम). हिंदी भाषाः नाट्यात्म लेखन- फातिमा होडगीकर (प्रथम), वैचारिक लेखन- अजित शर्मा (द्वितीय). इंग्रजी भाषाः कथात्म लेखन- प्रज्ञा बांगड, समीक्षात्मक लेखन- मोईन अहमद (दोघे प्रथम). भारतीय भाषा (प्राकृत) : वैचारिक लेखन- राजनंदनी मुलगे (प्रथम), स्नेहा भोसले (द्वितीय), काव्यात्म लेखन- साक्षी व्हंडरे (प्रथम), प्रतीक्षा डुर्लेकर (द्वितीय), संयुक्ता हंचाटे (तृतीय), कथात्म लेखन- समर्थ पाटील (प्रथम), प्रिया श्रीगिरी (द्वितीय). ललित गद्यात्म लेखन- वैभवी रणसुभे (प्रथम), अर्चना सग्गम (द्वितीय), आदित्य पाटील (तृतीय), नाट्यात्म लेखन- संस्कृती म्हेत्रे (प्रथम), प्रज्वल सलवदे (द्वितीय), मनीषा येमूल (तृतीय), समीक्षात्मक लेखन- प्रणिती म्हेत्रे (प्रथम), समीक्षा शेटगार (द्वितीय), नंदिनी भोसले (तृतीय)

---

## आरजी संस्थेच्या अध्यक्षपदी सिद्धांत सरवदे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ मार्च-**




आर. जी. (राजगृह) मागासवर्गीय बहुउद्देशिय सेवाभावी संस्थाचे (स्वाभिमानी) अध्यक्षपदी सिद्धांत सरवदे यांची निवड झाली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती उत्सवाची वार्षिक बैठक रुपाभवानी गार्डन येथे वार्षिक बैठकीत पदाधिकारी निवड करण्यात आली. त्या वेळी संस्थेचे संस्थापक पिंटू ढावरे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाली. यावेळी नगरसेवक डॉ किरणजी देशमुख, ॲड. विनितकुमार गायकवाड, राहुल शहाबादे, नगरसेवक संजयजी कणके, योगेश काकडे, युवा नेते सुजीत आवघडे, प्रितम परदेशी, ब्रह्मदेव पवार, नागेश येळमले, ईब्रम भाई शेख, सुधीर बिडबाग, भैय्या कांबळे, प्रकाश ननवरे, विजयानंद काळे आदी उपस्थित होते.

**अन्य पदाधिकारी :** उपाध्यक्षः अजय कांबळे, अदित्य गायकवाड, दिपक रणदिवे, संजु गायकवाड, शंतनु व्हणकडे. सचिव : प्रविण गायकवाड, सहसचिवः शशिकांत माने, हणमंत वाघमारे, शुभम गायकवाड, गौतम कापूरे. प्रसिद्धीप्रमुख : संदेश गवळी, सुधिर बनसोडे, सॅन्डी गायकवाड, आदर्श कांबळे, अजय जेठीथोर. खजिनदार:- प्रमोद नागटिळक कार्याध्यक्ष : श्रवण सरवदे, अजय कसबे, अशम मणियार, अभि उडाणशिव, संकेत शिंदे. मिरवणूक प्रमुख : विशाल गायकवाड, आकाश कांबळे, दिपक कौप्पुल, राजाभाऊ चव्हाण. सल्लागार : बंटी तळभंडारे, सिध्दांत रणखांबे, बबलू ढावरे, तुषार जौजंट, प्रथमेश गायकवाड, दिगंबर वाघमारे, सिध्दांत मसलखांब, शुभम गायकवाड, बंटी माने, कुणाल उडाणशिव, संघमित्र वारभुवर, सुनिल झळके, विकी बनसोडे आदी.

### आयुक्तांनी केली कौन्सिल हॉलची पाहणी

**सोलापूर, दि.१२ मार्च-**

पदभार घेतल्यानंतर प्रथमच महापालिका आयुक्त आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी महापालिकेतील कौन्सिल हॉलची पाहणी केली. कौन्सिल हॉल इमारतीमधील नगरसचिव व इतर कार्यालयांना भेटी देऊन काम काजाची माहिती घेतली. जनता दरबारात शहरातील नागरिकांच्या विविध समस्या, प्रश्न जाणून घेतले. आयुक्तांनी दुपारी महापालिकेच्या परिसरातील सभागृह असलेल्या कौन्सिल हॉल मधील विविध विभागांची पाहणी केली. कौन्सिल हॉल परिसरात सभागृह, नगरसचिव कार्यालय, महिला व बालकल्याण विभाग, नोडल अधिकारी कक्ष, अतिक्रमण प्रतिबंधक विभाग कार्यालय आणि इतर कार्यालय व परिसराची पाहणी केली.




## चंदेले शैक्षणिक संकुलात महिलांचा सन्मान

**सोलापूर, दि. १४ मार्च-**

भाई छन्नूसिंह चंदेले समाजकार्य महाविद्यालय, राष्ट्रमाता इंदिरा प्राथमिक शाळा, देशभक्त भाई छन्नूसिंह चंदेले माध्यमिक विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. यावेळी कर्तबगार महिलांचा सन्मान करण्यात आला. यावेळी भाई छन्नुसिंह चंदेले स्मृती केंद्राचे अध्यक्ष हेमू चंदेले, विश्वस्त सविता चंदेले, विश्वस्त प्रा. डॉ. रोझा चंदेले-पाराशर, वसुंधरा महाविद्यालयाच्या माजी प्राचार्या प्रा. डॉ. मीना गायकवाड, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी रेश्मा गायकवाड, प्रा. दिपाली अवसेकर, सावित्री महिला संघटनेच्या संघटक शकुंतला सूर्यवंशी, महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य, एस. बी. गायकवाड, मुख्याध्यापक महादेव तोळणूरे, अमृतदत्त चिनी आदी उपस्थित होते.सूत्रसंचालन डॉ. अनुराधा जाधव यांनी केले. चंदाराणी गुंड यांनी आभार मानले.

---



## सोलापूर विकास मंचतर्फे उपोषण

**सोलापूर, दि. १४ मार्च-**

राज्याच्या बजेटमध्ये सोलापूरला पुन्हा वाऱ्यावर सोडल्याच्या निषेधार्थ सोलापूर विकास मंचच्या वतीने जिल्हा परिषदेसमोर मंगळवारी लाक्षणिक उपोषण करण्यात आले. महाराष्ट्र शासनाने नुकत्याच जाहीर केलेल्या राज्य बजेटमध्ये सोलापूरच्या वाट्याला पुन्हा भोपळाच आला. कोणत्याही नव्या योजना, निधी अथवा प्रकल्प जाहीर न करता सरकारने सोलापूरच्या जनतेला पूर्णपणे वाऱ्यावर सोडले. यावेळी सोलापूर विकास मंचचे मिलिंद भोसले, केतन शहा, योगिन गुर्जर, विजय कुंदन जाधव, ॲड. दत्तात्रय अंबुरे, मनोज क्षिरसागर, सुहास भोसले, आनंद पाटील, श्रीनिवास पोट्टाबत्ती, घनश्यान दायमा, सुनिल दुस्सल, विश्वनाथ गायकवाड, पांडुरंग कुलकर्णी, नागेश गायकवाड, प्रशांत भोसले, आदी उपस्थित होते.

# पहिलीच्या विद्यार्थ्यांचे वर्ग १ एप्रिलपासून

**नवीन शैक्षणिक धोरण; २२० दिवस अध्यापन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ मार्च-**

नवीन शैक्षणिक धोरणानुसार एक एप्रिलपासून पहिलीचे वर्ग भरविण्यात येणार आहेत. याबाबत शाळांना कळविण्यात आले नसले तरी शिक्षण विभागाकडून तयारी सुरू असल्याचे सांगण्यात येते. मात्र शाळांकडून कोणत्याही प्रकारची तयारी दिसून येत नाही. शिवाय ऊन्हाची तीव्रता अधिक असताना शाळेची वेळ काय असणार? याविषयी चर्चा सुरू आहे.

एप्रिलच्या दुसऱ्या आठवड्यात अंतिम सत्र परीक्षा संपल्यावर विद्यार्थी शाळेला येतच नाहीत,त्यामुळे अध्यापन कालावधी कमी होते. वर्षातील ३६५ दिवसांपैकी २२० दिवस देखील विद्यार्थ्यांचे अध्यापन होत नाही. म्हणून नवीन शैक्षणिक धोरणानुसार २०२५-२६ च्या शैक्षणिक वर्षात इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांचे वर्ग १ एप्रिलपासून भरविले जाणार असल्याचे सांगण्यात येते इयत्ता पहिली ते नववीच्या विद्यार्थ्यांची वार्षिक परीक्षा ८ ते २५ एप्रिल या काळात घेण्यात येणार आहेत. नियोजनानुसार सर्व विद्यार्थ्यांची परीक्षा वेळेत घेण्याची जबाबदारी शाळेच्या मुख्याध्यापकांची आहे. १ एप्रिलपासून इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांचे वर्ग भरविण्याचे नियोजन सुरू असून, लवकरच त्यासंदर्भातील निर्णय जाहीर होणार असल्याचे सांगण्यात येते. पहिलीच्या नवीन विद्यार्थ्यांना वर्षातील २२० दिवस अध्यापन करणे शक्य होणार आहे. शाळा एप्रिलपासून सुरू झाली, तरी १ मे नंतर निश्चित विद्यार्थ्याल उन्हाळी सुट्टी विद्यार्थ्यांना दिली जाणार आहे. १० ते १५ जूनपासून पुन्हा शाळा सुरू होणार आहेत.

**पहिली वर्गाच्या समस्या**

एप्रिलमध्ये पहिलीचा वर्ग सुरू करण्यात येणार असून सर्व शिक्षकांना नवीन शैक्षणिक धोरणानुसार प्रशिक्षण देण्यात येत आहे. शिक्षकांना अद्याप पुस्तक व अभ्यासक्रमांची ओळख नसताना वर्ग भरविण्यात येत आहे. शिवाय शाळांमध्ये पहीली वर्गाची प्रवेशप्रक्रीया सुरू करण्यात आले नाही. कोणत्याही प्रकारचे शैक्षणिक साहीत्य उपलब्ध नाही. अध्यापनाबाबत नियोजन नाही.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# पाऊसमान चांगले झाल्याने यंदा उत्पन्नाचा टक्का वाढला

**रब्बी पिकांच्या काढणीला वेग**

**सुगी अंतिम टप्प्यात**

**हमीभाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांचा वनवास कायम**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ मार्च-**

गतवर्षी दुष्काळी स्थिती निर्माण झाली आणि यंदा सरासरीच्या दीडपट पावसाने हजेरी लावल्याने खरिपाचा उत्पन्नाचा टक्का वाढला आणि आता रब्बी हंगामातील पिकांचाही टक्का नक्कीच चांगला वाढेल, असा आशावाद जिल्हा कृषी खात्याकडून व्यक्त केला जात आहे. दरम्यान, शेतकऱ्यांनी नाना संकटांवर मात करून उत्पादित केलेल्या मालाला बाजारपेठांतून हमीभाव मिळत नसल्याने बळीराजाचा वनवास कायम असल्याची खंत जाणकार शेतकरी व्यक्त करीत आहेत.

जूनपासूनच चांगला पाऊस झाल्याने ७०० मिमीच्याही पुढे यंदा पाऊस नोंदला गेला. यामुळे जिल्ह्यातील नदी-नाले, विहिरी, पाझर तलाव, साठवण तलाव आणि उजनी धरणही



ओसंडून वाहिले. याचा परिणाम शेतपिकांवर मोठ्या प्रमाणात झाला. पाऊसकाळ जास्त दिवस राहिल्याने रब्बीतील पिकांच्या पेरण्या उशिराने झाल्या. यामुळे ज्वारी पिकाची पेरणी कमी झाली मात्र ऊस, हरभरा, मका आणि गहू पेरणीचा शेतकऱ्यांनी दणका उठविला होता.

रब्बी हंगामाचा कृषी विभागाचा अहवाल पाहिला तर यंदा ज्वारी पिकाची पेरणी २ लाख ५४० हजार हेक्टरवर झाली आहे. तर ऊस क्षेत्र १ लाख ३१६ हेक्टरवर दिसून येत आहे. गव्हाचाही यंदा टक्का वाढल्याने याची पेरणी ५३३ हजार हेक्टरवर झाली आहे. तर मका ६१९.८३ हेक्टरवर झाली आहे. तर इतर तृणधान्य ००.९८ हेक्टरवर झाले आहे. अशी एकूण ३ लाख ६९५ हजार हेक्टरवर रब्बी हंगामातील पेरणी झाली आहे. पेरणी केलेली पिके जोरात आल्याने गतवर्षीपेक्षा यंदा भरीव उत्पन्न निघणार आहे. सध्या या पिकांच्या काढणीने वेग घेतला असून, सुगी अंतिम टप्प्यात आली आहे.

### बळीराजा चारी मुंड्या चीतच!

पूर्वी धनदांडग्या शेतकऱ्यांकडून शेतमजुरांची पिळवणूक केली जायची असा आरोप होत होता. सध्या मात्र शेतमजुरांच्या दरवर्षी वाढणाऱ्या मजुरीनेच शेतकरीदादा जाम पिळून निघत आहे. हरभरा, गहू, ज्वारी काढणीचे दर प्रचंड वाढले असून, शेतकऱ्यांच्या हाती काहीही राहत नाही. सध्या कडबा काढण्याचे दर प्रतिपेंडी ५ ते ६ रूपये आहे. त्या पेंडिंचा बांधणी दर ३ रूपये, यानंतर १०० पेंडींचा कणीस मोडणी दर दीड पायली (६ शेर ज्वारी), गहू १०० पेंडी अडीच पायली (१० शेर गहू), हरभरा काढणी तर एकरावरच पैसे ठरवून (गुत्ते घेणे) मजूर महिला घेवू लागल्या आहेत. पेरणीपूर्व मशागत, पेरणी, आंतरमशागतीचा तर हिशोब वेगळाच. एकढ्या अडचणीतून उत्पादित मालाला हमी भाव नाही. यामुळे पाऊस पडला काय अन् नाही पडला काय...बळीराजा चारी मुंड्या चीतच होतो. यामुळे सध्या शेती व्यवसाय प्रचंड अडचणीत आला असल्याने शासनाने यावर काहीतरी ठोस उपाययोजना करण्याची गरज जाणकार शेतकरी बांधव व्यक्त करीत आहेत.

# २० पटसंख्या शाळेला मिळणार पदवीधर शिक्षक

**दोन शिक्षक देण्याच्या मागणीवर संघटना ठाम**

**तभा वृतसेवा,**
**सोलापूर, दि. १४ मार्च -**

राज्यातील अनेक प्राथमिक व माध्यमिक तसेच खासगी शाळेतील पदवीधर शिक्षकांसाठी गुड न्यूज असून संचमान्यतेचे निकष बदलवून सरकारी शाळांमधील सहावी ते आठवीच्या वर्गासाठी २० पटसंख्येच्या आतील वर्गांना अखेर एक पदवीधर शिक्षक मंजूर करायला शासन राजी झाले आहे. तसा आदेश राज्य शासनाने जारी केला आहे. अनेक शिक्षक संघटनाने हा विषय लावून धरताच शासनाकडून मंजूरी देण्यात आली आहे. त्यामुळे त्या ठिकाणी कार्यरत एक शिक्षक शाळेत कायम राहील, तर एकपेक्षा जास्त शिक्षक असलेल्या शाळेतून दुसरा पदवीधर शिक्षक मात्र अजूनही अतिरिक्त ठरणार आहे. सहावी ते आठवीची पटसंख्या २० पेक्षा कमी असल्यास शिक्षकाचे एकच पद मंजूर करण्याबाबतचा आदेश ग्रामीण भागातील शाळा मोडीत काढणारा असल्याचे शिक्षक संघटनांचे म्हणणे आहे. ११ ते १४ वयोगटातील मुलांना ३ किलोमीटरच्या आत शिक्षण व्यवस्था उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे. तरीही शाळांना शिक्षक नाकारून ६वी ते ८वीच्या वर्गात शिक्षण घेत असलेल्या संख्येने कमी असणाऱ्या मुलांना शिक्षणासाठी घरापासून दूरच्या शाळेवर अवलंबून राहावे लागणार होते. या नव्या आदेशाने एक शिक्षक तरी उपलब्ध होणार असल्याने या मुलांना व शिक्षकांनाही मोठा दिलासा मिळाला आहे.

### पदवीधर शिक्षकांना न्याय

राज्यात कमी पट संख्या शाळेत शिक्षकांची कमतरता असतना पवित्र पोर्टल मार्फत शिक्षकांची भरती व्हावी. त्यामुळे विद्यार्थ्यांना शाळेला शिक्षक मिळू शकतील तसेच पदवीधर शिक्षकांना या निर्णयामुळे न्याय मिळाला आहे. त्यांचा रोजगारांचा प्रश्न मिटला आहे.

**- प्रशांत शिरगुर, राज्य उपाध्यक्ष**

## संक्षिप्त वृत्त

### एकास लोखंडी रॉडने डोक्यात मारुन जखमी केल्याप्रकरणी तिघांविरुध्द गुन्हा दाखल

**मंगळवेढा दि.१४ मार्च-**

आंधळगाव येथे एकाने तु त्याच्या बरोबर भांडण करुन शिवीगाळी का केली? असे विचारत असताना एकास लोखंडी रॉड डोकीत घालून जखमी केल्याप्रकरणी गणेश जाधव,तुषार जाधव, बाळू जाधव या तिघा विरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी,यातील फिर्यादी ऋषीराज ननवरे (वय ३९,रा. आंधळगाव) हे दि.१२ रोजी रात्री ९.३० च्या दरम्यान घरा समोर थांबले असता



वरील आरोपींनी घरासमोर येवून तू माझा भाऊ पेट्रोल पंपाजवळ थांबला असताना त्याच्या बरोबर भांडण करुन शिवीगाळी का केली? असे म्हणत असताना दारुच्या नशेत त्याने शिव्या दिल्या आहेत असे सांगत असताना वरील आरोपींनी लोखंडी रॉडने फिर्यादीच्या डोक्यात मारुन गंभीर जखमी केले. तसेच फिर्यादीच्य आई रंजना, पत्नी संध्या भांडणाचा आवाज ऐकून भांडणे सोडविण्यास आल्यावर त्यांनाही लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तू आमचा नाद केला तर तुला जीवंत सोडणार नाही अशी धमकी दिली. भांडणामध्ये आई रंजना हिच्या गळ्यातील एक तोळ्याचे मणीमंगळसुत्र तुटून गहाळ झाल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. याचा अधिक तपास पोलीस हवालदार वैभव हाके हे करीत आहेत.

### शंभूराजांची पुण्यतिथी साजरी करण्यासाठी ४० लाख निधी द्या : जयंत पाटील

**मुंबई दि. १२ मार्च-**

स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुण्यतिथी कार्यक्रमासाठी निधी वाढवून देण्यात यावे , निधी ३० ते ४० रुपयांचा करावा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंतराव पाटील यांनी आज विधानसभेत पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन च्या माध्यमातून केली. स्वराज्याचरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांची पुण्यतिथी तिथीप्रमाणे २९ मार्च रोजी आहे. याबाबत ते म्हणाले की, सध्याचे वातावरण



पाहता, लाखो शंभू प्रेमी तुळापूर येथील शंभूराजांच्या स्मारक परिसरात जमण्याची शक्यता आहे. पण पुण्यतिथी कार्यक्रमासाठी शासनाने फार तुटपुंजा निधी दिला आहे. सर्व शंभूभक्त, शंभूप्रेमींची भावना लक्षात घेता, पुण्यतिथी कार्यक्रमाची व्याप्ती लक्षात घेता शासनाने या निधीत वाढ करावी. तसेच दरवर्षी या कार्यक्रमासाठी निधी उपलब्ध करून द्यावा असेही त्यांनी जोडले. यावर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सकारात्मक प्रतिसाद देत, पुण्यतिथी कार्यक्रमासाठी निधी कमी पडणार नाही असे आश्वासन सभागृहात दिले.



### जुन्या निकषाप्रमाणेच रमाई घरकुल मंजूर करावे

**सोलापूर, दि. १४ मार्च-**

जुन्या सन २०११-१२ या वर्षातील निकषाप्रमाणेच रमाई घरकुल योजना मंजूर करावी या मागणीचे निवेदन बहुजन समाज पार्टीच्या वतीने महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांना देण्यात आले. रमाई आवास योजना नवीन निकषामुळे रखडली आहे. यामुळे जुने निकष ग्राह्य धरावेत आणि सरसकट सर्व घरकुल मंजूर करण्यात यावेत. या योजनेपासून कोणीही वंचित राहू नये, अशी मागणी या निवेदनाद्वारे केली आहे.या निवेदनावर तातडीने कार्यवाही करावी अन्यथा बहुजन समाज पार्टीच्या वतीने तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही देण्यात आला. यावेळी ॲड संजीव सदाफुले, आप्पासाहेब लोकरे, देवा उघडे, योगेश गायकवाड, शीलवंत काळे, अमर साळवे, सुहास सुरवसे, प्रवीण कांबळे, इरफान मैंदर्गी,नितीन क्षीरसागर, संजय गायकवाड, महेंद्र कांबळे, रोहन बनसोडे उपस्थित होते.




### लोकमंगल समृद्ध गाव अभियान कार्यक्रम

**सोलापूर, दि. १४ मार्च-**

महिला दिनाचे औचित्य साधून खेडपाटी (सटवाई) उत्तर सोलापूर येथे महिला दिन साजरा करण्यात आले. यावेळी खेडपाटीचे सरपंच जयश्री भोसले, माजी सरपंच काळे यांच्याहस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमास सुरुवात केली. लोकमंगल समूहाचे अध्यक्ष सुभाष देशमुख यांच्या विचारधारेतून तसेच लोकमंगल कर्मचाऱ्यांची पतसंस्था अध्यक्षा सरोजनी निकम, सचिव सुदान सुरवसे यांच्या मार्गदर्शनाखाली लोकमंगल डेव्हलपमेंट फाउंडेशनचे समन्वयक श्यामकुमार भंडारे यांनी महिला बचत गटांना शासकीय योजने बद्दल माहिती दिली. माजी सरपंच काळे यांनी महिलांच्या हाताला उद्योग द्या असे सर्व महिलांच्या वतीने सांगितले. यावर भंडारी यांनी लोकमंगलच्या माध्यमातून उद्योग देण्याची ग्वाही दिले. यावेळी जयश्री भोसले, सरुबाई शिंदे, जोशना शिरसाट, सोनाली वाघमारे, विजयश्री शिरसाट माजी सरपंच काळे आदी महिलांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे आभार नागेश बेळगी यांनी मानले तर सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्यामकुमार भंडारे, नागराज सरगम, अमोल जोकारे, संजय बागल, नितीन अलकुंटे, संतोष दोरकर यांनी परिश्रम घेतले.

## बालिकेला २९ व्या मजल्यावरून फेकून मातेची आत्महत्या

**पनवेलमधील घटना**

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १४ मार्च -**

एका ३६ वर्षाच्या विवाहितेने आपल्या ८ वर्षाच्या मुलीला २९ व्या मजल्यावरून खाली फेकून स्वतःही आत्महत्या करण्याची धक्कादायक घटना

नवी मुंबई येथील पनवेलमधील पळस्पे येथे घडली. मैथिली दुवा असे या महिलेचे नाव असून त्यांच्या या कृत्याचे नेमके कारण स्पष्ट झालेले नाही. गेल्या काही दिवसापासून त्या मानसिक आजारी होत्या .पतीशी झालेल्या वादातून त्यांनी हे कृत्य केल्याचे सांगण्यात येत आहे. मायलेकीच्या मृत्यूमुळे परिसरात हळूहळू व्यक्त होत आहे. पनवेलमधील पळस्पे परिसरातील मॅरेथॉन नेक्सन ओरा बिल्डिंगमध्ये आशिष दुवा हे २९ व्या मजल्यावरील फ्लॅटमध्ये पत्नी व मुलीसह राहत होते.गुरूवारी दुपारी मैथिली दुवा यांनी आपल्या आठ वर्षांच्या मुलीला बेडरूमच्या खिडकीतून खाली फेकले, त्यानंतर लगेचच त्यांनी स्वतः खाली उडी मारली. उंचावरून पडल्याने मोठा आवाज झाला त्यामुळे सिक्युरिटी गार्ड व अन्य नागरिकांनी त्या ठिकाणी धाव घेतली. अकस्मित घडलेल्या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली.दोघाच्या डोक्याला गंभीर मार बसल्याने त्यांच्या जागीच मृत्यू झाला. त्या मानसिक दृष्या आजारी होत्या , पतीशी वाद असल्याने त्या नाराज होत्या, त्यामुळे त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलले असावे, असा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. याबाबत पनवेल पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

# सोन्याची झेप ९० हजारांवर

**दर वाढीचा आलेख दिवसेंदिवस सुरूच**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ मार्च-**

सोन्याच्या दारात पुन्हा एकदा मोठी वाढ झाली आहे. २४ कॅरेट सोन्याचे दर प्रति तोळा ९० हजारांवर स्थिरावलेले आहेत. सोन्याच्या दरात घसघशीत वाढ गेल्याने बाजारात तेजीचे वातावरण निर्माण झाले आहे. तर दुसरीकडे चांदीच्या दराने देखील एक लाखांचा टप्पा ओलांडला आहे. सोन्या - चांदीच्या सततच्या दरवाढीमुळे सोने चांदी खरेदी करावे का नको असा प्रश्न ग्राहकांसमोर निर्माण झाला आहे.

दरम्यान, आंतरराष्ट्रीय स्तरावर सोन्याची मागणी वाढत चालल्याने सोन्याच्या दरात वाढ होत असल्याचे दिसत आहे.सध्या बाजारपेठेत २४ कॅरेट सोन्याचे दर हे ९० हजार ८०० प्रति दहा ग्रॅम इतके झाले आहेत. यापूर्वी सोन्याचे दर हे ८६ ते ८८ हजार रुपयांपर्यंत स्थिर राहिले होते. तर चांदी प्रतिकिलो ९० हजारांवरून १ लाखांवर पोहोचली आहे. सोन्या चांदीच्या या वाढत्या आलेखामुळे सर्वसामान्य ग्राहक मेटाकुटीला आला आहे. सोन्याचे दर दिवसात दिवस वाढत असलेले सोन्याची खरेदी करावी का नको असा प्रश्न देखील ग्राहकांसमोर



### असे आहेत जीएसटीसह दर

**सोने :**
२४ कॅरेट - ९०,८५०रु. प्रति १० ग्रॅम
२२ कॅरेट - ८४,००००रु. प्रति १० ग्रॅम

**चांदी :**
१ लाख २००० रू. प्रति किलो
१ हजार ५० रू. प्रति १० प्रति १० ग्रॅम

### गिऱ्हाईक तुटण्याची भीती

सोन्याचे दर दिवसेंदिवस वाढत आहेत. यापूर्वी सोन्याचे असणारे दर हे आटोक्यात होते. परंतु आता सोन्याची वाटचाल ही एक लाखांच्या घराकडे सुरू आहे. दरवाढीमुळे नियमित सोने खरेदी करणारा ग्राहक वर्ग सोन्याच्या खरेदीकडे पाठ फिरवत आहे. अशा अवस्थेत सोन्याकडील गिऱ्हाईकी तुटण्याची भीती संभवते.

**- अविनाश पंडित, सराफ व्यापारी**

### लग्न कार्यात सोन्याशिवाय पर्याय नाही

लग्न कार्यात सोन्याशिवाय पर्याय नसतो. लग्नात सोने द्यावे लागते. परंतु सोन्याचे दर हे असेच वाढत राहिले, तर या पुढील काळात सोने खरेदी करणे शक्य होणार नाही. सोन्याचे दर सर्व साधारण असावेत.

**- किरण कुलकर्णी, ग्राहक**

## लाड कमिटी अंतर्गत महापालिकेने केली १४ जणांची नियुक्ती

**डॉ. सचिन ओम्बासे यांनी काढले आदेश**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ मार्च -**

शासनाने दिलेल्या निर्देशानुसार सोलापूर महापालिका प्रशासनाने महापालिकेतील कर्मचाऱ्यांच्या वारसदारांकडून आलेल्या अर्जांमधून लाड कमिटी वारसा हक्क अंतर्गत १४ जणांना नियुक्तीचे आदेश देण्यात आले आहेत. महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी हे आदेश काढले आहेत.

महापालिकेकडून यापूर्वी लाड - पागे कमिटी अंतर्गत एकूण ३१५ कर्मचाऱ्यांच्या वारसांना नियुक्ती पत्र दिली आणि अनुकंपा तत्वाखाली ८४ जणांना नियुक्ती पत्र प्रदान करण्यात आले आहेत. आणि आजचे १४ मिळून असे एकूण आतापर्यंत ३२९ जणांना नियुक्ती आदेश देण्यात आले आहेत. संबंधितांना त्या त्या विभागात नियुक्त करण्यात आले आहे. महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी हे आदेश काढले आहेत. महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार उपायुक्त आशिष लोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली सामान्य प्रशासन विभागाचे अधीक्षक रजाक पेंढारी यांच्या माध्यमातून या विभागाने या नियुक्तीसाठीची प्रक्रिया नेटक्या पद्धतीने राबवली. दि. १३ मार्च २०२५ पासून दोन वर्षाच्या परीविक्षा कालावधी करिता अटी व शर्तीस अधीन राहून महापालिकेतील संबंधित कार्यालयाकडे या कर्मचाऱ्यांना नियुक्त करण्यात येत असल्याचे आदेशात म्हटले आहे. आज एकूण १४ वारसांना हे नियुक्ती आदेश देण्यात आले आहे. यामध्ये झाडूवाला- ७, झाडूवाली - १, बिगरी - ५ आणि कनिष्ठ श्रेणी लिपिक - १ आहे. घनकचरा व्यवस्थापन विभागात झाडूवाला, झाडूवाली आणि बिगारी यांना नियुक्त करण्यात आले आहे तर कर संकलन विभागात कनिष्ठ श्रेणी लिपिकास नियुक्ती दिली आहे.



### नियोजन पूर्वक नेटक्या पद्धतीने प्रक्रिया

महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली नियोजनबद्ध नेटक्या पद्धतीने सामान्य प्रशासन विभागाचे अधीक्षक रजाक पेंढारी यांच्या माध्यमातून या विभागातील कर्मचारी लाड कमिटी वारसा हक्क अंतर्गत अर्जांची निपटारा प्रक्रिया पार पाडत आहेत. यामुळे इतर महापालिकांच्या तुलनेत सोलापूर महापालिका सामान्य प्रशासन विभागाने कमी वेळातच नेटक्या पद्धतीने आतापर्यंत ३२९ नियुक्ती आदेश काढण्यात यश मिळाले आहे.



## लोकमंगल बँकेकडून महिलांचा सन्मान

**सोलापूर, दि. १४ मार्च-**

आमदार सुभाष देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत लोकमंगल बँकेच्या वतीने महिला दिनानिमित्त विविध क्षेत्रातील महिलांचा 'सन्मान स्त्री शक्तीचा' हा पुरस्कार देवून सन्मान करण्यात आला.

जुळे सोलापूर येथील गोविंदश्री मंगल कार्यालयात आमदार सुभाष देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच महिला दिनानिमित्त विविध क्षेत्रातील महिलांचा कोमलताई रोहन देशमुख यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी महिलांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी 'वहिनी लय भारी, खेळ पैठणीचा' हा कार्यक्रम घेण्यात आला. स्पर्धेतील विजेत्या महिलांना मानाची पैठणी व विविध बक्षिसे देण्यात आली. याप्रसंगी पतंजली योग समितीच्या प्रमुख सुधाताई अल्लीमोरे, के. एल. ई शाळेच्या समुपदेशन वर्षा बायस, मेहता प्रशालेच्या मुख्यध्यापिका श्रुती वडकबाळ, सोनी महाविद्यालयाच्या प्राचार्या आशा रोकडे, लोकमंगल पतसंस्थेच्या सरव्यवस्थापिका अलका देवडकर आदींची उपस्थिती होती. प्रास्ताविक बँकेच्या अधिकारी अनिता जगदाळे यांनी केले. सूत्रसंचालन अपर्णा गव्हाणे यांनी केले.

# पुन्हा एकदा ठाकरे बंधूंना एकत्र येण्याची साद!

**गुढीपाडव्याला बंधू मिलन कार्यक्रमाचे निमंत्रण**

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**मुंबई, दि.१४ मार्च-**

महाराष्ट्रातील राजकारणात स्वतंत्र ओळख असलेले माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे व मनसेचे प्रमुख राज ठाकरे यांना पुन्हा एकदा एकत्र येण्याची साथ मुंबईतील मराठी माणसांनी घातली आहे. ३० मार्चला ठाकरे बंधूंनी गुढीपाडव्याला एकत्र येण्यासाठी ठाकरे बंधू मिलन कार्यक्रमाची निमंत्रण बनवली आहे. उद्धव व राज यांच्यामध्ये शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे असलेला फोटो छापून ही पत्रिका बनवण्यात आली असून शिवाजी पार्कवरील बाळासाहेबांच्या स्मृती स्थळी एकत्र येण्याचे आवाहन करण्यात आले आहे सोशल मीडियावर सध्या ही पत्रिका झपाट्याने वायरल होत आहे.

सुमारे दोन दशकापूर्वी राज ठाकरे यांनी शिवसेनेला जय महाराष्ट्र केला तेव्हापासून



महाराष्ट्रातील राजकारणात बरेच पाणी पुलाखालून वाहून गेले आहे . उद्धव ठाकरे यांनी भाजपा समवेत युती करून २०१४ ते २०१९ मध्ये केंद्रात व राज्यात सत्ता उपभोगली आहे. तर त्यानंतर दोन्ही काँग्रेस समवेत महाविकास आघाडी बनवून अडीच वर्षे राज्याचे मुख्यमंत्री बनले होते .सोबत मुंबई महापालिकेवरील सत्ता सातत्याने ताब्यात ठेवली आहे . त्यांच्या तुलनेत राज ठाकरे यांचा राजकीय आलेख खालावत राहिला आहे . तरीही त्यांच्याबद्दलचे वलय कायम आहे. गेल्या वर्षी झालेल्या विधानसभा निवडणुकीत दोन्ही पक्षाला दारून पराभवाला सामोरे जावे लागले उद्धव ठाकरे यांचे जेमतेम २० आमदार निवडून आले तर राज ठाकरे यांना भोपळाही फोडता आला नाही. त्यामुळे या दोघांनी पुन्हा एकदा एकत्र यावे ,अशी मराठी माणसांकडून साद घातली जात आहे. मुंबईतील मराठी सेनेने त्यांना एकत्र आणण्यासाठी गुढीपाडव्यानिमित्त एक मिलन कार्यक्रम ३० मार्चला बाळासाहेब ठाकरे स्मृतीस्थळी येथे आयोजित केला आहे.

विधानसभा निवडणुका पार पडल्यानंतर सध्या सर्वच पक्षाकडून महापालिका निवडणुकांची तयारी केली जात आहे. त्यातच विधानसभा निवडणुकीनंतर ठाकरे बंधूंनी एकत्र यावं अशी भावना सर्वच मराठी माणसांकडून व्यक्त केली जात आहे. यापूर्वी मराठी सेना पक्षाने दादर सेना भवन परिसरात राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी एकत्र यावे अशा आशयाचे बॅनर लावले होते. त्यानिमित्ताने आज बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतीस्थळावर निमंत्रण पत्रिका ठेवली आहे. ही निमंत्रण पत्रिका ठेवून बंधूत्वाचा संदेश देण्याचा प्रयत्न सुरु करण्यात आला आहे. त्यामुळे या कार्यक्रमाला ते एकत्र येतात का याबाबत सर्वांचे औत्सुक्य लागून राहिले आहे.

### ठाकरे बंधू एकत्र येण्याची शक्यता धूसुर

उद्धव व राज ठाकरे यांनी एकत्र काम करावे ,यासाठीही यापूर्वीही अनेक वेळा प्रयत्न झाले आहेत. मात्र काही कौटुंबिक कार्यक्रम वगळता दोघांनी राजकारणात सोबत येण्याचे धुडकावून लावले आहेत. त्यांच्या तीव्र राजकीय मतभेद असल्याने ते येत्या गुढीपाडव्याला एकत्र येतील, याची शक्यता धूसूर आहे.

### निमंत्रण पत्रिकेत काय?

बंधू मिलन निमंत्रण, भाऊ माझा आधार, माझ्या ध्येयाचा किनारा, आयुष्याच्या प्रत्येक सुख दुःखाचा सोबती, भाऊ माझ्या जीवनाचा आधार. बंधू मिलन कार्यक्रम ३० मार्च २०२५ रोजी छत्रपती शिवाजी महाराज मैदान मुंबई येथे सकाळी ११ वाजता स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृती स्थळाजवळ घेण्याचे योजिले आहे. मराठी माणसाच्या हितासाठी एकत्र येण ही काळाची गरज आहे, तरी आपली उपस्थिती वंदनीय असेल, असे मोहनिश रविंद्र राऊळ यांनी ही निमंत्रण पत्रिका बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतीस्थळावर ठेवली आहे.

सोलापूर तरुण भारत
https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# विकास आणि वारसा!

जागतिक पातळीवर सर्वत्र वेगवान विकासाची स्पर्धा सुरू असताना देशाला अर्थव्यवस्थेच्या शिखरावर स्थानापन्न करण्याचा संकल्प सोडलेल्या भारताने विकासाच्या कोणत्याही क्षेत्रात मागे राहू नये, यासाठी केवळ सरकारांनीच नव्हे, तर नागरिकांनीही यथाशक्ती सहकार्य करणे अपेक्षित असते. गेल्या ७५ वर्षांत विकासाची जेवढी चिन्हे भारताच्या वाटचालीवर उमटली, त्या प्रत्येक चिन्हावर नागरिकांच्या सहभागाचा अभिमानास्पद ठसा उमटलेला आहे. म्हणूनच अशा प्रकल्पांत नागरिकांना सहभागी करून घ्यावे, त्यांच्या सहभागाने व संमतीने विकासाचे प्रकल्प राबवावेत आणि जेव्हा हे प्रकल्प पूर्ण होतील, तेव्हा त्याचा लाभ जनतेचे जीवनमान उंचावण्याच्या संकल्पपूर्तीस व्हावा, ही सरकारांची अपेक्षा गैर मानता येणार नाही. विकास किंवा कोणतीही क्रांती, बदल एका रात्रीत, जादूची कांडी फिरविल्यागत होत नसतो. यासाठी सरकारांना सहकार्य करणे ही नागरिकांची जबाबदारी असते. अर्थात्? असा विकास होत असताना वर्तमान जीवनशैलीस त्याचे विपरीत परिणाम भोगावे लागू नयेत. ही जीवनशैली जपता यावी, त्यात सुधारणा करता यावी, यासाठी सर्व उपलब्ध पर्यायांचा पूर्ण वापर करण्याचा समंजसपणा दाखवावा लागतो. अन्यथा, कोणत्याही एखाद्या विकास प्रकल्पामुळे काही मूठभरांनाच लाभ व्हावा आणि विकासासाठी त्याग करणाऱ्यांचे भविष्य भकास व्हावे, असे घडल्यास त्याचे भयंकर परिणाम भोगण्याची वेळ येते. अशा कोणत्याही प्रकल्पाची आखणी करताना व त्याच्या अंमलबजावणीतील अडथळे दूर करताना जनसहभागाची अपेक्षा ठेवणाऱ्या विकासकर्त्यांनी, म्हणजे साधारणतः राज्यकर्त्यांनीच याचे भान ठेवणे जरूरी असते. अमेरिका समृद्ध आहे म्हणून तिथे सर्व क्षेत्रे विकसित झालेली नाहीत, तर सर्व क्षेत्रांच्या व्यापक विकासामुळे अमेरिकेच्या समृद्धीस चालना मिळाली, हे वास्तव लक्षात घेतले, तर समृद्धी आणि विकास या एकमेकांसोबत हातात हात घालून पुढे जाणाऱ्या प्रक्रिया आहेत, हे स्पष्ट होते. गेल्या दशकभरात देशात विकासाच्या प्रकल्पांनी घेतलेला वेग पाहता, माणसाच्या मूलभूत गरजांच्या पूर्ततेस प्राधान्य देणारे प्रकल्प हाती घेण्याचा सरकारचा संकल्प स्पष्ट दिसतो. अन्यथा, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या कारकीर्दीच्या पहिल्या पर्वात पहिल्यांदाच लाल किल्ल्यावरून देशाला उद्देशून केलेल्या भाषणात स्वच्छ भारताचा नारा दिला नसता. स्वच्छता ही जीवनमान उंचावण्याची पहिली पायरी आहे, हे त्यांनी जाणले, तेव्हा स्वच्छता ही राष्ट्रीय चळवळ झाली आणि त्याचे परिणाम पुढच्या दशकभरात देशात दिसू लागले. आत्मनिर्भर भारत ही त्यांच्या संकल्पाची दुसरी पायरी ठरली. स्टार्टअपसारख्या योजनांचे लाभ घेणारी नवी पिढी आता आपआपल्या क्षेत्रातील जागतिक स्पर्धेत आत्मविश्वासाने उतरू पाहात आहे, महिलांना रोजगाराच्या संधी देणाऱ्या योजनांतून स्वयंपूर्ण महिला आत्मविश्वासाने विकासाची फळे चाखताना दिसत आहेत आणि युवकांसाठी नव्या रोजगारांच्या संधी विकासाच्या विविध प्रकल्पांमुळे समोर येऊन उभ्या ठाकल्या आहेत. हे बदल घडविण्यात सरकारांचा संकल्प आणि नागरिकांचा सहभाग यांचा समान वाटा आहे, हे स्पष्ट आहे. असा विकास अनुभवण्यासाठी नागरिकांनी भविष्याचा वेध घेण्याची मानसिकता जोपासणे व जगाच्या विकासाच्या स्पर्धेतील घोडदौडीत सहभागी होण्याची क्षमता निर्माण करणे गरजेचे असल्याने काही पठडीबाज कल्पनांना सोडचिठ्ठी देणेही गरजेचे असते. आजकाल जीवनशैली उंचावण्यासाठीच्या असंख्य संधी वेगवेगळ्या मार्गांनी समाजासमोर आदराने उभ्या राहिलेल्या दिसतात. अशा संधी झिडकारणे किंवा त्यांना सामोरे जाण्याची क्षमता अंगी नसणे हे कमकुवतपणाचे लक्षण असल्याने, विकासाच्या प्रत्येक संधीस सामोरे जाऊन तिचे सोने करण्याची कला समाजाने स्वतःच्या अंगी निर्माण केली, तर केवळ लाभाचीच गणिते साधणे शक्य असते. गेल्या दशकातील विकासाच्या प्रत्येक प्रकल्पाने हे सिद्ध केले आहे.

महाराष्ट्राने केंद्र सरकारच्या त्याच संकल्पास साथ देण्याचा महत्त्वाकांक्षी विडा उचलला आहे, हे नुकत्याच सादर झालेल्या अर्थसंकल्पातून प्रतिबिंबित झाले आहे. विकास साधताना आपला सांस्कृतिक वारसा जपला जावा, त्यातून समाजाची उन्नती व्हावी, हा विचार अनेक प्रकल्पांच्या आखणीतून स्पष्ट झाल्याचे पुरावे त्या त्या वेळी राज्याने अनुभवले आहेत. महाराष्ट्राचे तत्कालीन आणि विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या स्वप्नातील महत्त्वाकांक्षी प्रकल्प ठरलेल्या समृद्धी महामार्गाने हे सिद्ध केले आहे. महामार्ग हा केवळ भौगोलिक प्रदेशांना जोडणारा रस्ता नसतो, तर तो जेथून जातो, तेथील संस्कृतीचे आदानप्रदान करणारा धागादेखील ठरतो. एका अर्थाने, महामार्ग हा केवळ गावे किंवा शहरांना जोडणारा नव्हे, तर समाजास सांस्कृतिकदृष्ट्या जोडणारा धागा असतो. समृद्धी महामार्गाच्या संकल्पनेच्या टप्प्यात सरकारने हेच स्वप्न पाहिले होते. आज हा महामार्ग जवळपास संपूर्णपणे कार्यान्वित झाल्यानंतर त्याच्या भौगोलिक लाभासोबतच सामाजिक लाभाचे पुरावे दिसू लागले आहेत. जीवनमान उंचावणाऱ्या अनेक उपायांचा एक भाग म्हणून हा महामार्ग आज महाराष्ट्राच्या दोन टोकांपर्यंतच्या वाटचालीत अभिमानाने मिरवतो आहे. असाच एक सांस्कृतिक दुवा म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या स्वप्नातील दुसऱ्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाकडे पाहावे लागेल. केवळ विदर्भातील नागपूरपासून निघून राज्याच्या दुसऱ्या टोकास असलेल्या शेजारच्या गोवा राज्याला जोडणाऱ्या शक्तिपीठ नावाच्या या महामार्गावरही समृद्धीच्या साथीने महाराष्ट्राने पाहिलेल्या प्रत्येक स्वप्नाची पूर्तता करण्याची जबाबदारी आहे. हा केवळ दोन भौगोलिक प्रांतांना जोडणारा रस्ता नव्हे, तर या रस्त्याच्या मार्गावरील तीर्थस्थळे, व्यापार केंद्रे, शेती आणि समाजजीवनाची संस्कृती यांना सांधणारा दुवा ठरणार आहे. समृद्धी महामार्गाच्या कामास सुरुवातीस ज्या अनेक कारणांनी विरोध झाला, त्यात राजकीय विरोध हे कारण महत्त्वाचे होते. असे महामार्ग राज्याच्या विकासाचे सेतू ठरतात, हे माहीत असूनही त्याच्या विरोधात जनमानसात संभ्रम पसरविण्याचे राजकीय प्रयत्न झाले. मात्र, सारे गैरसमज दूर करून समाजाचा सकारात्मक सहभाग मिळविण्यात सरकारला यश आले. अशा विकास प्रकल्पांना साधारणतः पर्यावरण आणि शेतीचे संभाव्य नुकसान यांच्या भीतीमुळे विरोध होत असतो. ते साहजिकही आहे. समृद्धी महामार्गाच्या प्रकल्पाने या भीतीची सर्व कारणे समंजसपणाने दूर करून पूर्तता गाठली. आता या प्रकल्पामुळे मिळणाऱ्या लाभाची गणिते शेतकऱ्यास उमजू लागली आहेत. पर्यावरणाचे संतुलन राखून प्रकल्प उभे करताना, पर्यावरणाची संभाव्य हानी भरून काढणारे पर्यायी स्रोत वापरणे गरजेचे असते. याचे भान राखले गेले, तर सहसा विकास आणि पर्यावरण यांचा समतोल बिघडत नाही. शक्तिपीठ महामार्गाचा संकल्प पूर्ण करताना याचे भान ठेवण्याची ग्वाही फडणवीस यांच्या सरकारने राज्याला दिली आहे. शेतकऱ्यांचे सारे संभ्रम दूर करून, हा प्रकल्प अपायकारक नव्हे, तर उपकारक ठरेल, याची खात्री पटविल्याखेरीज प्रकल्प पुढे दामटला जाणार नाही, अशी स्पष्ट ग्वाहीदेखील त्यांनी दिली आहे. त्यामुळेच समाजात संभ्रम माजवून विकासाच्या प्रकल्पास विरोध करण्याच्या राजकारणाचा फारसा प्रभाव या प्रकल्पावर पडणार नाही. बुधवारी विधिमंडळ अधिवेशन काळात राज्यातील काही शेतकऱ्यांना एकत्र आणून विरोधकांनी या प्रकल्पाविरोधातील आवाज राजधानी मुंबईत उमटविण्याचा प्रयत्न केला. मात्र, विरोधकांच्या या राजकीय खेळीत सहभागी होऊन विरोधासाठी एकवटलेल्या प्रत्येक शेतकऱ्याचे समाधान केल्याखेरीज प्रकल्प पुढे जाणार नाही, ही सरकारची भूमिका स्वागतार्ह आहे. विरोध करणाऱ्यांची मानसिकता हळूहळू बदलत आहे. अगोदर विरोधात असलेल्या अनेक शेतकऱ्यांनी आता नव्या बदलाच्या स्वागताची तयारी सुरू केली आहे आणि विरोधकांच्या आंदोलनात सहभागी असलेल्या शेतकऱ्यांहून अधिक संख्येने प्रकल्पाची मागणी करणारे शेतकरी सरकारसोबत उभे राहात आहेत, हे चिन्ह समाजातील सहभागाची भावना रुजत चालल्याचे समाधानकारक चित्र दर्शविते. राज्याचा विकास, वारसा, संस्कृती आणि परंपरांची देवाणघेवाण करणारा शक्तिपीठ महामार्ग झाला, तर समृद्धीच्या स्वप्नास अधिक बळ येईल आणि विकसित भारताच्या वाटचालीचा झेंडा खांद्यावर मिरविण्याचा मान महाराष्ट्राला मिळेल तसेच व्हायला हवे यासाठी सहभागाच्या जबाबदारीची जाणीव जपायला हवे.

## दृष्टिक्षेप

विजय पांढरीपांडे

# मी कॉमन मॅन बोलतोय...!

मी कॉमन मॅन बोलतोय. आर. के. लक्ष्मणचा कॉमन मॅन. तुम्ही विसरला असाल कदाचित. म्हणजे आजच्या पिढीला माहितीदेखील नसेल कोण आर. के. लक्ष्मण? कोण कॉमन मॅन? अनेक वर्षांपूर्वी सकाळी उठून त्याचेच दर्शन व्हायचे टाइम्सच्या पहिल्या पानावर. चेकचा कोट घातलेला, काहीसा गबाळा दिसणारा, भांबावलेला, गरीब, तुमच्या-आमच्यातला ,वरपांगी बावळट वाटणारा, पण अवतीभवतीच्या घटनांवर, राजकारणावर कमीत कमी शब्दात तिखट भाष्य करणारा कॉमन मॅन. आज तो असता तर तुटून पडला असता या राजकारणी पुढाऱ्यांवर, स्वतःला समाजसेवक म्हणविणाऱ्या ढोंगी, भ्रष्टाचारी नेत्यावर! आता आर. के. लक्ष्मण नाहीत. त्यांचा कॉमन मॅन नाही, पण कुणीतरी ते काम करण्याची गरज आहे. सरकारच्या डोळ्यात अंजन घालण्याची, त्यांना त्यांची जागा दाखवून देण्याची खरेच गरज आहे.

स्वातंत्र्यानंतर कधी नव्हे ते राजकारण चिखलाने अक्षरशः बरबटले आहे. अतिशय खालच्या स्तराला गेले आहे. निष्ठा, नैतिकता या शब्दांची लक्तरे करून टाकली आहेत या मंडळींनी. चारित्र्यवान पुढारी दिवा घेऊन शोधावे लागतील, अशी परिस्थिती आहे. मेजॉरिटीने आलेली लोकशाही, म्हणजे हवे तसे वागण्याचे, बोलण्याचे, वाटेल ते करण्याचे स्वातंत्र्य, असा घेतला आहे या ढोंगी राजकारणी मंडळींनी! पक्ष कुठलाही असो, सगळेच एका माळेचे मणी. कोण कुणाशी, का युती करतो, कोण कुणाचा हात धरतो, कुणाचा सोडतो, कुठल्या पक्षातून निवडून येतो, मग कुठल्या पक्षात जातो याचा काहीच भरवसा राहिलेला नाही. आपण यांना कुठल्या अपेक्षेने, विश्वासाने निवडून दिले, का निवडून दिले त्याच्याशी म्हणजे मतदारांशी यांचे आता काही देणे-घेणे उरले नाही. एकदा का हे निवडून आले की, मग ते अनभिषिक्त राजे झालेत. ज्यांनी निवडून दिले ती जनता गेली चुलीत! आमच्यासारखे कॉमन मॅन गेले खड्ड्यात! आपण म्हणजे त्यांच्यासाठी किस झाडकी पत्ती! सत्तेवर आलेत की यांच्यासाठी भ्रष्टाचाराचे, अत्याचाराचे, रान मोकळे! आम्हाला यांच्या राजकारणाचा नेमका अर्थच कळेनासा झाला आहे. यांची युती, यांची आघाडी, यांचे एकत्र येणे, हातात हात घालून ते वर करीत एकतेची ग्वाही देणे, मग एकमेकांवर चिखलफेक करणे, हे



राजकारणाचे सोयीचे गणित आमच्या समजुतीपलीकडचे आहे. यांच्यापैकी काही तर उच्चशिक्षित आहेत. मोठमोठ्या संस्थेतले हुशार म्हणविणारे उच्चशिक्षित, सुसंस्कृत पदवीधर. त्यांना भ्रष्टाचार घालवायचा होता. साफसफाई करायचा वसा घेऊन ते राजकारणात आले. स्वतःला निष्कलंक, स्वच्छ, निःस्वार्थी म्हणविणारे हेच महालाची स्वप्ने बघायला लागले. सत्ता भोगायला लागले. चक्क जेलमधून सत्ता चालवायला लागले. आपले नियम, कायदा, संविधानाच्या सवलती कशाही वाकवून, त्याचे सोयीचे अर्थ लावून ही मंडळी न्यायालयाच्यादेखील डोळ्यात धूळफेक करीत आपला मुद्दा रेटून धरतात. त्यामुळे खरे-खोटे काय, न्याय-अन्याय काय, चांगले-वाईट काय याचे अर्थही बदलत चालले आहेत. हे काय गौडबंगाल आहे, ते आमच्यासारख्या कॉमन मॅनला कळेनासे झाले आहे.

किती मोठा विरोधाभास आहे हा! आमच्यासाठी कायदे करणारी मंडळी स्वतःच कायदे पायदळी तुडवत आहेत. गुन्हेगारांना संरक्षण देत आहेत. त्यात भागीदार आहेत अन्? वर स्वच्छ पारदर्शी प्रशासन, लोकांच्या भल्यासाठी निर्णय घेणारे शासन, अशा घोषणा देत आहेत. ही संविधानाचीच प्रतारणा आहे. ज्यांनी यांना निवडून दिले, सत्तेत पाठवले त्या जनतेशी विश्वासघात आहे. ही एक प्रकारे लोकशाहीची विटंबना आहे. हे असे एकाएकी कसे बिघडले, रसातळाला गेले हे देखील न उलगडणारे कोडेच आहे कॉमन मॅनसाठी. कुणालाही कायद्याची भीती राहिलेली नाही. अगदी जेलमध्ये महिनोन्महिने राहून आलेले उजळ माथ्याने समाजात वावरताना दिसतात. सत्ता भोगताना दिसतात अन्? कॉमन मॅनसाठी मात्र नियम वेगळे. साध्या गुन्ह्याखालीदेखील त्याला जेलमध्ये खितपत पडावे लागते. कोर्टाच्या पायऱ्या झिजवाव्या लागतात. साधा अपराध असला, तरी त्याच्या नोकरीवर टाच येते. निलंबन होते. म्हणजे या पुढाऱ्यासाठी नियम वेगळे. कॉमन मॅनसाठी नियम वेगळे. न्याय वेगळा.

आता राजकारणाचे प्रचंड गुन्हेगारीकरण झाले आहे. ही मंडळी तरुण पिढीला नादी लावतात. त्यांना स्वतःच्या स्वार्थासाठी गुन्हेगारीसाठी प्रवृत्त करतात. न शिकता, कष्ट न करता पैसा हाती खेळत असेल, मौजमजा करायला मिळत असेल तर ते कुणाला नको आहे? त्यातही मोठ्या वडाच्या सावलीत आरामात ऐश करायला मिळत असेल, थोडीफार प्रसिद्धी मिळत असेल तर कुणाला नको आहे? आजची तरुण पिढी म्हणूनच या मृगजळामागे मोर्चात, आंदोलनात फरफटत वाहवत जाताना दिसते. कोवळ्या वयात गुन्हेगारी जगात आपले आयुष्य, भविष्य बरबाद करताना दिसतात. कसलाही कामधंदा, उद्योग, व्यवसाय न करणाऱ्या या मंडळीकडे आलिशान गाड्या, हातात-गळ्यात सोन्याचे दागिने येतात कुठून? हे प्रश्न आहेत आमच्यासारख्या कॉमन मॅनचे. कशासाठी निवडून देतो आम्ही यांना? कशासाठी होतात करोडो रुपये खर्च करून निवडणुका? कशासाठी सर्व सामान्य जनता खर्च करते, कर भरते या सत्ताधाऱ्यासाठी? आहे कुणाकडे उत्तर, स्पष्टीकरण? कुठे चालला आहे हा सुजलाम् सुफलाम् म्हणवणारा देश, प्रदेश? कोण करेल कॉमन मॅनचे शंका समाधान?

केवळ तांत्रिक प्रगतीचा देखावा, वरवर दिसणाऱ्या सुखसोयी याला समृद्धीचा महामार्ग म्हणत नाही. जोपर्यंत देशाचा प्रत्येक नागरिक, कॉमन मॅन, स्वच्छ, प्रामाणिक, चारित्र्यसंपन्न होणार नाही तोपर्यंत भारत भाग्यविधाता, विश्वगुरू होऊ शकणार नाही.

७६५९०८४५५५

## वेध

संजय रामगिरवार

# वैदर्भीय होळी परंपरा!

पानझड झाली आणि पळस फुलायला लागला की, होळीची चाहुल लागते. फाल्गुन पौर्णिमेला येणारा हा सण वैदर्भीयांसाठी महत्त्वाचा आहेच; त्यातल्या त्यात मेळघाटातील सात दिवसांची होळीही प्रसिद्ध आहे. तेलंगणा-आंध्रप्रदेशला लागून असलेल्या चंद्रपूर-गडचिरोलीसारख्या जिल्ह्यांत होळीची वेगळी परंपरा आहे. ही परंपरा आता जशीच्या तशी साजरी होत नसली, तरी तिच्या पाऊलखुणा कायम आहेत. आधी 'दायी दायी, दायी अम्मा...' असे गीत गात मुले घरोघरी हिंडायची. बांबूच्या काड्या एकमेकांवर मारत अगदी तालबद्ध व बहारदार गीत म्हणायची. तेलगू भाषेत असल्याने ते समजायचे नाही. त्यानंतर घराघरातून त्यांना होळी सण साजरा करायला पैसे मिळायचे.

कोकणातील शिमगोत्सव, पालखी नाचवणे उल्लेखनीय आहे, तसे आपल्याकडेही मेळघाटातील वनवासी बांधवांची होळी प्रसिद्ध आहे. नव्हे, या भागातला हा सर्वात मोठा उत्सव आहे. एकवेळ दिवाळीला येथील आदिवासी बांधव नवीन कपडे घालणार नाहीत, पण होळीला प्रत्येक जण नव्या पेहरावात दिसतो. बाकड्या, जेमका, तेड्या, पायापाकडा, आडे, चंपा यासारखी चांदीची दागिने विकत घेऊन ती अंगावर मिरविली जाते. आता नव्या पिढीत थोडा फरक पडला असला, तरी बरेच जण ही परंपरा जपतात. विशेष म्हणजे मेळघाटातील होळी उत्सव हा एक किंवा दोन दिवसाचा नसतो, तर तो सात दिवस चालणारा असतो. तिकडची जवळपास ३०० गावे तिथीनुसार नव्हे, तर गावपंचायतीने ठरवून दिलेल्या दिवशी होळीचा उत्सव साजरा करतात. ज्या गावी बाजार असतो, त्याच्या दुसऱ्या दिवशी त्या त्या गावी



होळीचे दहन होते. लोक कामानिमित्त कुठेही असली, तरी होळीला आपल्या घरी परततात. आठवडाभरापासूनच आदिवासी बांधवांच्या घरांतून ढोलकी आणि बासरीचा मधुर आवाज घुमतो. मेळघाटात दोन होळ्या पेटवल्या जातात. एक मोठी, दुसरी लहान होळी असते. या होळीत गवऱ्या, बांबू, लाकडे जाळली जातात आणि त्याभोवती आदिवासी बोली भाषेतील गाण्यांवर फेर धरला जातो. घराघरांतून नैवेद्य येतो आणि तो होळीला दाखवून मगच ग्रहण केला जातो. तोवर त्यांचा उपवास असतो. काही जण रस्त्यावर येऊन होळीसाठी 'फगवा'ही मागतात.

तिकडे भंडारा-गोंदियाकडेही काही ठिकाणी वैशिष्ट्यपूर्ण होळी साजरी होते. गवराळा गाव होळी व धुळवडीला भक्तिसागरात रंगतो. सर्वत्र धूलिवंदनाला रंगांची उधळण होत असते. मात्री हे गाव या सार्वत्रिक परंपरेला त्या क्षणी छेद देत असते. मागील ३२ वर्षांपासून ही आगळी परंपरा सुरू आहे. खरे तर, चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रह्मपुरी तालुक्यातल्या बेलगाव येथील किशन अवसरे बाबा महाराज गवराळा गावी दाखल झाले. महाराज शेवटपर्यंत या गावच्या विकासासाठी झटले. १९९२ मध्ये रंगपंचमीच्या दिवशी अवसरे महाराजांनी गावात प्रभातफेरी काढून वर्गणी गोळा केली. दुपारी मंदिरात आले. स्वतः स्वयंपाक करून जेवण केले आणि सव्वा चार वाजता त्यांचे देहावसान झाले. या घटनेमुळे व्यथित झालेल्या गावकऱ्यांनी पुढे कधीही रंगपंचमी साजरी केली नाही. त्या दिवशी विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. होळीत लाकडांऐवजी केरकचरा व टाकाऊ पदार्थ जाळले जातात. रात्रीला भजन-कीर्तनादी कार्यक्रम होतात.

होळीला विदर्भातील ग्रामीण भागात आजही लाकडं गोळा करून 'घानमाकड' तयार होताना दिसतील. गाईच्या शेणापासून गवऱ्या तयार करून होळीला माल्यार्पण करण्याची परंपरा आहे. वर्धा जिल्ह्यात तर 'पीपल्स फॉर एनिमल' ही महिलांची संघटना दिवसाला अशा दीड-दोनशे गोवऱ्या तयार करते. त्या विकल्या जातात आणि त्यातून आलेले पैसे गाईच्या चाऱ्यासाठी वापरले जातात. होळीला होणारी पुरणपोळी, धूलिवंदनाला 'बुरा न मानो होली है... ' म्हणत एकमेकांना रंग लावणे, बोंबा मारणे, साखरेच्या गाठ्या वाटणे या परंपरेसोबतच काही नव्या चालीरीती जुळल्या असल्या, तरी होळीचा जुना 'बेस' अजूनही कायम आहे आणि तो कायम राहणे आवश्यक आहे... धूलिवंदनाच्या शुभेच्छा!

९८८१७१७९३२

## दखल

मोरेश्वर बडगे

# या कबरीची गरज आहे का?

छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनावरचा 'छावा' हा चित्रपट सुपरहिट झाला आहे. ५०० कोटी रुपयांपेक्षा अधिक पैशांचा गल्ला या चित्रपटाने आतापर्यंत कमावला. पण त्यापेक्षा संभाजी महाराजांचे बलिदान ज्या पद्धतीने 'छावा'ने देशापुढे आणले ते अधिक महत्त्वाचे आहे. महाराजांना सहावा मुगल सम्राट औरंगजेबाने हालहाल करून मारले ते पाहताना माणूस पेटून उठतो. धर्म बदलला असता तर संभाजी महाराज वाचले असते. पण त्यांनी धर्माला आयुष्य मानले. देश, देव आणि धर्मासाठी माणसाने काय करायचे असते त्याचा नमुना महाराजांनी पेश केला. सेक्युलर हिंदुत्वाच्या गप्पा मारणाऱ्यांना ही सणसणीत थप्पड आहे. हिंदुत्वाची एवढी जबरदस्त ओळख प्रथमच कुण्या सिनेमाने करून दिली. 'छावा' लोकसभा निवडणुकीच्या आधी आला असता तर निकाल काही वेगळे लागले असते.

या चित्रपटानंतर औरंगजेब पुन्हा चर्चेत आला आणि वाद रंगू लागले. औरंगजेब वयाच्या ८८ व्या वर्षी मेला. मेला त्या गोष्टीला आज ३१८ वर्षे झाली. मात्र, स्वतःला सेक्युलर म्हणवणारी काही मंडळी आजही त्याच्यात आपली खानदान शोधू पाहतात. 'तो कुशल प्रशासक होता' असे समाजवादी पक्षाचे आमदार अबू आझमी म्हणाले तेव्हा त्याची जबरदस्त प्रतिक्रिया उमटली. मुळात तो अतिशय क्रूर होता. सत्तेसाठी त्याने आपल्या वडिलांना तुरुंगात टाकले, भावांना ठार केले. त्याला 'शहेनशहा' व्हायचे होते. तब्बल २७ वर्षे तो महाराष्ट्रात राहिला, पण त्याला मराठ्यांना नेस्तनाबूत करता आले नाही. परतही जाता आले नाही. इथल्या मातीतच मरावे लागले. मराठवाड्यातील औरंगाबाद म्हणजे आजच्या छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील खुलताबाद येथे औरंगजेबाची कबर आहे. 'ही कबर उखडून टाकली पाहिजे' असे छत्रपतींचे १३ वे वंशज आणि भाजपाचे खासदार उदयनराजे भोसले संतापून म्हणाले. मुख्यमंत्री देवेंद्र फफडणवीस यांचीही यावर प्रतिक्रिया आली. फडणवीस म्हणाले, ''प्रत्येकाला तसे वाटते, पण आपण कायद्याने चालणारे लोक आहोत. औरंगजेबाच्या कबरीला केंद्र सरकारच्या पुरातत्त्व खात्याचे संरक्षण आहे.'' म्हणजे चेंडू केंद्र सरकारच्या कोर्टात आहे. केंद्रात नरेंद्र मोदी आहेत, हिंदुत्ववादी सरकार आहे. पण औरंगजेबाचे थडगे हा साधा विषय नाही. मुसलमानांची मतं भाजपाला तशीही फारशी मिळत नाहीत. भाजपाला ते टेन्शन नाही. पण गडबड झाली तर जागतिक पडसाद उमटतील हे टेन्शन असणार. त्यामुळे डोक्याने लढावे लागेल. हिंदूंना हवे ते योग्य वेळी होईल. बाबरी मशिदीचे कुठे काय ठरले होते? पण पडलीच. अयोध्येला राम जन्मभूमीमध्ये रामललाचे कधी मंदिर होईल, असे कोणाला वाटले होते? 'मंदिर वही बनायेंगे,



पर तारीख नहीं बतायेंगे' असे टोमणे विरोधी नेते मारायचे. पण प्रभू रामचंद्रांचे मंदिर झाले. रामाचा बाण कोणाला अडवता आला आहे? औरंगजेबाच्या कबरीचाही एक दिवस हिशेब होईल. काँग्रेसच्या राजवटीने तुष्टीकरणाच्या दृष्टीने कायदे केले. त्याचे आपण बळी गेलो हे अजूनही अनेक भारतीयांच्या पुरते लक्षात आलेले नाही. ज्या दिवशी हे लक्षात येईल, त्या दिवशी काँग्रेस पक्ष रिकामा झालेला असेल. औरंगजेबाच्या क्रूरतेची निशाणी हा आपला वारसा कसा असू शकतो? मुस्लिमांची गठ्ठा मतं आपल्या खिशात राहावी यासाठी काँग्रेसने अनेक गोष्टी ऐतिहासिक वारसा यादीत टाकल्या. त्यामुळे ज्याने आमच्या महाराजांना छळ करून मारले त्या औरंग्याच्या थडग्याचे संरक्षण आमचे पोलिस करीत असल्याचे पाहायचे भोग हिंदूंच्या नशिबी आले आहेत. पुरातत्व खात्याच्या नावावर हे आजही खपवले जात आहे. कुठलं हे खातं आणि कुठले हे अधिकारी? ते आम्हाला आमचा वारसा सांगणार? औरंगजेब हा आपला वारसा कसा असू शकतो? भाजपाच्या राज्यातही हा प्रश्न कुणाला का पडू नये? पंतप्रधान नरेंद्र मोदींनी ब्रिटिश काळातले अनेक कायदे रद्द केले आहेत. त्यांना या कबरीसाठी तिसरा डोळा उघडावा लागेल.

मुळात ही कबर म्हणजे सुरुवातीला मातीचे साधे थडगे होते. पुढे त्याचे सुशोभीकरण केले गेले. संगमरवरी जाळीचा कठडा आला. निवडणूक आल्या की काही मंडळी तिथे चादर पांघरायला जातात. मतांच्या सोयीसाठी काँग्रेसवाल्यांनी लाड पुरवले. तुम्हाला धक्का बसेल. या कबरीच्या देखभालीसाठी केंद्र सरकार पैसे देते. वर्षाला सुमारे अडीच लाख रुपये दिले जातात. पण आमच्या रामललाकडे कोणाचे लक्ष होते? कित्येक वर्षे रामलला मेणकापडाच्या तंबूत पडून होता. कारसेवकांनी धक्का दिला तेव्हा विषय संपला. करायचे झाले तर पुरातत्त्व खाते बरेच काही करू शकते, पण कोण कुठे काय करतोय? आजही अधिकारी जुने दप्तर घेऊन पाट्या टाकत आहेत. त्यांना संभाजी कसा माहीत असणार? अडचण इथेच आहे. आज काय सुरू आहे? इतिहासाच्या आडून हिंदू समाजाबद्दल द्वेष पसरविण्याचे काम सुरू आहे. मी महत्त्वाचं सांगतो आहे. सरकार आपले आहे. मात्र ज्याला 'सिस्टिम' म्हणतात ती आपली नाही. ही सिस्टिम, ही मानसिकता कधी बदलणार आणि कोण बदलणार हा खरा चिंतेचा विषय आहे.

मंदिरं खूप आहेत. मात्र शिवाजी महाराज, संभाजी महाराज यांची मंदिरं तुम्हाला दिसतात? आपण ज्याला आपले आराध्यदैवत मानतो त्या महाराजांचे मालवण किल्ल्यावर शिवराजेश्वराचे एकमेव मंदिर आहे. तिथल्या खर्चासाठी वर्षाला २१०० रुपये दिले जातात. म्हणजे महिन्याला २५० रुपये. कबरीच्या डागडुजीसाठी सरकारकडे पैसा आहे. महाराजांच्या मंदिरांसाठी नाही. कोणाकडे रडायचे? किल्ले रायगडावर मेघडंबरी आहे. तिथल्या खर्चाची तरतूद करता आली नाही. गप्पा दुनियाभराच्या. महाराजांचे नाव घेऊन शपथा घेतल्या जातात. मात्र त्या राजाचे गडकिल्ले भग्नावस्थेत आहेत, त्याची कोणाला चिंता आहे? परवाच्या अर्थसंकल्पात तीन नवे स्मारकं करण्याची घोषणा आहे. त्या घोषणा निव्वळ घोषणाच राहणार नाहीत, याची काय गॅरंटी? महाराजांचे समुद्रात स्मारक उभारण्याच्या घोषणेला काही वर्षे लोटली. जल पूजनापलीकडे काहीही झालेले नाही. महापुरुषांची एकूण आठ स्मारके अपूर्णावस्थेत आहेत. तरीही तीन नव्या घोषणा झाल्या. आग्रा, पानिपत आणि संगमेश्वर येथे ही तीन नवी स्मारके होणार आहेत. स्मारकं करा. पण त्याच वेळेला महाराजांबद्दल कुणी चुकीचं बोलणार नाही, याचीही काळजी घ्या. तसे वातावरण निर्माण करा. एक लक्षात घ्या. औरंगजेबाचे उदात्तीकरण सहन करणे म्हणजे संभाजी महाराजांच्या बलिदानाचे महत्त्व कमी करण्यासारखे आहे. अमेरिकेकडून या बाबतीत काही शिकता येईल. इस्लामिक दहशतवादी ओसामा बिन लादेन याचे पार्थिव अमेरिकेने समुद्रात फेकून दिले. आपण या औरंग्याचे मढे इतकी वर्षे का झेलतो आहोत? मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या बाबतीत सरकारची कडक भूमिका विधानसभेत जाहीर केली. त्याबद्दल त्यांचे स्वागत केले पाहिजे. राज्यात प्रार्थनास्थळांवर भोंगे लावून ध्वनिप्रदूषण केले जाते. न्यायालयाच्या आदेशानंतरही पोलिस या ध्वनिप्रदूषणाकडे दुर्लक्ष करतात, असे पाहायला मिळते. भोंगे वाजवण्यासंबंधात विशिष्ट नियम आहेत. ते मोडले तर स्थानिक पोलिसांना जबाबदार धरले जाईल, अशी घोषणा मुख्यमंत्र्यांनी विधानसभेत केली. रात्री १० ते सकाळी ६ वाजेपर्यंत भोंग्यांचा वापर करण्यास बंदी घालण्यात आली आहे. सरसकट कोणालाही भोंगे लावता येणार नाहीत. पोलिसांची परवानगी घ्यावी लागेल. भोंग्याला आवर घालायचा प्रथमच प्रयत्न झाला आहे. 'सकाळच्या भोंग्या'चाही बंदोबस्त झाला पाहिजे.

९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

## वाचक पत्रे

### अमेरिका आयात वस्तूवर टॅक्स लावणार

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतासह जगातील अनेक देशांना देण्यात येणारी 'अमेरिकन आर्थिक मदत बंद' तसेच आयात केलेल्या वस्तूंवर आयात कर लावण्याचे धोरण जाहीर केले आहे. त्यानुसार आता अमेरिकेतून आयात केल्या जाणाऱ्या वस्तूवर टॅक्स द्यावा लागणार आहे. भारतात



अमेरिकेतून मोठ्या प्रमाणावर वस्तू आयात केल्या जातात. त्यामध्ये प्रामुख्याने सिमेंट, तेल, खनिजे, धातू, कच्चे पेट्रोल, स्टील, गॅस, वैद्यकीय उपकरणे, कापड, रसायने इ.चा समावेश आहे. या सर्व वस्तूंवर आयात कर द्यावा लागणार आहे. गुडघ्याच्या 'नी रिप्लेसमेंट सर्जरी'साठीची चीपदेखील अमेरिकेतून आयात केलेली असते. या सर्व वस्तूंच्या आयातीमुळे भाववाढ अटळ आहे. यासाठी देशात होणारी आयात कमी केली पाहिजे. देशाने आत्मनिर्भर होणे गरजेचे आहे. देशी वस्तूंच्या वापराला प्रोत्साहन दिले पाहिजे. गरजा कमी केल्या पाहिजेत. अमेरिकेची मदत बंद झाली आणि आयातीवर कर द्यावा लागण्याने जगातील अनेक देशाबरोबरच भारतातील अर्थव्यवस्थेवर ताण वाढणार आहे. अशा अवस्थेत तिसरे जागतिक युद्ध झाले तर देशाच्या एवढ्या प्रचंड लोकसंख्येला जगविणे कठीण होईल. यासाठी देशाने जागतिक शांततेसाठी प्रयत्न केले पाहिजेत.

**ॲड. बळवंत रानडे**/९८८१४७३५८०

### अघोरी प्रथा बंद होणे आवश्यक

आपल्या समाजात सण, समारंभ, उत्सव हे मानवी जीवनाचा अविभाज्य भाग आहेत. वैयक्तिक आणि सामाजिक जीवनातील ताणतणाव सैल व्हावेत, सामाजिक एकोपा, स्नेह, कृतज्ञभाव वृद्धिंगत व्हावा, सर्वांना आनंद मिळावा, मनोरंजन घडावे अशा अनेक चांगल्या गोष्टींसाठी सण, समारंभ, उत्सव साजरे करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र राज्याच्या ग्रामीण-आदिवासी भागातील अनेक गावांच्या ग्रामदैवतांच्या जत्रा-यात्रांचे आयोजन हा त्यापैकीच एक मोठा आनंदोत्सव, मनोरंजन, कलाकुसरींचे सादरीकरण, कष्टमय जीवनाला थोडासा विश्राम, विरंगुळा, गाठीभेटी अशा अनेक इष्ट उद्देशाने या जत्रांचे आयोजन केले जात असते. काही गावांमधून तर वर्षभरात एकाच गावात टप्प्याटप्प्याने दोन दोन ग्रामदैवतांच्या जत्रा आजही भारतात. आजही अशा अनेक जत्रा-यात्रांमधून परंपरा पालनाचा आणि धर्मचारणाचा भाग म्हणून अनेक अनिष्ट, अघोरी, अमानुष रूढी, प्रथा जतन करून त्या तशाच्या तशा जोपासल्या जातात. अनेक जत्रा-यात्रांमधून नवसापोटी प्राण्यांचे बळी देण्यात येतात. जत्रेच्या निमित्ताने इतर सांस्कृतिक कार्यक्रम भलेही ठिकठिकाणी वेगवेगळे होत असतील. परंतु त्या सर्वांमध्ये एक समान भाग आढळतो आणि तो म्हणजे देव-देवतांचे नवस फेडण्यासाठी उघड्यावर पशुपक्षी बळी देण्याची अनिष्ट व अघोरी प्रथा होत असल्याचे दिसून येते. विशेष म्हणजे हे जसे हिंदूंच्या देवदेवतांच्या नवसपूर्तीच्या बाबतीत घडते तसेच मुस्लिमांच्या अनेक दर्ग्यांवर, पिराच्या ठिकाणीही मन्नतीची पूर्ती म्हणून पशुबळी दिले जातात. जत्रा-यात्रांचे आयोजन जरूर करावे. त्यामध्ये मनोरंजनाचे, संस्कृती संवर्धनाचे, विविध प्रकारच्या स्थानिक समस्या निवारणाचे उत्सव, कार्यक्रम, उपक्रम सादर करता येतील आणि त्या दिशेने अशा जत्रा-यात्रांची वाटचाल सुरू होणे आवश्यक आहे.

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

### स्वसंरक्षण हाच खरा सन्मान!

मार्च १९१० मध्ये अमेरिकेतील कोपनहेगन येथे भरलेल्या दुसऱ्या आंतरराष्ट्रीय समाजवादी महिला परिषदेत वस्त्रोद्योगातील स्त्री-कामगारांनी केलेल्या ऐतिहासिक आंदोलनाच्या स्मरणार्थ दरवर्षी ८ मार्च हा जागतिक महिला दिन म्हणून साजरा केला जातो. भारतात वर्ष १९४३ पासून हा दिवस साजरा करायला आरंभ झाला. यानिमित्त विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिलांचा सत्कार केला जातो. ही महिलांसाठी अतिशय गौरवाची बाब आहे. मात्र, केवळ सत्कार करण्याने महिला दिन साजरा होऊ शकतो का? त्यासाठी महिला सन्मानाचा खरा अर्थ समजून घेतला पाहिजे. केवळ एका दिवसापुरते कौतुक करून उपयोग नाही. महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न आज अधिक महत्त्वाचा आहे. देशात महिलांवरील अत्याचार, बलात्काराच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. एखाद्या स्त्रीवर, मुलीवर अत्याचार झाल्यानंतर त्याचे पडसाद देशभरात उमटतात. चौकाचौकांत निदर्शने होतात, पोलिसांवर दगडफेक केली जाते, मेणबत्ती घेऊन मोर्चे निघतात; मात्र जनतेचा हा क्षोभ काही दिवसांतच शांत होतो. जेव्हा महिलांमधील शौर्य जागृत होईल तेव्हाच ती खऱ्या अर्थाने सक्षम बनेल. याकरिता प्रत्येक महिलेने स्वसंरक्षण प्रशिक्षण घेणे अत्यंत गरजेचे आहे. स्वसंरक्षण हा महिलांचा खरा सन्मान आहे!

**वर्षा आवदे**/नागपूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

## संक्षिप्त वृत्त

### फिनेल प्राशनाने महिलेचा आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर, दि. १४ मार्च-**

मार्केट यार्ड परिसरातील गोंधळे वस्ती येथील महिलेने अज्ञात कारणातून गुरुवारी दुपारी ३.३० वाजता फिनेल प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला. सजा आसिफ खान (वय ४५) असे महिलेचे नाव आहे. गुरुवारी दुपारनंतर सजा यांनी राहत्या घरात अज्ञात कारणातून फिनेल प्राशन केले. यात त्रास होऊ लागल्याने ४.५० वाजता मावशी यांनी उपचारास शासकीय रुग्णालयात दाखल केले. या घटनेची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### वळणावर दुचाकी घसरल्याने दोघे जखमी

**सोलापूर, दि. १४ मार्च-**

रंगभवन चौक ते हरिभाई देवकरण प्रशालेच्या दिशेने जाताना रंगभवन चौकापासून काही अंतरावरील वळणावर अचानक दुचाकी घसरल्याने दोघे जखमी झाले. हा अपघात गुरुवारी दुपारी तीनच्या सुमारास घडला. नरेंद्र अंबादास गुंजेटी (वय २०, रा. सुनील नगर एमआयडीसी) व आदिनारायण अमर येनगंटी (वय १९, रा. अशोक चौक) असे जखमी झालेल्यांची नावे आहेत. गुरुवारी दुपारी तीनच्या सुमारास नरेंद्र आणि आदिनारायण हे दोघे रंगभवन चौकातून पुढे हरिभाई देवकरण प्रशालेच्या दिशेने जात होते. दरम्यान रंगभवनपासून काही अंतरावरील वळणावर दुचाकी घसरली. यात नरेंद्र हा दोन्ही हाताला आणि पायाला तर आदिनारायणच्या उजव्या पायाला जखम झाली तर हात खरचटल्याने इरेश मुनवयान याने उपचारास शासकीय रुग्णालयात दाखल केल्याची नोंद सिव्हील चौकीत झाली आहे.

Classifieds

**भाड्याने देणे**

**युनिक हॉस्पिटलजवळ सलग २ गाळे ऑफिस, कुरिअर, डॉक्टर, वकील, थेरपीसेंटर, एजन्सी, गोडाऊन वगैरेसाठी भाड्याने देणे. विष्णू पंपटवार-९८८१२४३६९०**

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.

### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः जि. सोलापूर व तालुका व बार्शी शहर व आसपासच्या लोकांना खरेदीपूर्व जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की-

डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी शहर बार्शी नगरपरिषद हद्दीमधील घरजागा याचा सि.स.नंबर १६०१/२ब/१ याचे एकूण क्षेत्र ५६.२० चौ.मी. आहे. या एकूण क्षेत्रामध्ये जानी दादामिया मुकेरी यांच्या मृत्यू पश्चात त्यांचे वारसांनी मिळलेले क्षेत्र १८.७३ चौ.मी. असे क्षेत्र जानी दादामिया मुकेरी यांचे कायदेशीर वारसदार मुसा जानीमियाँ मुकेरी व नसिमा मैनुद्दीन पठाण यांचे नावे सि.स. उताऱ्यास आज रोजी मालकी हक्की आहे. असे १८.७३ चौ.मी. क्षेत्र यामध्ये आर.सी.सी. स्वरुपाचे बांधकाम आहे. यामध्ये दोन रुम व जिना व लाईट कनेक्शन, नळ कनेक्शनसह जागा मालकी हक्क अधिकार, वहिवाटीचे अधिकार व तदंगभूत वस्तूसह संपूर्ण जागा याची चतुःसिमा- पूर्व- इसाक मुकेरी यांची जागा व रस्ता, पश्चिम- सलमान खान मुसा मुकेरी यांची जागा, दक्षिण- गाढवे यांची जागा, उत्तर- इसाक मुकेरी यांची जागा.

येणे प्रमाणे जागा आतील बांधकामासह मुसा जानीमियाँ मुकेरी व नसिमा मैनुद्दीन पठाण यांनी त्यांच्या कौटुंबिक कायदेशीर गरजेकरीता म्हणून विक्रीस काढली व सदर घरजागा आमचे अशिल यांनी बाजारभावाने विकत घेणेचे ठरवून मुसा जानीमियाँ मुकेरी व नसिमा मैनुद्दीन पठाण यांचे बरोबर नमूद जागा विकत घेणेचे लेखी ठराव केलेला असून मुसा जानीमियाँ मुकेरी व नसिमा मैनुद्दीन पठाण यांनी आमच्या अशिलाकडून रोख रक्कम साक्षीदारा समक्ष इसारा दाखल घेतलेली आहे व नमूद जागा आमचे अशिलास निर्वेध व निजोखमी, बिनबोजाची असल्याची ग्वाही व खात्री दिलेली आहे व उर्वरित रक्कम घेऊन स्वतः हजर होऊन नमूद जागेचे खरेदीखत आमचे अशिलाचे हक्कात करुन देणेचे मान्य व कबूल केलेले आहे.

तरी या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, वरील नमूद मिळकतीबाबत कोणाचे काही कायदेशीर हक्क, हितसंबंध, खरेदीखत, साठेखत, गहाण, दान, लीज, बोजा, मृत्यूपत्र, दानपत्र, बँक बोजा, कर्ज, खाजगी सावकारी कर्ज व इतर प्रकारचे कसल्याही प्रकारे कायदेशीर हितसंबंध असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत संबंधितांनी खालील पत्त्यावर स्वतः अथवा विधीज्ञामार्फत लेखी पुराव्यासह हरकती द्यावेत. नमूद मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल वरील मिळकतीबद्दलचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कसलीही हरकत चालणार नाही व ती आमचे अशिलाच्या खरेदी हक्कावर बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली. दिनांक : १४/०३/२०२५

सही/-
**ॲड. एस. आय. भोरी,**
रा. मनगिरे मळा, मंगळवार पेठ, बार्शी,
ता. बार्शी, सोलापूर. मो.नं. ९४२१०२७३९२
अशिलातर्फे ॲडव्होकेट.

## मुलांच्या गुणात्मक विकासावर पालकांनी भर द्यावा

### डॉ. रेवा कुलकर्णी यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर,दि.१४ मार्च -**

बालपणीच संतसाहित्यातील मनाचे श्लोक, अभंग, ओव्या पाठांतराची सवय मुलांचा गुणात्मक विकास करण्यासाठी उपयोगी ठरणार असल्याचे प्रतिपादन दयानंद महाविद्यालयातील संस्कृत विभाग प्रमुख डॉ. रेवा कुलकर्णी यांनी केले.

येथील देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्थेच्या वतीने दासनवमी निमित्त शालेय विद्यार्थ्यांसाठी घेतलेल्या पाठांतर स्पर्धेतील बक्षीसांचे वितरण डॉ. कुलकर्णी यांच्या हस्ते झाले. यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ. श्रीकांत येळेगावकर, विजय कुलकर्णी, खजिनदार सतीश पाटील, युवक अध्यक्ष सुशांत कुलकर्णी, कार्यकारिणी सदस्य शंकरराव कुलकर्णी, रविंद्र तुळजापूरकर, सुनिल माढेकर आदीसह उपस्थित होते. यादी वाचन सुशांत कुलकर्णी यांनी केले. कार्यवाह श्याम जोशी यांनी सूत्रसंचालन केले. उपाध्यक्ष दत्तात्रय आराध्ये यांनी आभार मानले.

**बक्षिस पात्र विद्यार्थी असे(प्रथम तीन) : छोटा गट :** शौर्य ननवरे (नूमवि) व सानवी कुलकर्णी (शि.प्र.मंडळी, विभागून), संनिधी हत्तुरे (शि.प्र. मंडळी) व शौर्या चिंचोलीकर (दमाणी, विभागून). साळुंके (सेवासदन) व श्रीपाद उंबरजे (ज.रा. चंडक विभागून). तनवी दवेवाले (ज.रा. चंडक) व वेदिका राजमाने (सिद्धेश्वर, उत्तेजनार्थ). **मोठा गट :** आकांक्षा बापट (नूमवी). विहान बिराजदार (शि.प्र. मंडळी). राजवीर मुंडे (शि.प्र. मंडळी) अद्रिका गवसने (दमाणी) व रुद्राक्षी



जाधवर (शि.प्र.मंडळी, उत्तेजनार्थ). **पहिली :** समर्थ फुटाणे, स्वरा चितली (दोघे मेहता). स्मरणिका शेळके (दमाणी), शार्वी गांधी (मेहता, उत्तेजनार्थ). **दुसरी :** रियांश पाटील (दमाणी), स्वरा करंटे (मेहता), प्रचिती काळे (दमाणी), श्रेयस किनगी (सिद्धेश्वर बालक मंदिर, उत्तेजनार्थ). **तिसरी :** वेदांत वरेकर, स्वरा माळगे (दोघे मेहता), श्रीनिधी हांडे (दमाणी), त्रिशा माकणे (वीरतपस्वी, उत्तेजनार्थ). **चौथी :** स्तुती कुलकर्णी (नूमवि), अजिंक्य लब्बा (मॉडर्न), श्रीराज मिणीयार (पुष्पागुप्ता दयानंद स्कूल), ओजस पेशवे (नूमवि, उत्तेजनार्थ).

### जाहीर समन्स

**मा. उपनिबंधक, सहकारी संस्था (परसेवा),**
सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स को-ऑप. असोसिएशन लि., सोलापूर १९३ (अ), सिद्धेश्वर पेठ, स्टेट बँक ऑफ इंडिया ट्रेझरी शाखे शेजारी, सोलापूर-४१३००१.

**महेश अर्बन को-ऑप. बँक लि., सोलापूर**
**४१८, दक्षिण कसबा, सोलापूर - अर्जदार**
**-विरुध्द-**
**(खालील तपशिलातील नमुद केलेले थकबाकीदार सभासद) - जाब देणार**

| अ. नं. | केस नंबर | दावा रक्कम | जाब देणार नं. | जाब देणार यांचे नाव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | १५२९/ २०२४-२०२५ | २,९६,४७७/- | १ | **सौ. संगीता रमाकांत कोनापुरे** रा. बिल्डींग नं ४७ वसंत नगर विजापूर रोड इंदिरा नगर सोलापूर - ४१३००४ |
| | | | ३ | **श्री. प्रकाश विठ्ठल जाधव** रा.७/६९ ब राघवेंद्र स्वामी मठ जवळ राघवेंद्र नगर मुरारजी पेठ सोलापूर-४१३००१ |

या कामी अर्जदार बँक यांनी दाखल केलेल्या अर्जातील वर नमुद केलेल्या जाब देणार यांनी दिलेला पत्ता उपलब्ध होत नसल्याने सदर जाहीर समन्स देत आहोत.

**उपनिर्दिष्ठ अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वार शुक्रवार, दि. ०४/०४/२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता कागदपत्रासह या कार्यालयात हजर रहावे.**

या नोटीसीद्वारे जाब देणार यांना असेही कळविण्यात येते की, वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल व निर्णय देण्यात येईल. त्याचप्रमाणे वरील तारखेस अगर तत्पूर्वी आपला संपूर्ण पत्ता कळविण्यास कसुर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

आज दि. १३/०३/२०२५ रोजी माझी सही व कार्यालयाचे मुद्रेसह हे जाहीर समन्स दिले आहे.

शिक्का

**सही/-**
**उपनिबंधक**
**सहकारी संस्था, (परसेवा)**
**सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स को-ऑप. असोसिएशन लि., सोलापूर**

### बँक ऑफ महाराष्ट्र/ Bank of Maharashtra

**प्रधान कार्यालय/ Head Office**
**लोकमंगल, 1501, शिवाजीनगर, पुणे-5 / Lokmangal, 150,.Shivajinagar, Pune-5**

आझादी का अमृत महोत्सव

**आंचलिक कार्यालय, सोलापुर / Zonal office, Solapur**
**आंचलिक कार्यालय, अगरवाल पैलेस, पहिला मजला, डी मार्ट – भारती विद्यापीठ रोड, जुले सोलापुर, सोलापुर - 413004**
**फोन /Phone - (0217) 2733870 / 71 ई-मेल /E-mail: legal sol@mahabank.co.in**

**नियम - 8 (1)**
**ताबा सूचना**

जेथे, सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियम, 2002 च्या नियम 3 सह वाचलेल्या कलम 13 च्या उपकलम (12) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, बँक ऑफ महाराष्ट्रचे अधिकृत अधिकारी म्हणून खाली स्वाक्षरी केलेले व्यक्ती यांनी 26/11/2024 रोजी मागणी सूचना जारी केली ज्यामध्ये खालील कर्जदारांना आणि जामीनदारांना सूचना मिळाल्याच्या तारखेपासून 60 दिवसांच्या आत संपूर्ण थकबाकी परत करण्याचे आवाहन केले आहे.

कर्जदाराने रक्कम परतफेड करण्यात अयशस्वी ठरल्याने, कर्जदार, जामीनदार आणि सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यात येते की, अधोस्वाक्षरी करणाऱ्याने 11.03.2025 रोजी सिक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट रूल्स, 2002 च्या नियम 8 सह वाचलेल्या कायद्याच्या कलम 13 च्या उपकलम (4) अंतर्गत त्यांना देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून येथे वर्णन केलेल्या मालमत्तेचा सांकेतिक ताबा घेतला आहे.

विशेषतः कर्जदाराला आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे सावध करण्यात येते की त्यांनी मालमत्तेशी व्यवहार करू नये आणि मालमत्तेशी कोणताही व्यवहार केल्यास वर नमूद केलेल्या रकमेसाठी बँक ऑफ महाराष्ट्रकडून शुल्क आकारले जाईल.

कर्जदाराचे लक्ष कायद्याच्या कलम 13 च्या उपकलम (8) च्या तरतुदींकडे आकर्षित करण्यात येत आहे, उपलब्ध वेळेनुसार, सुरक्षित मालमत्ता परत मिळविण्यासाठी.

| अ.क्र. | शाखा, कर्जदार आणि जामीनदार यांचे नाव | गहाण ठेवलेल्या मालमत्तेचा तपशील | डिमांड नोटिसची तारीख आणि एकूण थकबाकी |
|---|---|---|---|
| 1 | **शाखा- मजरेवाडी**<br>**कर्जदार -**<br>**श्री.सुरेश सोमनाथ इराबत्ती**<br>**पत्ता: डी-56 सत्य साई नगर, उत्तर सदर बाजार, लोकसेवा एच हायस्कूलसमोर, सोलापूर 413006**<br>**हमीदार:-**<br>**श्रीमती अरुणा सुरेश इराबत्ती**<br>पत्ता: डी-56 सत्य साई नगर, उत्तर सदर बाजार, लोकसेवा एच स्कूल समोर, सोलापूर 413006 | **गहाणखतचे वर्णन -**<br>एम.एच. क्रमांक 160/5A (उत्तर), सी.टी.एस. क्रमांक 56/D, अंतिम भूखंड क्रमांक 16 (पूर्व), सत्यसाई नगर उत्तर सदर बाजार सोलापूर<br>पूर्व - अंतर्गत रस्ता<br>दक्षिण - भूखंड 16<br>पश्चिम- भूखंड 16<br>उत्तर - सी.टी.एस. क्रमांक 55<br>मालमत्तेचे मालक सुरेश सोमनाथ इराबत्ती.<br>2. 90 दिवसांपर्यंतच्या स्टॉक आणि कर्जदारांचे आणि वर्तमान आणि भविष्यातील इतर चालू मालमत्तेचे हायओथेकेशन. | **मागणी सूचना:**<br>दिनांक 26/11/2024<br>रु.35,90,906.39/- (रुपये पस्तीस लाख नव्वद हजार नऊशे सहाशे सहा रुपये एकोणचाळीस पैसे फक्त ) अधिक 26.11.2024 पासून लागू न केलेले व्याज कर्जाची वसुली होईपर्यंत<br>**सांकेतिक ताबा**<br>**तारीख : 11.03.2025** |

**ठिकाण - सोलापूर**
**दिनांक - ११/०३/२०२५**

**सही/-**
**मुख्य व्यवस्थापक आणि**
**अधिकृत अधिकारी, सोलापूर झोन.**

## जाहीर प्रसिध्दीकरण

महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ चे नियम १८ अनुसार तालुका सहकारी निवडणूक अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, अकलूज, ता. माळशिरस, जि. सोलापूर यांच्या कार्यक्षेत्रातील क प्रकारातील खालील सहकारी संस्थांची निवडणुकीसाठी प्रारुप मतदार यादी प्रसिध्दीकरणाचे निवडणूक कार्यक्रमातील विविध टप्पे खालीलप्रमाणे

| अ. क्र. | संस्थेचे नाव | निवडणूक नियम क ६ (३) नुसार प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करण्याची तारीख | निवडणूक नियम ८(१) नुसार प्रारुप मतदार यादीवर हरकती व आक्षेप तालुका सहकारी निवडणूक अधिकारी माळशिरस यांचेकडे सादर करावयाची तारीख | निवडणूक नियम ८ (३) नुसार प्रारुप मतदार यादीवरील आक्षेप व हरकतींवर आक्षेप व हरकतींवर तालुका सहकारी निवडणूक अधिकारी माळशिरस यांनी द्यावयाच्या | निवडणूक नियम ८(३) नुसार अंतिम मतदार यादी प्रसिध्द करावयाची तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | अंगणवाडी महिला सेवकांची सहकारी पत संस्था, मर्या., माळशिरस | १३/०३/२०२५ | १३/०३/२०२५ ते २४/०३/२०२५ | २५/०३/२०२५ | २६/०३/२०२५ |
| २ | जिव्हाळा ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या., श्रीपूर | १३/०३/२०२५ | १३/०३/२०२५ ते २४/०३/२०२५ | २५/०३/२०२५ | २६/०३/२०२५ |
| ३ | जयराम ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या., आनंदनगर | १३/०३/२०२५ | १३/०३/२०२५ ते २४/०३/२०२५ | २५/०३/२०२५ | २६/०३/२०२५ |
| ४ | श्री महावीर स्वामी ग्रामीण बिगर शेती सहकारी पत संस्था मर्या., अकलूज | १३/०३/२०२५ | १३/०३/२०२५ ते २४/०३/२०२५ | २५/०३/२०२५ | २६/०३/२०२५ |
| ५ | आनामिका महिला ग्रामीण बिगरशेती सहकारी पत संस्था मर्या., नातेपुते | १३/०३/२०२५ | १३/०३/२०२५ ते २४/०३/२०२५ | २५/०३/२०२५ | २६/०३/२०२५ |
| ६ | अकलूज नगरपरिषद कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या., अकलूज | १३/०३/२०२५ | १३/०३/२०२५ ते २४/०३/२०२५ | २५/०३/२०२५ | २६/०३/२०२५ |
| ७ | बळीराजा ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या., नातेपुते | १३/०३/२०२५ | १३/०३/२०२५ ते २४/०३/२०२५ | २५/०३/२०२५ | २६/०३/२०२५ |
| ८ | गणेश ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या., अकलूज | १३/०३/२०२५ | १३/०३/२०२५ ते २४/०३/२०२५ | २५/०३/२०२५ | २६/०३/२०२५ |

**सही/-**
**(एम.एल.शिंदे)**
**तालुका सहकारी निवडणूक अधिकारी, तथा सहाय्यक निबंधक**
**सहकारी, संस्था, अकलूज, ता. माळशिरस, जि. सोलापूर**

### जाहीर समन्स

**मे. उपनिबंधक, सहकारी संस्था, (परसेवा) सोलापूर, जिल्हा नागरी सहकारी बँक्स् को-ऑप. असोसिएशन लि., सोलापूर**
१९३ (अ), सिध्देश्वर, स्टेट बँक ऑफ इंडिया, ट्रेझरी शाखेशेजारी, सोलापूर

**समर्थ सहकारी बँक लि., सोलापूर - अर्जदार बँक**
अंत्रोळीकर शॉपींग सेंटर, दत्तचौक, सोलापूर
विरूध्द
**(खालील तपशिलातील नमुद केलेले बँकेचे थकबाकीदार सभासद) - जाब देणार**

| अ. नं. | केस नंबर | दावा रक्कम | जाब देणार क्रमांक | जाब देणार यांचे नांव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| 1 | 1359/ 24-25 | 152241.00 | 1<br>2 | **बालनाकर लक्ष्मी सुभाष** रा. गणपती मंदिराजवळ H.NO.79, गिराजी मिल, चावल मुरारजी पेठ, सोलापूर, 413001<br>**बालनाकर रोहित सुभाष** रा. गणपती मंदिराजवळ H.NO.79, गिराजी मिल, चावल मुरारजी पेठ, सोलापूर, 413001 |
| 2 | 1371/ 24-25 | 165129.00 | 1<br>2 | **केत प्रियांका धनराज** रा.3 उत्तर कसाबा, उत्तर सोलापूर, सोलापूर 413007<br>**केत धनराज लक्ष्मणराव** रा.3 उत्तर कसाबा, उत्तर सोलापूर, सोलापूर 413007 |
| 3 | 1363/ 24-25 | 159052.00 | 1<br>2 | **शेराभाई रुकसनबानू अहमदहुसेन** रा.53 हुसेकर वस्ती, शेलगी, उत्तर सोलापूर, सोलापूर 413006<br>**शेराभाई अहमदहुसेन कमतरहुसेन** रा.53 हुसेकर वस्ती, शेलगी, उत्तर सोलापूर, सोलापूर 413006 |
| 4 | 1364/ 24-25 | 154379.00 | 1<br>2 | **चव्हाण सीमा संजय** रा.43/2 के, गोदुताई विडी घरकुल, अक्कलकोट रोड, एमआयडीसी, दक्षिण सोलापूर, सोलापूर 413006<br>**चव्हाण संजय विठ्ठल** रा.43/2 के, गोदुताई विडी घरकुल, अक्कलकोट रोड, एमआयडीसी, दक्षिण सोलापूर, सोलापूर 413006 |
| 5 | 1366/ 24-25 | 154454.00 | 1<br>2 | **करपे सुवर्णा सिध्देश्वर** रा.298 अक्कलकोट रोड, कुंभारी, दक्षिण सोलापूर, सोलापूर 413006<br>**करपे सिध्देश्वर नागप्पा** रा.298 अक्कलकोट रोड, कुंभारी, दक्षिण सोलापूर, सोलापूर 413006 |
| 6 | 1370/ 24-25 | 150108.00 | 1<br>2 | **हिरेमठ सविता महेश** रा.32, शिवगंगा नगर, शेलगी, उत्तर सोलापूर, सोलापूर 413001<br>**हिरेमठ महेश इरारूया** रा.32, शिवगंगा नगर, शेलगी, उत्तर सोलापूर, सोलापूर 413001 |
| 7 | 1372/ 24-25 | 163054.00 | 1<br>2 | **माळी संगिता श्रीशैल** रा. मु. पोस्ट कुंभारी, धनेश्वरी मंदिर, दक्षिण, सोलापूर, सोलापूर 413006<br>**माळी श्रीशैल नागनाथ** रा. मु. पोस्ट कुंभारी, धनेश्वरी मंदिर, दक्षिण, सोलापूर, सोलापूर 413006 |
| 8 | 1373/ 24-25 | 169816.00 | 1<br>2 | **कोळी सोजराबाई हणमंत** रा.11 रमण नगर, अक्कलकोट रोड MIDC दक्षिण, सोलापूर, सोलापूर 413006<br>**कोळी हणमंत दामोदर** रा.11 रमण नगर, अक्कलकोट रोड MIDC दक्षिण, सोलापूर, सोलापूर 413006 |
| 9 | 1374/ 24-25 | 159239.00 | 1<br>2 | **मदगेरी भौरम्मा मल्लेशी** रा. 2B/2/1 लक्ष्मीनारायण नगर, उत्तर सोलापूर, सोलापूर, 413002<br>**मदगेरी मल्लेशी विजय** रा. 2B/2/1 लक्ष्मीनारायण नगर, उत्तर सोलापूर, सोलापूर, 413002 |
| 10 | 1375/ 24-25 | 124716.00 | 1<br>2 | **माकणे सुरेखा शिवानंद** रा. 38/4, शिवगंगा नगर, शेलगी, सोलापूर, 413006.<br>**माकणे शिवानंद बाबुराव** रा. 38/4, शिवगंगा नगर, शेलगी, सोलापूर, 413006. |
| 11 | 1378/ 24-25 | 150633.00 | 1<br>2 | **जाधव सोनाली सुनील** रा. जगताप गल्ली, मू पोस्ट मार्डी, उत्तर सोलापूर, सोलापूर, 413002<br>**जाधव सुनील दिगंबर** रा. जगताप गल्ली, मू पोस्ट मार्डी, उत्तर सोलापूर, सोलापूर, 413002 |
| 12 | 1381/ 24-25 | 148710.00 | 1<br>2 | **खड्डे वैशाली धनराज** रा. 11/9, भवानी पेठ, उत्तर सोलापूर, सोलापूर, 413006.<br>**खड्डे धनराज चंद्रशेखर** रा. 11/9, भवानी पेठ, उत्तर सोलापूर, सोलापूर, 413006. |
| 13 | 1382/ 24-25 | 174610.00 | 1<br>2 | **बनसोडे सुनंदा गुरुसिद्धा** रा. पोस्ट कुंभारी, तालुका दक्षिण सोलापूर, एमआयडीसी, सोलापूर - 413006<br>**बनसोडे धोंडप्पा गुरुसिद्धा** रा. पोस्ट कुंभारी, तालुका दक्षिण सोलापूर, एमआयडीसी, सोलापूर - 413006 |
| 14 | 1384/ 24-25 | 113012.00 | 1<br>2 | **वाले विजयश्री नीलकंठ** रा. मुस्ती, परिट गल्ली, होनमुर्गी, सोलापूर 413004<br>**वाले निलकंठ सिद्राम** रा. मुस्ती, परिट गल्ली, होनमुर्गी, सोलापूर - 413004 |
| 15 | 1394/ 24-25 | 148547.00 | 1<br>2 | **खारे प्रियांका दिगंबर** रा. माळी गल्ली, बानेगाव पोस्ट करंबा, सोलापूर रोड, बनेगाव, सोलापूर, 413222.<br>**खारे दिगंबर सुखदेव** रा. माळी गल्ली, बानेगाव पोस्ट करंबा, सोलापूर रोड, बनेगाव, सोलापूरु, 413222. |
| 16 | 1395/ 24-25 | 116354.00 | 1<br>2 | **कोतवाल शबाना अख्तर** रा. ए/पी मार्डी, नागनाथ नगर, नान्नज रोड, मार्डी, सोलापूर, 413002.<br>**कोतवाल अख्तर सिकंदर** रा. ए/पी मार्डी, नागनाथ नगर, नान्नज रोड, मार्डी, सोलापूर, 413002. |
| 17 | 1396/ 24-25 | 183813.00 | 1<br>2 | **कोळी लक्ष्मी नारायण** रा. 153, कर्देहळ्ळी, दक्षिण सोलापूर, सोलापूर, 413006.<br>**कोळी नितीश नारायण** रा. 153, कर्देहळ्ळी, दक्षिण सोलापूर, सोलापूर, 413006 |
| 18 | 1401/ 24-25 | 177307.00 | 1<br>2 | **फुलारी नरसम्मा जगदीश** रा. अंबिका नगर, बाळे, उत्तर सोलापूर, सोलापूर, 413255.<br>**फुलारी जगदीश मारुती** रा. अंबिका नगर, बाळे, उत्तर सोलापूर, सोलापूर, 413255. |
| 19 | 1402/ 24-25 | 127702.00 | 1<br>2 | **सुतार तिरुमला सिद्धाराम** रा. B-122/1 हरि जी. पी. एम, विडी घरकुल, कुंभारी, सोलापूर, 413203<br>**बुर्ला अरविंद दशरथ** रा. B-122/1 हरि जी. पी. एम, विडी घरकुल, कुंभारी, सोलापूर, 413203 |
| 20 | 1410/ 24-25 | 183173.00 | 1<br>2 | **पंधारकर निर्मला मल्लिनाथ** रा. 160, विद्या नगर, जनता बँकेजवळ, शेलगी, ता. दक्षिण सोलापूर, सोलापूर, 413006.<br>**पंधारकर मल्लिनाथ लकप्पा** रा. 160, विद्या नगर, जनता बँकेजवळ, शेलगी, ता. दक्षिण सोलापूर, सोलापूर, 413006. |
| 21 | 1413/ 24-25 | 183173.00 | 1<br>2 | **शेख अंजुमबी इसाक** रा. मू पोस्ट मार्डी, टा उत्तर सोलापूर, सोलापूर, 413002.<br>**शेख महिबूब इसाक** रा. मू पोस्ट मार्डी, टा उत्तर सोलापूर, सोलापूर, 413002. |
| 22 | 1415/ 24-25 | 189306.00 | 1<br>2 | **कुरेशी रिझवाना एम. इलियास** रा. 6. IDB बँकेजवळ, लक्ष्मी मार्केट रोड, साउथ कसाबा, सोलापूर, 413007.<br>**कुरेशी इलियास महंमद** रा. 6, IDB बँकेजवळ, लक्ष्मी मार्केट रोड, साउथ कसाबा, सोलापूर, 413007. |
| 23 | 1416/ 24-25 | 144021.00 | 1<br>2 | **कसबे रुबी थॉमस** रा. 61/E, विजय नगर, कुंभारी, सोलापूर, 413005.<br>**कसबे पेत्रस थॉमस** रा. 61/E, विजय नगर, कुंभारी, सोलापूर, 413005. |
| 24 | 1420/ 24-25 | 102587.00 | 1<br>2 | **कुणे अश्विनी गणेश** रा. A 491/3A, गोदुताई परुळेकर, विडी घरकुल कुंभारी, दक्षिण सोलापूर, सोलापूर, 413006.<br>**कुणे गणेश पांडुरंग** रा. A 491/3A, गोदुताई परुळेकर, विडी घरकुल कुंभारी, दक्षिण सोलापूर, सोलापूर, 413006. |
| 25 | 1471/ 24-25 | 117916.00 | 1<br>2 | **सपाटे जया रामेश्वर** रा. 15, जयशंकर चाळ, लातूर रोड, लातूर रोड, बार्शी, सोलापूर, 413401.<br>**सपाटे रामेश्वर तात्याबा** रा. 15, जयशंकर चाळ, लातूर रोड, लातूर रोड, बार्शी, सोलापूर, 413401. |
| 26 | 1474/ 24-25 | 76419.00 | 1<br>2 | **जांभळे निर्मला महादेव** रा. 1550, मारुती मंदिर, सुभाष नगर, बार्शी, सोलापूर, 413411.<br>**जांभळे प्रशांत महादेव** रा. 1550, मारुती मंदिर, सुभाष नगर, बार्शी, सोलापूर, 413411. |

या कामी अर्जदार बँक यांनी दाखल केलेल्या अर्जातील जाब देणार यांना रजिस्टर पोस्टाने समन्स पाठविण्यात आलेले आहे. परंतु जाब देणार समन्स रुजू न झाल्याने/त्यांचा नवीन पत्ता उपलब्ध नसल्यामुळे सदरचे जाहीर समन्स देत आहोत.

**उपनिर्दिष्ठ अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वार शुक्रवार, दि. ०४/०४/२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता दाव्यासंबंधीच्या कागदपत्रासह आपण या कार्यालयात हजर व्हावे.**

या नोटीसीद्वारे जाब देणार यांना असेही कळविण्यात येते की, वरील तारखेस आपण वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल व निर्णय देण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी. त्याचप्रमाणे वरील तारखेस अगर तत्पूर्वी आपला संपूर्ण पत्ता कळविण्यास कसुर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

आज दि. १३/०३/२०२५ रोजी माझी सही व कार्यालयीन मुद्रेसह हे जाहीर समन्स दिले आहे.

शिक्का

**सही/-**
**उपनिबंधक**
**सहकारी संस्था, (परसेवा)**
**सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स् को-ऑप. असोसिएशन लि., सोलापूर**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# धाराशिव, सोलापूर, अहिल्यानगर गटात अव्वल

## ● हिरक महोत्सवी पुरुष-महिला राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धा






**तभा वृत्तसेवा,**
**शेवगाव, ता. १४ मार्च-**

हिरकमहोत्सवी पुरुष व महिला राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धेत दुसऱ्या दिवशी सकाळच्या सत्रात साखळी सामन्यात पुरुष गटात धाराशिव, सोलापूर, सांगली यांनी तर महिला गटात धाराशिव, मुंबई उपनगर व रत्नागिरी यांनी विजय मिळवत गटात अव्वल स्थान मिळवले आहे.

महाराष्ट्र खो-खो असोसिएशन, अहमदनगर खो-खो असोसिएशनच्या मान्यतेने व शेवगाव स्पोर्ट्स बहुउद्देशीय फाउंडेशन, सत्यभामा प्रतिष्ठान, मराठा विद्या प्रसारक समाजाचे न्यू आर्टस, कॉमर्स आणि सायन्स कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने अहिल्यानगर शेवगाव येथे होत असलेल्या हिरकमहोत्सवी पुरुष व महिला राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धा खंडोबा क्रिडांगणावर सुरु आहे. स्पर्धेचे उद्घाटन आमदार मोनिकाताई राजीव राजळे यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी खो-खो फेडरेशन ऑफ इंडियाचे सहसचिव आणि महाराष्ट्र राज्य खो-खो असोसिएशनचे सचिव डॉ. चंद्रजित जाधव, खजिनदार अ‍ॅड. गोविंद शर्मा, पीएमटी शिक्षण संकुलाचे कार्यकारी संचालक पंजाबराव आहेर यांच्यासह अनेक प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. तसेच, नुकत्याच झालेल्या जागतिक खो-खो स्पर्धेत भारतीय संघाचे कर्णधार प्रतीक वाईकर, प्रियांका इंगळे आणि संघांचे प्रतिनिधित्व करणारे सुयश गरगटे, अनिकेत पोटे, रेश्मा राठोड, अश्विनी शिंदे यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

शुक्रवारी सकाळच्या सत्रात महिला गटात धाराशिव संघाने छ. संभाजीनगरचा १ डाव १७ गुणांनी (२२-५) पराभव केला. विजयी संघातर्फे मिताली पवार (३.४० मि. संरक्षण), संध्या सुरवसे (३ मि. संरक्षण व ४ गुण) यांनी चांगला खेळ केला.

दुसऱ्या सामन्यात रत्नागिरीने जालन्याचा १२-९ एक डाव ३ गुणांनी पराभव केला. विजयी संघातर्फे रिद्धी चव्हाण (३ मि. संरक्षण व २ गुण), अपेक्षा सुतार (२ मि. संरक्षण व २ गुण), पायल पवार (१ मि संरक्षण व २ गुण) यांनी चांगला खेळ केला. तर जालना तर्फे वैष्णवी मदन (१.१०, १.२० मि. व २ गुण), वैशाली वाघ (१.१० मि. संरक्षण व १ गुण) यांनी चांगला खेळ केला.

तिसऱ्या सामन्यात फ गटात मुंबई संघाने सातारा संघाचा एक गुणाने (१०-९) पराभव केला. विजय संघातर्फे सेजल यादव २ मि., २.१० मि. संरक्षण व १ गुण), सिया नाईक (२ मि., २.१० मि. संरक्षण व २ गुण), रिद्धी कबीर (४ मि. संरक्षण व २ गुण) यांनी चांगला खेळ केला. तर सातारा संघातर्फे भाग्यश्री फाले (२ मि., १.४० मि. संरक्षण व २ गुण), सलोनी भोसले (२.५० मि. संरक्षण व २ गुण) यांनी चांगला खेळ केला.

पुरुष गटात धाराशिवने धुळ्याचा एक डाव ८ गुणांनी (१७-९) सहज पराभव केला. धाराशिव तर्फे हार्द्या वसावे (२.२० मि., ३.३० मि. संरक्षण), विजय शिंदे १ मि. संरक्षण व ५ गुण), सचिन पवार (२.४० मि. संरक्षण व १ गुण), भगतसिंग वसावे (१.३०, १ मि. संरक्षण व १ गुण) यांनी तर धुळेकडून विकी धनगर (१ मि. संरक्षण व ४ गुण ) यांनी चांगला खेळ केला.

दुसऱ्या सामन्यात सोलापूरने नंदुरबार चा एक डाव एक गुणाने (१२-११) पराभूत केले. सोलापूर कडून अजय कश्यप (३.३० मि. संरक्षण व २ गुण), जुबेर शेख (१.३० मि. संरक्षण व ३ गुण) यांनी चांगला खेळ केला. तर नंदुरबार तर्फे कैलास पटेल (१.१०, १ मि. संरक्षण व १ गुण) यांनी चांगला खेळ केला.

तिसऱ्या सामन्यात सांगलीने साताऱ्याचा १ डाव ४ गुणांनी (१६-१२) पराभव केला. त्यात सागर गायकवाड (३ मि. संरक्षण व १ गुण), राजू हक्के (१.२० मि. संरक्षण व ३ गुण) यांनी तर साताऱ्यातर्फे ओंकार मासले (१ मि. संरक्षण व १ गुण ) याने चांगला खेळ केला.

यजमान अहिल्यानगरने नाशिकचा २ गुण व ५ मि. ४० सेकंद राखून (१३-११) विजय मिळवला. अहिल्यानगरतर्फे रामेश्वर नरेंद्र (२.३०, २.१० मि. संरक्षण व १ गुण), शिवाजी सारंग (२ मि. संरक्षण व ३ गुण ) यांनी तर नाशिक तर्फे ओम कांगणे (२, १ मि. संरक्षण व १ गुण ) यांनी चांगला खेळ केला.

### ▸ उपउपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केलेले संघ

साखळी सामन्यात पुरुष गटात पुणे, मुंबई उपनगर, ठाणे, सांगली, सोलापूर, धाराशिव, मुंबई यांनी तर महिला गटात ठाणे, पुणे, धाराशिव, रत्नागिरी, मुंबई यांनी उपउपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे.

### ▸ नामांकित खेळाडूंचा सहभाग

प्रसिद्ध अल्टीमेट खो-खो स्पर्धा आणि नुकत्याच दिल्ली येथे झालेल्या जागतिक खो-खो स्पर्धेचे विजेतेपद पटकावणाऱ्या भारतीय संघात सहभागी महाराष्ट्रातील खेळाडू प्रतीक वाईकर, प्रियांका इंगळे, सुयश गरगटे, अनिकेत पोटे, रेश्मा राठोड, अश्विनी शिंदे हे विविध संघातून या स्पर्धेत सहभागी झालेले आहेत. त्यांचा खेळ पाहण्यासाठी नगरवासियांनी खंडोबा मैदानावर यावे असे आवाहन अहमदनगर खो-खो असोसिएशनने केले आहे.

# महत्त्वाचे

## आयपीएल ईशानसाठी मोठी संधी : आकाश चोप्रा



**नवी दिल्ली** : सनरायझर्स हैदराबादने मेगा लिलावात निवडल्यानंतर, आगामी आयपीएल २०२५ मध्ये ईशान किशनला आपली कारकीर्द पुन्हा जिवंत करण्याची सर्वात मोठी संधी आहे, असे मत माजी भारतीय क्रिकेटपटू आकाश चोप्राने व्यक्त केले. फलंदाजीमध्ये सिद्ध क्षमता असूनही, ईशान किशन राष्ट्रीय निवडकर्त्यांच्या नजरेतून पूर्णपणे दुर्लक्षित झाला आहे याबद्दल चोप्राने आश्चर्य व्यक्त केले. काहीही कारणास्तव, तो रडारवरून पूर्णपणे गायब झाला आहे. कोणीही त्याच्याबद्दल बोलत नाही किंवा त्याचे महत्त्व समजून घेत नाही. तो रणजी करंडकातही खेळला आणि तिथे धावा काढल्या. तो सर्व काही करत आहे, परंतु कोणीही त्याच्याबद्दल बोलत नाही, असे चोप्राने म्हटले आहे. मुंबई इंडियन्सने रिलीज केलेल्या ईशानला गत नोव्हेंबरमध्ये आयपीएल लिलावात सनरायझर्स हैदराबादने ११.२५ कोटी रुपयांना खरेदी केले होते. ■

## अली यांच्या निधनाबद्दल बीसीसीआयला दुःख

**नवी दिल्ली** : भारताचे माजी अष्टपैलू खेळाडू सय्यद आबिद अली यांच्या निधनाबद्दल बीसीसीआयने गुरुवारी शोक व्यक्त केला. सय्यद आबिद अली यांनी खेळाच्या आत्म्याला मूर्त रूप दिले आणि भारतीय क्रिकेटमधील आपले योगदान नेहमीच लक्षात ठेवले जाईल, असे बीसीसीआयने म्हटले आहे. त्यांच्या बहुमुखी प्रतिभा आणि धारदार क्षेत्ररक्षण कौशल्यासाठी ओळखले जाणारे अली यांचे बुधवारी दीर्घ आजाराने निधन झाले. ते ८३ वर्षांचे होते.

## बांगलादेशचा महमुदुल्लाह क्रिकेटमधून निवृत्त



**ढाका** : बांगलादेशचा अनुभवी फलंदाज महमुदुल्लाहने आंतराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली. मी आंतरराष्टीय क्रिकेटमधून निवृत्ती घेण्याचा निर्णय घेतला आहे, असे २०२१ मध्ये कसोटी आणि २०२४ मध्ये टी-२० मधून निवृत्त झालेल्या ३९ वर्षीय महमुदुल्लाहने समाज माध्यम पोस्टमध्ये लिहिले आहे.महमुदुल्लाह ३६.४६ च्या सरासरीने ५६८९ धावा करून बांगलादेशचा चौथा सर्वाधिक एकदिवसीय धावा करणारा फलंदाज ठरला आहे, यात चार शतकांचा समावेश आहे. त्याने २०१५ च्या विश्वचषकात सलग दोन शतके, २०१७ च्या चॅम्पियन्स चषकांत न्यूझीलंडविरुद्ध आणि २०२३ च्या वन-डे विश्वचषकात दक्षिण आफ्रिकेविरुद्ध चौथे शतके झळकावले. मी माझ्या सर्व संघातील सहकाऱ्यांचे, प्रशिक्षकांचे आणि विशेषतः माझ्या चाहत्यांचे आभार मानू इच्छितो ज्यांनी नेहमीच मला पाठिंबा दिला आहे,'' असे त्याच्या फेसबुक पोस्टमध्ये म्हटले आहे.

## सबालेन्का उपांत्यपूर्व फेरीत, बेन्सिकची कोकोवर मात

**इंडियन वेल्स** : जागतिक क्रमवारीत पहिल्या क्रमांकावर असलेल्या बेलारूसच्या आर्यना सबालेन्काने गुरुवारी इंडियन वेल्स ओपनमध्ये सोनय कार्टलचा पराभव करत उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. अव्वल मानांकित महिला खेळाडूने डब्ल्यूटीए १००० स्तरावर तिच्या कारकिर्दीतील २५ व्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. सबालेन्का यापूर्वी २०२३ मध्ये इंडियन वेल्समध्ये उपांत्यपूर्व फेरीत व नंतर अंतिम फेरीत पोहोचली होती. सबालेन्काचा पुढील सामना २४ व्या मानांकित लिउडमिला सॅमसोनोव्हाशी होईल. सॅमसोनोव्हाने जास्मिन पाओलिनीचा ६-०, ६-४ असा पराभव केला. दुसऱ्या सामन्यात वाईल्ड कार्डधारी बेलिंडा बेन्सिकने तिसऱ्या क्रमांकाच्या कोको गॉफचा २ तास २० मिनिटांत ३-६, ६-३, ६-४ असा पराभव केला. २०१९ च्या उपांत्य फेरीनंतर तिने दुसऱ्यांदा इंडियन वेल्सच्या अंतिम आठमध्ये प्रवेश केला. दरम्यान, ऑस्ट्रेलियन ओपन विजेत्या मॅडिसन कीजने २ तास १८ मिनिटांच्या रोमांचक सामन्यात डोना वेकिकवर ४-६, ७-६ (७), ६-३ असा विजय मिळवत सलग १५ सामने जिंकले आहेत.कीजचा सामना उपांत्यपूर्व फेरीत बेन्सिकशी होईल.

## केकेआर विजयाची घोडदौड कायम राखणार

**कोलकाता** : आगामी इंडियन प्रीमियर लीग २०२५ च्या हंगामात कोलकाता नाईट रायडर्स (केकेआर) आपली विजयाची घोडदौड कायम राखणार आहे, असा विश्वास केकेआरचे नवनियुक्त मार्गदर्शक ड्वेन ब्राव्हो यांनी व्यक्त केला. २०२५ च्या हंगामाची तयारी करताना गतविजेते आयपीएलमध्ये आपल्या विजयी सूत्रावर टिकून राहण्यास कटिबद्ध आहे. ब्राव्हो स्वतःची शैली घेऊन येत असताना खेळाडूंच्या कामगिरीत सातत्यतेचे महत्त्व अधोरेखित करते. माजी मार्गदर्शक गौतम गंभीर यांच्याकडून अंतर्दृष्टी घेतली, ज्यांनी गत वर्षी केकेआरला तिसरे विजेतेपद मिळवून दिले होते आणि नंतर भारतीय संघाची सूत्रे स्वीकारली. केकेआर नवीन मार्गदर्शक आणि कर्णधारासह नवीन हंगामासाठी सज्ज होत आहे. गत विजेत्या संघाचे विजेतेपद कायम राखणे हे आमचे कर्तव्य आहे, असे ब्राव्हो पत्रकार परिषदेत ब्राव्हो म्हणाले. ■

# सोलापूरच्या चौघांना आंतरराष्ट्रीय गुणांकन

### ● वेदांत मुसळे, श्रेयस कुदळे, श्लोक चौधरी व हिमांशु व्हनगावडे यांचा समावेश
### ● श्रेयसला फिडे ऑनलाइन अरेना कँडिडेट टायटल प्राप्त


वेदांत मुसळे


श्रेयस कुदळे


श्लोक चौधरी


हिमांशु व्हनगावडे

**तभा वृत्तसेवा-**
**सोलापूर, दि.१४ मार्च -**

सोलापुर चेस अकॅडमीच्या वेदांत मुसळे, श्रेयस कुदळे, श्लोक चौधरी व हिमांशु व्हनगावडे यांनी आंतरराष्ट्रीय गुणांकन बुद्धिबळ स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत फिडेच्या क्लासिकल, रॅपिड व ब्लिट्झ रेटिंग प्रकारात आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त केले आहे.

कोल्हापूर येथील खुल्या फिडे मानांकन निवड बुद्धिबळ स्पर्धेत सेंट जोसेफ स्कूलमध्ये शिकत असलेल्या वेदांत मुसळे याने उत्कृष्ट खेळ करत आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त अद्वय ढेणे यास पराभूत केले. तसेच वरद पाटील, यश टंडन आणि आरुष शिंदे यांच्याशी बरोबरी साधली व आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त करण्याचा निकष पूर्ण करत क्लासिकल प्रकारात १५०८ रेटिंग मिळवले. पुणे येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय गुणांकन बुद्धिबळ स्पर्धेत श्री मराठी मेडियम मध्ये शिकत असलेल्या श्रेयस कुदळेने भालचंद्र बेलोरकर आणि श्लोक कुलकर्णी या आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त खेळाडूंना पराभवाचा धक्का देत क्लासिकल प्रकारात १४२६ तर विविध ब्लिट्झ रेटिंग स्पर्धेत चांगली कामगिरी करत १४८१ ब्लिट्झ रेटिंग प्राप्त केले. तसेच श्रेयसने फिडेच्या ऑनलाइन अरेना गेमिंग प्लॅटफॉर्मवर खेळत अरेना कँडिडेट हे टायटल देखील प्राप्त केले आहे.

इंडियन मॉडेल स्कूल मध्ये शिकत असलेल्या श्लोक चौधरी याने उत्कृष्ट खेळत पुणे येथे झालेल्या फिडेच्या रॅपिड आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त बुद्धिबळ स्पर्धेत प्रशांत पिंजरे व विक्रांत सुपेकर यांना पराभूत करत चमकदार कामगिरी करत रॅपिड प्रकारात १४५१ रेटिंग मिळविले. तर सेंट जोसेफ स्कूल मध्ये शिकत असलेल्या हिमांशु व्हनगावडे याने देखील आकर्षक कामगिरी करत वैभव क्षीरसागर व स्वयाम मार्कंडे यांचा पराभव करत फिडेच्या रॅपिड प्रकारात १४३२ आंतरराष्ट्रीय गुनांकन प्राप्त केले. वेदांत, श्रेयस, श्लोक व हिमांशु यांना आंतरराष्ट्रीय गुनांकन प्राप्त उदय वगरे, वैष्णवी बोंडगे तसेच राष्ट्रीय प्रशिक्षक सुमुख गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले. खेळाडूंनी मिळविलेल्या उल्लेखनीय यशाबद्दल सोलापुर डिस्ट्रीक्ट चेस असोसिएशनचे अध्यक्ष धैर्यशील मोहिते पाटील, सचिव सुमुख गायकवाड, सोलापुर चेस अकॅडेमीचे अध्यक्ष महेश धाराशिवकर अभिनंदन केले.

# अक्षर पटेल दिल्लीचा कर्णधार



**दिल्ली, दि. १४ मार्च**

आयपीएल २०२५ मध्ये दिल्ली कॅपिटल्सचा कर्णधार अक्षर पटेल असणार. फ्रँचायझीने शुक्रवारी याची घोषणा केली. अक्षरसोबतच केएल राहुलचे नावही कर्णधारपदाच्या शर्यतीत होते. दोन्ही नावांवर विचार करण्यात आला. अखेल अक्षर पटेलला संघाची जबाबदारी देण्यात आली. २२ मार्चपासून या स्पर्धेस सुरुवात होणार आहे.

अक्षर २०१९ पासून दिल्ली कॅपिटल्सकडून खेळत आहे. तो दिल्लीचा सर्वात अनुभवी खेळाडू आहे. गेल्या ६ हंगामात त्याने ८२ सामने खेळले. ३०च्या सरासरीने २३५ धावा करण्यासोबतच त्याने ७.६५च्या इकॉनॉमीने ११ गडी टिपले.

एका सामन्यात ऋषभ पंतला स्लो ओव्हर्ससाठी बंदी घालण्यात आल्यामुळे अक्षरने संघाचे नेतृत्व केले आहे. मात्र, या सामन्यात त्याला पराभवाचा सामना करावा लागला. आयपीएल मेगा लिलावापूर्वी दिल्ली कॅपिटल्सने अक्षरला १६.५० कोटी रुपयांना कायम ठेवले होते. १५० आयपीएल सामन्यांमध्ये फलंदाज म्हणून त्याने १३०.८८ च्या स्ट्राईक रेटने आणि २१.४७ च्या सरासरीने १६५३ धावा केल्या आहेत.

याशिवाय, गोलंदाज म्हणून त्याने ७.२८ च्या इकॉनॉमी आणि २५.२ च्या स्ट्राईक रेटने १२३ बळी टिपले आहेत. या स्पर्धेत अक्षर पटेलची सर्वोत्तम गोलंदाजी २१ धावांत ४ बळी ही आहे.

राहुलचे नावही कर्णधारपदाच्या शर्यतीत होते. आयपीएल लिलावात दिल्लीने केएल राहुलला १४ कोटी रुपयांना खरेदी केले आहे. राहुलने आयपीएलमध्ये ४६८३ धावा केल्या आहेत. आयपीएल २०२४च्या मेगा लिलावात दिल्ली कॅपिटल्सने केएल राहुलला १४ कोटी रुपयांना खरेदी केले. राहुलने आयपीएलमध्ये अनेक संघांचे नेतृत्व केले आहे. त्यामुळे फ्रँचायझी त्याच्याकडे कर्णधारपदाची जबाबदारी सोपविण्याचा विचार करीत होते.

# सात्त्विक-चिराग जोडी दुसऱ्या फेरीत

## ऑल इंग्लंड बॅडमिंटन



◆ **बर्मिंगहॅम, १३ मार्च**

भारताच्या सात्त्विकसाईराज रन्कीरेड्डी व चिराग शेट्टी या जोडीने प्रतिष्ठेच्या ऑल इंग्लंड बॅडमिंटन स्पर्धेत पुरुष दुहेरीच्या दुसऱ्या फेरीत प्रवेश केला, तर पुरुष एकेरीत भारताचा स्टार बॅडमिंटनपटू लक्ष्य सेनने इंडोनेशियाच्या जोनाथन ख्रिस्तीवर शानदार विजय मिळवून उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली.

भारतीय जोडीने पहिल्या फेरीत डेन्मार्कच्या डॅनियल लुंडगार्ड व मॅड्स वेस्टरगार्डवर सरळ गेममध्ये विजय मिळवला. गत महिन्यात वडिलाचे निधनझाल्यानंतर बॅडमिंटन कोर्टवर परतलेल्या सात्त्विकने आपला दुहेरी जोडीदार चिराग शेट्टीसह प्रभावी कामगिरी केली व अवघ्या ४० मिनिटांत २१-१७, २१-१५ असा विजय मिळवला.

सूर गवसलेल्या लक्ष्य सेनने दुसऱ्या फेरीच्या सामन्यात जोनाथन ख्रिस्तीवर २१-१३, २१-१० असा विजय मिळविला. उभय प्रतिस्पर्धी दरम्यानचा सामना निर्धारित वेळेपेक्षा अर्धा तास विलंबाने खेळला गेला. सामन्याच्या सुरुवातीपासून लक्ष्य सेनने आपला आक्रमक खेळ शेवटपर्यंत कायम राखला. विजय मिळवल्यानंतर सात्त्विकने आपले बोट आकाशाकडे उंचावले व वडिलांचे स्मरण केले.

हे कठीण आहे, पण जीवन असेच आहे. ते अपेक्षित नव्हते, असे सात्त्विक म्हणाला. अमलापुरम येथील २४ वर्षीय सात्त्विकने आपल्या जोडीदारेचे आभार मानले.कठीण काळात माझा सहकारी चिराग शेट्टी प्रशिक्षक माझ्या गावी आले व आम्ही तिथे थोडा सराव केला, असे तो म्हणाला.

भारताची सातव्या क्रमांकाची ही पुरुष जोडी अंतिम १६ च्या फेरीत चीनच्या हाओ नान झी व वेई हान झेंग या जोडीविरुद्ध खेळेल. इतर भारतीय खेळाडू या स्पर्धेत सलग दोन वेळा उपांत्य फेरी गाठणाऱ्या जागतिक क्रमवारीत नवव्या क्रमांकाच्या त्रिशा जॉली व गायत्री गोपीचंद या जोडीची गाठ आठव्या क्रमांकाच्या कोरियन जोडी- हाय जेओंग किम व ही योंग काँगशी पडेल. (वृत्तसंस्था)

### लक्ष्य सेन उपांत्यपूर्व फेरीत




### मालविका बनसोडचे आव्हान संपुष्टात

ऑल इंग्लंडमध्ये भारताचे प्रतिनिधीत्व करणारी नागपूरची मालविका बनसोड हिचे महिला एकेरीच्या दुसऱ्या फेरीत आव्हान संपुष्टात आले. मालविकाला जपानच्या तिसऱ्या क्रमांकाची खेळाडू अकाने यामागुची हिच्याकडून १६-२१, १३-२१ असा पराभव पत्करावा लागला. अकाने ही दोन वेळची विश्वविजेती आहे.

# रोहितने निवृत्त होण्याचा प्रश्नच नाही : ए. बी . डीव्हिलियर्स



◆ **नवी दिल्ली, १३ मार्च**

रोहित शर्माकडे निवृत्त होण्याचे कोणतेही कारण नाही, त्यामुळे त्याचा निवृत्त होण्याचा प्रश्नच नाही. रोहित हा सर्वकाळातील महान एकदिवसीय कर्णधारांपैकी एक आहे, असे मत दक्षिण आफ्रिकेचा महान फलंदाज एबी डिव्हिलियर्स याने व्यक्त केले.

चॅम्पियन्स चषकानंतर रोहित वन-डे क्रिकेटमधून निवृत्त होणार असल्याची चर्चा होती, परंतु ३७ वर्षीय रोहितने भारताला अभूतपूर्व तिसऱ्यांदा चॅम्पियन्स चषकाचे विजेतेपद मिळवून दिल्यानंतर त्या चर्चांना पूर्णविराम दिला.

एक कर्णधार म्हणून रोहितच्या विजयाची टक्केवारी ७४ टक्के आहे. त्याची ही टक्केवारी भूतकाळातील इतर कोणत्याही कर्णधारांपेक्षा बरीच जास्त आहे, असे डीव्हिलियर्स म्हणाला.

जर तो असाच खेळत राहिला तर तो सर्वकालीन सर्वोत्तम वन-डे कर्णधारांपैकी एक म्हणून शिक्कामोर्तब होईल. सध्याच निवृत्ती नाही व अफवा पसरवणे थांबवावे, असे आवाहन रोहितने केले आहे.

रोहितने दुबईत न्यूझीलंडविरुद्धच्या अंतिम सामन्यात भारताच्या २५२ धावांच्या कठीण पाठलागात महत्त्वाची भूमिका बजावत ८३ चेंडूत ७६ धावा केल्या व सामनावीराचा पुरस्कार जिंकला.

रोहित शर्माने कोणत्याही प्रकारची टीका सहन करण्याची काहीच गरज नाही. त्याचा रेकॉर्ड स्वतःच बोलतो. इतकेच नाही तर त्याने त्याचा खेळही बदलला आहे, असेही तो म्हणाला.

जर आपण पॉवर-प्लेमध्ये त्याच्या स्ट्राईक रेटवर एक नजर टाकली तर तो सलामीवीर फलंदाज म्हणून खूपच कमी होता, परंतु २०२२ पासून त्याचा स्ट्राईक रेट पहिल्या पॉवरप्लेमध्ये ११५ पर्यंत वाढला आहे व हाच चांगला व उत्तम यातील फरक आहे. हे त्याच्या स्वतःच्या खेळात बदल घडवून आणत आहे आणि ते कधीही थांबत नाही. तुमच्याकडे नेहमीच काहीतरी शिकण्यासाठी आणि काहीतरी चांगले करण्यासाठी असते, असे एबी म्हणाला. (वृत्तसंस्था)

# दुखापतग्रस्त असूनही द्रविड राजस्थानच्या शिबिरात दाखल



**जयपूर, १४ मार्च**

स्थानिक लीग सामन्यात खेळताना पायाला दुखापत झाली असली तरी, भारतीय दिग्गज व राजस्थान रॉयल्सचे नवीन मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड यांनी संघाच्या आयपीएल हंगामपूर्वीच्या सराव शिबिरात भाग घेतला आणि आपली पूर्ण समर्पितता दाखवली.

राजस्थान रॉयल्सने आपल्या अधिकृत समाज माध्यम हॅण्डलवर एक व्हीडिओ शेअर केला. या व्हीडिओमध्ये द्रविड पहिल्यांदाच रॉयल्सच्या शिबिरात सहभागी झाले होते. दुखापतीनंतरही द्रविड सत्रात सक्रियपणे सहभागी होता. रियान परागसारख्या तरुण प्रतिभावान खेळाडूंशी चर्चा करण्यापूर्वी त्याने खेळाडूंशी हस्तांदोलन केले आणि यशस्वी जयस्वालसोबत एक क्षण शेअर केला. हातात क्रॅच घेऊन बसलेल्या द्रविडने बुधवारी संपूर्ण सत्र बारकाईने पाहिले. बंगळुरूमध्ये क्रिकेट खेळताना दुखापत झालेल्या मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविडची प्रकृती सुधारत आहे आणि ते आज जयपूरमध्ये आमच्यासोबत येतील,'' असे राजस्थान रॉयल्सने एक्स मध्ये पोस्ट केले आहे. द्रविडने अंगठा दाखवताना आरामशीर द्रविडचा फोटो पोस्ट केला आहे. गत आठवड्यात कर्नाटक राज्य क्रिकेट संघटनेच्या गट १ श्रेणी-२ च्या श्री नासूर मेमोरियल शील्डच्या उपांत्य सामन्यात विजया क्रिकेट क्लबकडून जयनगर क्रिकेटर्सविरुद्ध फलंदाजी करताना द्रविडच्या डाव्या पायाच्या स्नायूला दुखापत झाली होती. ५२ वर्षीय द्रविड, आपला १६ वर्षीय मुलगा अन्वयसोबत खेळत असताना, त्याच्या डावात केवळ दोन चेंडूंमध्ये स्नायूला दुखापत झाल्याचे वृत्त आहे. वेदने असूनही त्याने झुंज दिली व अन्वयसोबत चौथ्या गड्यासाठी महत्त्वाची भागीदारी करत ६६ चेंडूत ४३ धावा केल्या. तथापि, विजया क्लबने अखेर सामना गमावला. गत महिन्याच्या सुरुवातीला द्रविडने १३ वर्षांनंतर लीग सामन्यात पहिल्यांदाच क्लबमध्ये प्रवेश केला. त्याने अन्वयसोबत भागीदारी केली. अन्वयने ६० चेंडूत ५८ धावा केल्या, तर द्रविडने १० धावा केल्या. २०२२ ते २०२४ पर्यंत भारतीय संघाचे मुख्य प्रशिक्षकपदाच्या यशस्वी कारकिर्दी केली.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## संक्षिप्त वृत्त



### बचत गटांतील महिलांच्या पाठीशी पुरुषांनी उभे राहावे : डॉ. चव्हाण

**करकंब, दि. १४ मार्च-**

प्रत्येक गावोगावी महिला बचत गट अस्तित्वात असून त्यांची कामे चांगली असून त्यांनी चांगल्या दर्जाच्या वस्तू बनविल्यास त्यांच्या उत्पादित वस्तूंना चांगल्या प्रकारची बाजारपेठ उपलब्ध होऊ शकते. बचत गटातील महिलांना प्रोत्साहन मिळावे यासाठी पुरुषांनीही त्यांच्या पाठीमागे खंबीरपणे उभे रहाणे गरजेचे असल्याचे मनोगत करकंब ग्रामपंचायतचे ग्रामविकास अधिकारी डॉ. सतीश चव्हाण यांनी व्यक्त केले. सुवर्ण गार्डन मंगल कार्यालयात महिला आर्थिक विकास महामंडळ सोलापूर व विठाई लोकसंचलित साधन केंद्र पंढरपूर यांचे संयुक्त विद्यमाने नवतेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्यम विकास प्रकल्पअंतर्गत माविम मित्रमंडळ प्रशिक्षण शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी सरपंच प्रतिनिधी ॲड. शरदचंद्र पांढरे, महिला बचत गट पंढरपूर तालुकाध्यक्षा सुनिता देशपांडे, व्यवस्थापिका वंदना बिडकर,नागेश वायचळ, मुख्याध्यापक दत्तात्रय खंदारे उपस्थित होते. कार्यक्रमास सचिन शिंदे, लक्ष्मण जाधव, दत्तात्रय खंदारे, सुहास चव्हाण, गोरख वसेकर, महादेव देशमुख, राधिका इदाते, अंजना रणदिवे, ताई तळेकर उपस्थित होते. सूत्रसंचालन राधिका इदाते तर आभार ताई तळेकर यांनी मानले.



### खेडगी महाविद्यालयात यशवंतराव चव्हाण यांची जयंती साजरी

**अक्कलकोट, दि. १४ मार्च-**

सी.बी. खेडगी महाविद्यालयात राज्याचे शिल्पकार आणि पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. प्रारंभी प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. शिवराय आडवीतोट हे होते. प्रास्ताविक अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. गणपतराव कलशेट्टी यांनी केले. प्राचार्य डॉ. आडवितोट यांनी विचार व्यक्त केले. याप्रसंगी डॉ गुरुलिंगप्पा धबाले, पर्यवेक्षक प्रा. संजय कलशेट्टी, डॉ. बी.एन. कोणदे, डॉ. आप्पासाहेब देशमुख, प्रा. विकास भारतीय व प्राध्यापिका व्ही. पी. कोन्हाळी, सेवक अशोक इसापुरे, परमेश्वर कलबुर्गी, धोंडप्पा शिंगे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. किशोर थोरे व डॉ. गुरुसिद्धया स्वामी यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन प्रा.सिद्धाराम पाटील यांनी केले. प्रा. विजयालक्ष्मी कोन्हाळी यांनी परिश्रम घेतले. आभार वीरूपाक्ष कुंभार यांनी मानले.

## निधन वृत्त...



### रेणूका सरदेशमुख

**पंढरपूर, दि. १४ मार्च -**

येथील रेणूका मनोहर देशमुख (वय-६३)यांचे ८ मार्च २०२५ रोजी दीर्घ आजाराने निधन झाले. न्यू इंडिया इन्शुरन्स कंपनीमधील सेवानिवृत्त व्यवस्थापक मनोहर सरदेशमुख यांच्या त्या पत्नी होत. त्यांच्या पश्चात त्यांचे पती, मुलगा, सून, नातवंडे असा परिवार आहे.



### रत्नमाला जळकोटकर

**सोलापूर, दि. १४ मार्च -**

रत्नमाला श्रीरंग जळकोटकर (७५, गायत्री नगर, वसंत विहार, सोलापूर) यांचे अल्पशा आजाराने शुक्रवारी निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्याच्यावर शनिवार १५ मार्च रोजी दुपारी १ वाजता पुना नाका स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार होणार आहेत. पत्रकार विलास जळकोटकर यांच्या त्या मातोश्री होत.



### विश्वनाथ वडजे

**सोलापूर,दि. १४ मार्च-**

वारद फार्म येथील विश्वनाथ व्यंकप्पा वडजे (वय ७३) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सून असा परिवार आहे. एन.जी.म ीलमध्ये त्यांनी लेबर ऑफिसर म्हणून काम पाहिले होते.त्यांच्या पार्थिवावर पुना नाका येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.



### स्वामीनाथ सुतार

**अक्कलकोट दि १४ मार्च -**

येथील त्रिमूर्ती गणेशोत्सव तरुण मंडळाचे सदस्य स्वामीनाथ तथा अप्पू सिद्धाराम सुतार (वय ५२) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले असा परिवार आहे.



### रत्नप्रभा कवठे

**सोलापूर, दि. १४ मार्च-**

भवानी पेठ वर्धमान होम्स येथील रत्नप्रभा रघुनाथ कवठे (वय ८१) यांचे आज सकाळी ६ वाजता दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर दुपारी कारंबा नाका येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.



### पुष्पा जाधव

**अकलूज,दि. १४ मार्च-**

पुष्पा माधवराव जाधव (वय ५६) यांचे अल्पशा आजाराने ११ मार्च रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, दोन भाऊ, एक दीर, चार भावजया, दोन मुले, एक सून, नातवंडे, नणंद असा परिवार आहे. पत्रकार गणेश लक्ष्मण जाधव यांच्या त्या वहीनी होत.

# कोट्यवधींच्या गैरव्यवहारात बार्शीतील महावितरणाचे तीन अधिकारी दोषी

### कारवाईकडे लागले लक्ष

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि १४ मार्च -**

महावितरणाच्या बार्शी विभागामध्ये न्यू सर्व्हिस कनेक्शन व मेंटन्सच्या कामात कोट्यवधी रुपयांचा गैरव्यहार झाला होता. टेंडर प्रक्रिया नियमानुसार राबविण्यात आली नव्हती. त्यासोबतच सुशिक्षित बेरोजगाराचे काम वाटप करताना नियमाचे उल्लंघन करण्यात आले होते. एकच काम पुढे दाखवून चार वेळेस त्याची बिले उचलण्यात आली होती. त्यासंदर्भात तत्कालीन ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे तक्रार करण्यात आली होती. त्यानंतर या प्रकरणाच्या चौकशीसाठी समिती नेमली होती. या समितीच्या चौकशीत तीन अधिकारी दोषी आढळून आले आहेत. त्यामुळे आता त्यांच्यावर काय कारवाई केली जाणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

याप्रकरणी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश सचिव शिरीष ताटे यांनी २१ ऑगस्ट २०२४ रोजी तत्कालीन ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे तक्रार केली होती. त्यामध्ये महावितरणाच्या बार्शी विभागामध्ये एनएससी (न्यू सर्व्हिस कनेक्शन) व मेंटन्सच्या कामात कोट्यवधी रुपयांचा गैरव्यहार झाला होता. एनएससीची टेंडर प्रक्रिया नियमानुसार




राबविण्यात आली नव्हती. त्यासोबतच सुशिक्षित बेरोजगाराचे काम वाटप करताना नियमाचे उल्लंघन करण्यात आले होते. एकच काम पुढे दाखवून चार वेळेस त्याची बिले उचलली असल्याचे म्हटले होते.

या सर्व अनियमिततेला बार्शी विभागाचे कार्यकारी अभियंता सुरेश कुराडे, सहाय्यक अभियंता गणपत कांबळे, व्यवस्थापक संदीप जाधव हे तिघेजण जबाबदार असून कुराडे, कांबळे यांनी भागीदारीमध्ये हे काम करुन कामात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार केला आहे. त्यासोबातच चालू वर्षामध्ये मेंटेनन्स व एनएससी (न्यू सर्विस कनेक्शन) या कामांमध्ये लाखो रुपये घेऊन कामे वाटप केली. जोपर्यंत या प्रकरणाची निपक्षपणे चौकशी होत नाही तोपर्यंत या तीनजणांना पदापासून दूर करण्यात यावे, अन्यथा आंदोलन छेडण्याचा इशारा ताटे यांनी दिला होता.

त्यानंतर या प्रकरणाची दखल महावितरणने घेत चौकशीसाठी तीनजणांची समिती गठीत करीत घटनास्थळी जाऊन संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचे जवाब नोंदवून १५ दिवसांत अहवाल सादर करण्याचे आदेश दिले होते. या प्रकरणी नेमलेल्या चौकशी समितीत बिवले विभागाचे व्यवस्थापक प्रदीप सुरवसे, उपकार्यकारी अभियंता संभाजी गायकवाड, अकलूज येथील उपव्यवस्थापक अण्णासाहेब काळे या तीनजणांचा समावेश करण्यात आला होता.

या प्रकरणाची या तीनजणांच्या समितीने चौकशी केली होती. त्यामध्ये बार्शी विभागामध्ये एनएससी टेंडरची प्रक्रिया नियमानानुसार राबवून परिमंडळ कार्यालय बारामती यांनी या टेंडर प्रस्तावना मंजुरी दिली असल्याचे म्हटले आहे. तर बार्शी विभागांमध्ये सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना कामाचे आदेश देताना परिपत्रकाचे पालन केलेले नाही.

त्यासोबतच बार्शीमध्ये सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना काम वाटप करत असताना झालेल्या अनियमिततेसाठी बार्शी विभागाचे कार्यकारी अभियंता सुरेश कुराडे, सहाय्यक अभियंता गणपत कांबळे, व्यवस्थापक संदीप जाधव हे तिघेजण दोषी आढळून आले आहेत. त्यासोबतच बार्शी विभागामध्ये सुरक्षा रक्षकांसाठी टेंडर प्रक्रिया राबवणे गरजेचे असल्याचे त्यांनी अहवालामध्ये स्पष्ट केले आहे.

# सोने, मोटार सायकल चोरी करणाऱ्या चोरटयास अटक

### सांगोला पोलीसांची कामगिरी

### २ लाख ४० हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.१४ मार्च-**

सांगोला पोलीस ठाणे हद्दीत सोने, मोटारसायकल चोरी करणाऱ्या चोरटयास अटक करण्यात सांगोला पोलीसांना यश आले असून सदर आरोपीकडून २ लाख ४० हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आले असल्याची माहिती सांगोला पोलीस निरीक्षक भिमराव खणदाळे यांनी दिली.

याबाबत अधिक माहिती अशी, सांगोला पोलीस ठाणे येथे फिर्यादी सुनिल शाम राव गायकवाड रा.कडलास, ता.सांगोला जि.सोलापूर यांची मोटार सायकल माउली हॉटेल मिरज रोड, सांगोला येथुन चोरी झाले बाबत अज्ञात आरोपी विरुध्द गुन्हा दाखल होता. या अनुशगाने सांगोला पोलीस ठाणेकडील पथक तपास करीत असताना तात्रिक विश्लेषणाचे आधारे सुनिल मारुती मंडले, वय-२६, रा.पिंपरी खुर्द ता.आटपाडी, सध्या रा.देवापूर, ता.माण, जि.सातारा यास ताब्यात घेवून त्याचेकडे विचारपुस केली असता त्याने मोटार सायकल चोरी केले बाबत कबुली देवून ती मोटार सायकल जप्त करुन आरोपीस अटक करण्यात आली.

पोलीस चौकशी दरम्यान फिर्यादी सुनंदा लक्ष्मण गोडसे रा.लक्ष्मनगर, ता.सांगोला हिस आरोपीने त्यांचे जवळील चारचाकी गाडीत बसवून तिस लक्ष्मीनगर येथे सोडतो असे म्हणून तिस लक्ष्मीनगर रोडवरील नर्सरी जवळ सोडुन तिचे गळयातील ८ ग्रॅम सोन्याचे गंठण व ७ ग्रॅम सोन्याचे बोरमाळ असे शुभांगी रामचंद्र बुधावले, वय-२६, रा.निंबवडे, ता.आटपाडी हिने व आरोपी सुनिल मंडले यांनी हिसका मारुन ते चोरी केले बाबत सांगून सदरचे सोन्याचे दागिने काढुन दिले. तसेच सांगोला शहरातील विनय कल्याण कांबळे रा.वासुद रोड, नरेंद्र नगर यांचे बंद घराचे कुलूप कोयडा तोडून त्यांचे घरातील रोख रक्कम तसेच ३ ग्रॅमचे सोन्याचे कानातील दोन टॉप्स जोड, ७ ग्रॅम वजनाचे लहान मुलाचा कंबरेचा करदोडा (चैन) हे देखील आरोपी सुनिल मंडले याने चोरी केले बाबत कबुली देवून सोन्याचे दागिने काढुन दिले आहेत.

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक प्रितमकुमार यावलकर, मंगळवेढा उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रांत गायकवाड, सांगोला पोलीस निरीक्षक भिमराव खणदाळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोना.बाबासाहेब पाटील, पोकॉ.लक्ष्मण वाघमोडे, सायबरचे पोहेकॉ.युसूफ पठाण यांनी केली.

> सांगोला पोलीस ठाणे कडील तीन गुन्हे उघडकीस आणण्यास पोलिसांना यश आले असून सदरचे सोन्याचे दागिणे व मोटार सायकल असा सुमारे २ लाख ४० हजार रुपये किंमतीचा मुददेमाल आरोपी सुनिल मारुती मंडले वय-२६, रा.पिंपरी खुर्द, ता.आटपाडी सध्या रा.देवापूर ता.माण, जि.सातारा व शुभांगी रामचंद्र बुधावले, वय-२६, रा.निंबवडे, ता.आटपाडी यांचेकडुन जप्त करण्यात आलेला आहे.
>
> **- भिमराव खणदाळे, पोलीस निरीक्षक, सांगोला.**

# आमरण उपोषणाच्या मागणीला यश

### शाळा व्यवस्थापन समिती व ॲड. वाघ यांच्या उपोषण इशाऱ्याला यश

**तभा वृत्तसेवा,**
**नातेपुते, दि. १४**

गेली १० ते १२ महिन्यापासून प्रलंबित असलेले, धर्मपुरी-जि.प.प्रा. केंद्रशाळेच्या नवीन इमारतीचे बांधकाम सर्व ग्रामस्थांच्या मागणीनुसार मॉडेल शाळेच्या नवीन डिझाईन व प्लॅननुसार त्वरित सुरु करण्यासाठी आमरण उपोषण करण्याचा इशारा मा .कार्यकारी अभियंता, जि.परिषद सा.बांधकाम विभाग क्र.२,सोलापूर यांना दि.२८.०२.२०२५ रोजी निवेदनाच्या स्वरूपात दिला होता. त्या अनुषंगाने मा .कार्यकारी अभियंता यांनी आपल्या सर्व मागण्या मान्य केल्या असून पुढील ५ महिन्याच्या आत धर्मपुरी केंद्रशाळा इमारतीचे संपूर्ण ७ खोल्यांचे बांधकाम नवीन डिझाईन व प्लॅननुसार अतिरिक्त खर्चासाहित पूर्ण करून देऊ असे लेखी स्वरूपात पत्राद्वारे कळवले आहे.

त्यामुळे उपोषण तात्पुरत्या कालावधी साठी स्थगित करण्यात येत आहे आणि उपोषणाची पुढील दिशा हि शाळेच्या बांधकामाचे स्वरूप, दर्जा व कामाचा वेग यावरून ठरवण्यात येईल. शाळेचे बांधकाम करण्यात वेग दिसला नाही व संपूर्ण बांधकाम वेळेत पूर्ण झाले नाही तर पुन्हा आमरण उपोषण करणार आहोत असे त्यांना सांगण्यात आले आहे.

शाळा व्यवस्थापन समिती, अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, मुख्याद्यापक, सर्व समिती मेंबर, ग्रामपंचायत सदस्य व समस्त धर्मपूरी ग्रामस्थ यांचे मनापासून आभार.

> विशेषता दैनिक 'तरुण भारत' दैनिकांनी धर्मपुरीतील चिमुकल्यांच्या शाळेची इमारत लवकर होण्यासाठी अम्मा ग्रामस्थांचा आवाज प्रशासनापर्यंत पोहोचविला त्याबद्दल दैनिक 'तरुण भारत' टीमचे धर्मपुरी ग्रामस्थ आभारी आहोत
>
> **- ॲड. संदीप वाघ**
> **अध्यक्ष शाळा व्यवस्थापन समिती, धर्मपुरी**



# पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या समर्थनार्थ आंदोलन

### संबंधित महिलेस त्वरीत अटक करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि.१४ मार्च -**

ग्रामविकास मंत्री व सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या विरोधात एका म हिलेकडून हेतूपूर्वक खोटे आरोप करून बदनामी करण्याचा प्रयत्न केला जात आहे. समाजात संभ्रम निर्माण करून त्यांच्या प्रतिष्ठेवर डाग लावण्याचा प्रयत्न केला जात आहे. या प्रकरणाच्या निषेधार्थ भाजपा मोहोळ शहर, तालुका व भाजपा महिला मोर्चा यांच्या वतीने तहसीलदारांकडे बदनामी करणाऱ्या महिलेला त्वरित अटक करावी असे निवेदन देण्यात आले. यावेळी महिला मोर्चा तालुकाध्यक्षा अर्चना बचुटे, जिल्हा उपाध्यक्षा मंगल ओहोळ, दिपाली कोरे, सुशील क्षीरसागर, सुनील चव्हाण, जिल्हा उपाध्यक्ष सतीश काळे, तालुका सरचिटणीस महेश सोवनी, अविनाश पांढरे, गणेश झाडे, गुरुराज तागडे, दीपक पुजारी, नागेश क्षीरसागर, विश्वराज बचुटे,यशवंत नामदे, विशाल चौधरी, मनीषा भुसे आदी उपस्थित होते.

# सुळेवाडी येथे ताबडतोब टँकर सुरु करा

### अन्यथा घागर मोर्चा काढण्याचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. १२ मार्च-**

माळशिरस तालुक्यातील सुळेवाडी येथे पिण्याच्या पाण्याची फेब्रुवारी महिन्यापासुन तिव्र पाणीटंचाई आहे. शासनाकडे या अगोदरही टँकर सुरु करावा म्हणुन निवेदनादवारे मागणी केली होती. पण प्रशासनाने याची कसलीही दखल घेतलेली नाही. गेल्या ३० ते ४० दिवसांपासून सुळेवाडी तसेच इरकरवस्ती व इतर वाडयावस्तयावर पाणयाची तिव्र टंचाई जाणवत आहे. याबाबत प्रशासनाला वारंवार कळविले आहे. पण प्रशासनाने याची अजिबात दखल घेतली नाही यामुळे सुळेवाडी ग्रामस्थ सध्या पाणयासाठी आक्रमक झाले आहेत. या ठिकाणी आठ दिवसाच्या आत पिण्याच्या पाण्याचा टँकर सुरू करावा अन्यथा आम्ही ग्राम पंचायत कार्यालयावर व नंतर पंचायत समिती कार्यालयावर घागर मोर्चा काढणयाचा इशारा विक्रम सुळे व सुळेवाडी येथील इतर ग्रामस्थांनी गटविकास अधिकारी पंचायत समिती माळशिरस व मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद सोलापूर यांच्या कडे केली आहे.




> सध्या सुळेवाडी ग्रामपंचायतीवर प्रशासकीय राजवट आहे. त्यांना टँकरचा प्रस्ताव दिला आहे का म्हणून विचारले असता ते दिला आहे म्हणतात तर गटविकास अधिकारी म्हणतात सुळेवाडी गावाचा टँकर मागणीचा प्रस्ताव आमच्याकडे आलाच नाही असे सांगत आहेत.

# वस्तीवरील निवासी शेतकऱ्यांना शस्त्र परवाना देण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १४ मार्च-**

चपळगाव वळसंग रस्त्यावरील शेतकऱ्यांच्या वस्तीवरून वारंवार जनावरे चोरीला जात असल्याने शेतकऱ्यामध्ये भीतीचे वातावरण आहे. पोलिसांनी चोरांना तात्काळ अटक करावी. अन्यथा शेत वस्तीवरील निवासी शेतकऱ्यांना शस्त्र परवाना देण्याची मागणी सेवानिवृत्त ग्रामविकास अधिकारी एस.जी. वंगे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

> चपळगाव ते तिर्थ मार्गावर चपळगाव, चपळगाववाडी, हालहळ्ळी (अ), डोंबरजवळगे, तिर्थ या पाच गावच्या हद्दी एकाच ठिकाणी एकत्रीत येतात. त्या स्थळाला गड्डी लक्ष्मी या नावांने ओळखले जाते. हा परिसर अक्कलकोट तालुक्यातील नॉर्थ पोलीस स्टेशन तसेच वळसंग पोलीस स्टेशन या कार्यक्षेत्राच्या सीमेवर आहे. हा परिसर चोरांचे प्रमुख ठिकाण बनले असल्याने येथे शेतकऱ्यांना जगणे कठीण बनला आहे.

शुक्रवारी दि.७ मार्च रोजी सिध्देश्वर बिराजदार या शेतकऱ्याच्या म्हशी, कालवड यांची चोरी झाली आहे. याबाबत वळसंग पोलीस स्टेशनला गुन्हा नोंदवला आहे. गेल्या एक वर्षापासुन या परिसरात चोरांचा सुळसुळाट आहे. यापुर्वीही त्याच शेतकऱ्यांची जनावरे चोरल्या बाबत तक्रार दाखल होती.

# सखी ग्रुपतर्फे निराधारांची आरोग्य तपासणी



**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १४ मार्च-**

बॅगेहळ्ळी रोडवरील भटके, फिरति डवरी समाजातील झोपड्या वस्तीतील महिला व मुलींची आरोग्य तपासणी करून महिला दिनानिमित्त सखी ग्रुपच्या वतीने डॉ. दीपमाला आडवीतोटे व डॉ. मंजुषा मेंथेनी आरोग्य तपासणी करून औषधोपचार केला.

सखी ग्रुप नेहमीच सम ाजाच्या उपेक्षित वंचित घटकातील निराधार, होतकरू, गरीब लोकांची नेहमी समाजहित सेवा करत आले आहेत. परिसरातील बॅगेहळ्ळी रोडवरील भटके, फिरति डवरी सम ाजातील झोपड्या वस्ती परिसरात सखी ग्रुपच्या सर्व सदस्यांनी म हिला दिनाच्या दिवशी स्वच्छता केली.

यानंतर रुग्ण तपासणी करण्यात आले या तपासणीमध्ये बऱ्याच महिलांचे शरीरामध्ये हिमोग्लोबिन, कॅल्शियम, आयर्न जीवनसतवे कमी असलेले आढळून आलेले आहे. त्याबाबतच्या आहाराबाबत मार्गदर्शन करून त्यांना संबंधितना औषधे देण्यात आले.

या कार्यक्रमास सखी ग्रुपच्या सोनल जाजू, सुवर्णा साखरे, लक्ष्मी अचलेर, माधवी धर्मसाले, रोहिणी फुलारी आशा भगरे, उषा छत्रे अश्विनी बोराळकर, श्रद्धा मंगरुळे, वेदिका हर्डीकर, रत्नमाला मचाले, अनिता पाटील, प्रियंका किरनळी, शितल जीरोळे, रेखा तोरस्कर आदी महिला उपस्थित होत्या.

> मल्लम्मा पसारे यांनी या महिला व मुलींना स्वच्छता, आहार विहार व सखी ग्रुपच्या कार्याविषयी माहिती दिली. यानंतर या सर्वांना फळे व मिठाईचे वितरण सखी ग्रुपच्या वतीने देण्यात आले. सखी ग्रुपतर्फे ७२ महिलांना टॉवेल्स प्रेमाची भेट दिली.

# विद्यार्थी बनले एक दिवसाचे शिक्षक



**तभा वृत्तसेवा,**
**अणदूर, दि. १४ मार्च-**

विद्यार्थ्यांना शालेय प्रशासनाचा अनुभव यावा त्यांच्यात नेतृत्व गुण विकसित व्हावे यासाठी आज जिल्हा परिषद प्राथमिक शाळा निलेगाव (ता.तुळजापूर) येथे स्वयंशासन दिन उत्साहात संपन्न झाला. त्याचबरोबर आपल्या सहकारी बालमित्रांना शिकवण्याचा जो अनुभव मिळतो त्यातून त्यांना बरेच काही शिकायला मिळते हे आज त्यांनी अनुभवले.

यावेळी सरपंच शंकर जम ादार, उपसरपंच मोहसीन इनाम दार, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष समद पटेल, मुख्याध्यापक शिवाजी जाधव शाळेतील ज्येष्ठ शिक्षिका श्रीमती चौधरी उपस्थित होते. सातवीच्या विद्यार्थ्यांनी अनुभवकथन केले. ज्येष्ठ शिक्षक परकाळे गुरुजी, सुतार गुरुजी, प्रकाश जाधव, गोरे गुरुजी, शुभदा कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले. यावेळी सरपंच जमादार यांनी ४४ विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप केले. शाळेची आठवण रहावी म्हणून इयत्ता सातवीच्या सर्व विद्यार्थ्यांनी मिळून शाळेसाठी सहा खुर्च्या भेट दिल्या.

सूत्रसंचालन गुरुलिंग ढावणे तर आभार प्रदर्शन ढम्मे गुरुजी यांनी केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# संक्षिप्त वृत्त

## अखिल भारतीय मराठी संत साहित्य संमेलनाचे शिर्डी येथे आयोजन

**पंढरपूर, दि.१४ मार्च -**

यंदाचे अखिल भारतीय मराठी संत साहित्य संमेलन २२ ते २३ मार्च रोजी शिर्डी येथे असून या संमेलनाचे अध्यक्ष संत तुकाराम महाराजांचे वंशज ह.भ.प संजय महाराज देहूकर, स्वागताध्यक्ष राधाकृष्ण विखे-पाटील, असतील, अशी माहिती वारकरी साहित्य परिषदेचे अध्यक्ष विठ्ठल पाटील यांनी दिली. पंढरपूर येथे शुक्रवारी (ता.१४) पत्रकार परिषदेत बोलताना पाटील यांनी सांगितले की, संत साहित्याची माहिती सर्वांना समजावी, तसेच संत साहित्याचा प्रसार व्हावा, त्याचे अनुयायी वाढावेत, यासाठी वारकरी साहित्य परिषदेकडुन दरवर्षी संत साहित्य संमेलन घेतले जाते. यंदाचे तेरावे संत साहित्य संमेलन आहे. या संमेलनामध्ये नऊ राज्यातील संत साहित्याचा प्रचार करणारे महाराज मंडळींचा सन्मान केला जाणार आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांची उपस्थिती राहणार आहे. या संमेलनासाठी १५ हजार भाविक उपस्थित राहणार असून पुढील काळात सर्व राज्यांमध्ये संमेलन घेतले जाणार असल्याचे पाटील यांनी सांगितले.





## जिल्हा कलाध्यापक संघाचा चित्रकार भारत गदगे यांना जीवनगौरव पुरस्कार

**पंढरपूर, दि.१४ मार्च -**

जिल्हा कलाध्यापक संघाच्या वतीने घेण्यात आलेल्या रंगभरण व सुंदर हस्ताक्षर स्पर्धेतील विजेत्यांचा पारितोषिक वितरण समारंभ व विविध पुरस्कार संपन्न झाला. हिराचंद नेमचंद वाचनालय येथील किर्लोस्कर सभागृहात विजेत्यांना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. पंढरपूर येथील माजी कलाध्यापक व चित्रकार भारत गदगे यांना जीवन गौरव व शहरी विभागातून आदर्श कलाध्यापक म्हणून यंदाच्या वर्षी अरिहंत इंग्लिश मीडियम स्कूल मधील कलाशिक्षिका प्रभावती आडकी तर ग्रामीण विभागातून खंडाळी येथील कै पार्वतीबाई ननवरे हायस्कूलचे कलाशिक्षक शरद भोसले यांना मान्यवरांच्या हस्ते आदर्श कलाध्यापक पुरस्कार प्रदान करण्यात आले. शाल, सन्मान चिन्ह, सन्मान पत्र असे पुरस्काराचे स्वरूप होते. सत्कारमूर्तींचे कार्य यांचं विशेष गौरव उद्गार कार्याध्यक्ष देवेंद्र निंबर्गीकर यांनी केले. प्रारंभी संघटनेचे अध्यक्ष गणेश तडका यांनी प्रास्ताविक केले तर पुणे विभागीय सहकार्यवाह दिपक कन्ना यांनी वार्षिक अहवाल वाचन केले. संघटनेचे सचिव मुकुंद मोरे यांनी यादी वाचन केले. या समारंभास सुदर्शन देवरकोंडा, गोपाळ डोंगे, धर्मेश टंक, मुख्याध्यापक गोपीनाथ नवले, सतीश सुभेदार, युवराज मेटे, श्रीशैल पुजारी, दीपक कन्ना आदी मान्यवर उपस्थित राहून १८० विद्यार्थ्यांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. सूत्रसंचालन शिल्पा म्हमाणे, तर यादी वाचन शहरी विभाग संगीता पवार तर ग्रामीण विभाग सुरेश मलाव यांनी केले.



## महिलांनी उच्च शिक्षण घेऊन स्वावलंबी बनावे : उपजिल्हाधिकारी मनिषा कुंभार

**सोलापूर, दि.१४ मार्च -**

आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात स्त्रियांनी उच्च शिक्षण घेऊन स्वावलंबी बनून सुंदर जीवन जगावे, असे प्रतिपादन निवासी उपजिल्हाधिकारी मनिषा कुंभार यांनी केले. जागतिक महिला दिनानिमित्त श्री मार्कंडेय हायस्कूल विडी घरकुल कुंभारी येथे आयोजित केलेल्या कार्यक्रमात प्रमुख त्या बोलत होत्या. यावेळी स्त्रीरोग तज्ञ डॉ. राजश्री मठ व वळसंग पोलीस स्टेशनच्या पोलिस हवालदार असीमा पटेल यांची उपस्थिती होती. प्रारंभी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनानंतर कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. उपस्थितांचे स्वागत प्रशालेचे मुख्याध्यापक अमोगसिद्ध कुंभार यांनी केले. यावेळी मनीषा कुंभार यानी मुलींना प्रामाणिक सत्वशील, निरोगी, सुदृढ, स्वावलंबी व आत्मनिर्भर जीवन जगण्याचे आवाहन केले व मुलीशी संवाद साधला. यावेळी प्रशालेतील विद्यार्थिनींनी सावित्रीबाई फुले, कल्पना चावला, आनंदीबेन जोशी, सिंधुताई सपकाळ, इंदिरा गांधी, लता मंगेशकर, सावित्रीबाई फुले यांच्या वेशभूषा परिधान केल्या होत्या. यावेळी उपस्थित सर्व महिला पालकांचा व प्रशालेतील शिक्षिकांचा प्रशालेतर्फे भेटवस्तू व गुलाब पुष्प देऊन पर्यवेक्षिका सुमन बिराजदार यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अश्विनी पडनुरकर यांनी केले तर लक्ष्मी पाटील यांनी आभार मानले.

## वायुवेग पथकामार्फत कारवाई केलेल्या वाहनधारकांनी ८ एप्रिलपर्यंत रक्कम भरावी

**सोलापूर, दि. १४ मार्च-**

प्रादेशिक परिवहन कार्यालय सोलापूर विभागाच्या वायुवेग पथकामार्फत अटकाविण्यात आलेल्या ४५ वाहनांच्या वाहनधारकांनी दि. ८ एप्रिल २०२५ पूर्वी वसूली योग्य असलेली रक्कम प्रादेशिक परिवहन अधिकारी सुंदरम नगर विजापूर रोड ,सोलापूर यांचेकडे भरण्यात यावी, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय पाटील यांनी केले आहे. रक्कम भरण्यात आली नाही तर सोडवून न नेलेल्या वाहनांची ई लिलावाद्वारे दि. ९ एप्रिल रोजी विकण्यात येतील. ई लिलावाच्या नंतर थकबाकीदारास वाहन कर भरण्याचा तसेच मालकी हक्काचा अधिकार राहणार नाही.

# रजपूत समाजाची पारंपारिक धुळवड उत्साहात संपन्न

## चौपाड बालाजी मंदिरापासून निघाली रंगगाड्यांची मिरवणूक



सोलापूर : चौपाड परिसरातील बालाजी मंदिरातून शुक्रवार राजपूत समाजाची रंग गाडी पारंपारिक पद्धतीने काढण्यात आली. त्याप्रसंगी होळीची गाणी सादर करण्यात आली.

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ मार्च-**

सोलापूर शहरातील रजपूत समाजाची पारंपारिक धुळवड बालाजी मंदिर चौपाड येथे मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. धुलीवंदन दिवशी सकाळी श्रींच्या मूळ मूर्तीसह अभिषेक घालण्यात तर नंतर दुपारी चार वाजता उत्सव मूर्तीला अभिषेक घालून गुलाल उधळण्यात आला. तदनंतर मंदिरात भजन कीर्तन सादर करून रंग गाड्यांची मिरवणूक मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणात काढण्यात आली. यावेळी प्रमुख मान्यवर म्हणून जिल्हा सरकारी वकील प्रदीप सिंग रजपूत, शिवसेना जिल्हाध्यक्ष अमोल शिंदे, प्रताप चव्हाण आदींची उपस्थिती होती.

दरम्यान, प्रमुख मान्यवरांच्या हस्ते श्रींचे आरती करून रंगगाड्यांची मिरवणूक सुरू झाली. चौपाड बालाजी मंदिरापासून सुरू झालेली ही मिरवणूक माहेश्वरी मारवाडी मंदिर येथे मार्गस्थ झाली. त्यानंतर मारवाडी समाजाच्या वतीने श्रीं बालाजींची आरती करण्यात आली.

त्यानंतर सदरची मिरवणूक मीठ गल्ली मार्गे माणिक चौक, दत्तचौक, नवीपेठ, मार्गे पुन्हा चौपाड बालाजी मंदिर येथे विसर्जित करण्यात आली. राजपूत समाजाच्या धुलीवंदन रंगगाड्यांच्या मिरवणुकीस तब्बल २०० वर्षांची परंपरा आहे. आज तागायत ही परंपरा अखंडपणे सुरू आहे. तत्पूर्वी होलिका दहन अर्थात होळी दिवशी पाणीवेस, चौपाड, थोरला मंगळवेढा तालीम, येथे पंच होळी पेटवण्यात आली. त्यानंतर धुलीवंदन दिवशी त्या होळीची राख एकत्रित करून ज्या समाज बांधवांच्या घरी दुःखद निधन झाले आहे, आशांच्या घरी राख आणि गुलाल, आंबील लावून त्यांचे कडू काढले. त्यानंतर गोड पदार्थ देऊन या उत्सवात सामील करून घेतले. अशीही परंपरा रजपूत समाजाच्या वतीने कायम सुरू आहे. अशी माहिती श्री बालाजी मंदिर ट्रस्टचे सचिव उज्वल दीक्षित यांनी दिली.

पारंपरिक कोरडा रंग उधळून रजपूत समाजाने धुलीवंदन मोठ्या उत्साहात साजरा केला. याप्रसंगी श्री बालाजी मंदिर ट्रस्टचे सचिव उज्वल दीक्षित, दिलीप सिंग हजारी, अमित पवार, दर्शन दुबे, जितेंद्र इटाई, महेश बायस, किरण सिंग चव्हाण, मुकेश ठाकूर, रोहित परदेशी, जयराज बायस आदींसह या उत्सव मिरवणुकीत आबालवृद्ध रजपुत समाज मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी मिरवणूक मार्गावर पोलीस बंदोबस्त तैनात करण्याचा आला होता.

### दोनशे वर्षांची परंपरा

होलिका दहन संपन्न झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी धुलीवंदन संपूर्ण महाराष्ट्रात साजरा केला जातो. सोलापुरात देखील रजपूत समाजाच्या वतीने परंपरेनुसार धुळवड साजरी केली जाते. या दिवशी राजपूत समाज बांधव बालाजी मंदिर चौपाड येथून रंग गाड्यांची मिरवणूक काढतात. या मिरवणुकीमध्ये सर्व समाज बांधव एकत्रित येऊन उत्साहात सहभागी होतात. ज्यांच्या घरी दुःखद निधन झाले. अशांच्या घरी देखील गुलाल आंबील लावून त्यांना या उत्साहात सहभागी करून घेतले जाते. या धुळवड उत्सवाला सुमारे दोनशे वर्षांची परंपरा आहे.

**- प्रदीपसिंह राजपूत,**
जिल्हा सहकारी वकील



## बंजारा समाजाचा धुंड कार्यक्रम

### महिलांनी लुटला दंडुक्याने मारण्याचा आनंद

**सोलापूर, दि. १४ मार्च-**

बंजारा समाजासाठी आनंदाचा व महत्वाचा मानला जाणारा होळी सणातील धुंड कार्यक्रम उत्माहात संपन्न झाला. मुलगा जन्मलेल्या कुटुंबात बारसं करून आशीर्वाद देण्यासाठी धुंड केला जातो. यावेळी बंजारा महिला खिरीचा हंडा काढताना पुरूषांना दंडुक्याने मारत शिव्या देण्याची प्रथा आहे. धुंडमुळे महीला आनंदी असतात. तर यावेळी आपला व परका अथवा नवरा, मुलगा व इतर असा कोणताही भेदभाव न करता दंडुक्याने मारतात. प्रत्येक तांडयात होळीच्या दुसर्या दिवशी चार ते पाच धुंड कार्यक्रम असतात. मंद्रुपमध्ये नाईक नगर तांडा येथील माजी पंचायत समिती सदस्या शालन चव्हाण यांच्या मुलगा सागर यांच्या कुटुंबात धुंड कार्यक्रम संपन्न झाला.

# आजची गर्दी म्हणजे गेल्या पाच वर्षात केलेल्या कामाची पोचपावती : राम सातपुते

**नातेपुते, दि.१४ मार्च-**

मी २०१९ ला आमदार झाल्यावर माळशिरस तालुक्याच्या विकासाबरोबर माणसे जोडण्याची काम केले. माळशिरस तालुक्यात काम करणे तसे तारेवरची कसरत आहे. गोरगरिबांसाठी काम करण्याची माझ्या अंगात रग आहे, मी ज्या परिवारातून, ज्या परिस्थितीतून आलोय त्या परिस्थितीतून ही जनता जात आहे.



जनतेला आधार देण्यासाठी मला भाजपने या ठिकाणी पाठवले आणि त्याच भावनेतून आपण काम केले पाहिजे अशी माझी भावना आहे मी पार्टीशी आणि जनतेशी गद्दारी कधीही करणार नाही गद्दारी ही सातपुतेच्या रक्तात कधीही नाही रोज माझा सकाळचा एक तास आरोग्याच्या बाबतीत अडचणीत असलेल्या लोकांची अडचण सोडवण्यासाठी देतो मी गेल्या पाच वर्षात कारखाना किंवा दूध संघ काढला नाही तर माणसे जोडण्याचा कारखाना मागच्या पाच वर्षांमध्ये माळशिरस तालुक्यामध्ये काढला माणसांची आपुलकीने कामे केली पाच वर्षात लोकांना मला भेटण्यासाठी कोणत्याही पुढाऱ्याच्या चिठ्ठीची गरज लागली नाही माझा थेट जनतेशी संपर्क असल्याने लोकांची कामे होत असतात लोकांच्यात मिसळून जनतेची कामे केल्याने माझ्या अभिष्टचिंतन सोहळ्यास जी आज गर्दी दिसत आहे ती गेल्या पाच वर्षात जनतेच्या केलेल्या कामाची पोचपावती होय इथून पुढे हे मी आमदार असो अगर नसो परंतु माळशिरस तालुक्यातील जनतेचे काम करत राहणार माळशिरस तालुक्याच्या शेजारच्या तालुक्यात तेथील नेत्यांनी एमआयडीसी आणली परंतु माळशिरस तालुक्यात गेल्या ७० वर्षात एमआयडीसी झाली नाही तालुक्यात एमआयडीसी आणि बावीस गावांना पाणी आणण्याचा माझा संकल्प आहे त्याचप्रमाणे शेती महामंडळाची जागा तालुक्यातील गावांना गावठाण म्हणून मिळण्यासाठी माझा प्रयत्न चालू आहे. तालुक्यातील जनता माझ्याकडे सक्षम नेता म्हणून बघत आहे.

मी या जनतेसाठी पराभूत झालो काय किंवा निवडून आलो काय मी काम करत राहणार आहे तालुक्यातील प्रस्थापिता कडून जुन्या पिढीने खूप भोगले माझा विरोध कोणा एका व्यक्तीला नाही परंतु गोरगरिबांना त्रास देणाऱ्या प्रवृत्तीला आहे आपणा सर्वांना तालुक्यातील जुलमी व्यवस्था उलटून टाकायची आहे त्याचप्रमाणे खोटा जातीचा दाखला लय दिवस टिकणार नाही माळशिरस तालुक्यात लवकरच पोटनवडणूक होईल त्यासाठी आपण कामाला लागावे दाखला टिकणार नाही म्हणूनच विरोधकाची फडफड चालू तालुक्यातील जनतेने मला खूप प्रेम दिले असेच प्रेम राहू द्या आपण सर्वजण मिळून काम करूया असे प्रतिपादन माळशिरस तालुक्याचे माजी आमदार राम सातपुते यांनी १२ मार्च आपल्या अभिष्टचिंतन सोहळ्यास मांडवे येथील श्रीराम निवास येथील बंगल्यावर जमलेल्या अपाट गर्दीला संबोधित करताना केले. यावेळी मान्यवरांनी सातपुते यांनी केलेल्या कामाबद्दल वाढदिवसाच्या शुभेच्छा देऊन आपली मनोगते व्यक्त केली. यावेळी भाजपासह महाविकास आघाडीसह वेगवेगळ्या पक्षातील पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी शुभेच्छा देण्यासाठी श्रीराम बंगल्यावर गर्दी केले होती.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक किसान मोर्चाचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब सरगर यांनी केले सूत्रसंचालन जाधव यांनी केले. यावेळी संस्कृतीताई सातपुते, शशिकांत चव्हाण, शरद मोरे, रमेश पाटील, बाजीराव काटकर, हंसराज माने पाटील, सुजयसिंह माने पाटील, आप्पासाहेब देशमुख, बाळासाहेब वावरे, विजय देशमुख, ॲड बी वाय राऊत, ॲड शरद मदने, मिलिंद सरतापे, गणेश चिवटे, संजय देशमुख, महादेव पवार, महादेव कावळे आदी मान्यवर उपस्थित होते .



**बंजारा समाजाची होळी उत्साहात...**
सोलापूर : नेहरूनगर परिसरात शुक्रवारी सायंकाळी बंजारा समाजात होळी उत्सव मोठ्या उत्साहाने साजरा केला. यात समाजातील महिला भगिनीनी उपस्थित राहून पारंपारिक लोकगीते सादर केली.

### बार्शी नगरपरिषदेची धडक कारवाई

# कर थकलेल्या आस्थापना सील

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. १४ मार्च**


बार्शी नगरपरिषदेच्यावतीने मार्च अखेरच्या पार्श्वभूमीवर घरपट्टी, पाणीपट्टी वसुली मोहीम तीव्र केली आहे. जून आणि डिसेंबर २०२४ पासून नोटीसा देऊनही नागरिक कर भरत नाहीत. त्यामुळे नाईलाजाने आस्थापना सीलबंद करणे, मालमत्ता जप्त करणे इत्यादी उपाय करावे लागत आहेत, अशी माहिती कर अधिकारी तथा उपमुख्याधिकारी विठ्ठल पाटोळे यांनी दिली.




उपळाई रस्ता येथील शासकीय धान्य गोदामालगत असलेल्या दोन दुकानांच्या मालकांनी नगरपरिषदेने वारंवार आवाहन करुनही कोणताही प्रतिसाद न देत कर भरला नाही. त्यामुळे गुरुवार दि. १३ रोजी त्या आस्थापना सील करण्यात आल्या. येथील गाळा नंबर ११ व १२ या दोन गाळ्यांची अनुक्रमे थकीत रक्कम १ लाख ४ हजार व १ लाख १२ हजार, अशी एकूण सुमारे २ लाख २० हजार थकबाकी आहे. थकबाकी न भरलेल्या आस्थापनाचा व जप्त केलेल्या स्थावर मालमत्तेचा लिलाव नगरपरिषद करणार व त्यातून सर्व कर वसूल करणार असल्याचेही कर अधिकाऱ्यांनी यावेळी सांगितले.

या कारवाई वेळी वरिष्ठ लिपीक देवेंद्र गव्हाणे, लिपीक सचिन पवार, लिपीक अविनाश लावंड, ज्ञानेश्वर हराळे, रामा पौळ, राहूल बोकेफोडे उपस्थित होते. शहरातील नागरिकांनी ३१ मार्चपूर्वी आपली घरपट्टी व पाणीपट्टी भरुन सहकार्य करावे, कारण कर भरण्याच्या टक्केवारीवर केंद्र व राज्य शासनाचा विकास निधी मिळत असतो. म्हणूनच नागरिकांनी कर भरुन नगरपरिषदेस सहकार्य करावे, असे आवाहनही यावेळी पाटोळे यांनी केले.

करवसुली करत असताना कोणत्याही थकीत मालमत्ता अथवा आस्थापनांना सवलत दिली जाणार नाही. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मुख्याधिकारी बाळासाहेब चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली बार्शी नगरपरिषदेच्यावतीने यापुढे वसुलीची मोहीम आणखी तीव्र केली जाणार असल्याचे यावेळी पाटोळे यांनी सांगितले.




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## सिध्देश्वर पेठेतील पार्क अपार्टमेंटमध्ये अडीच लाखांची घरफोडी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ मार्च-**

शहरातील सिध्देश्वर पेठेतील पार्क अपार्टमेंटमध्ये चोरट्याने फ्लॅटचा दरवाजा तोडून २ लाख ७१ हजार रुपयांचे सोन्या-चांदीचे दागिने चोरून नेले. याबाबत कादर राजुमिया शेख (वय ५०, रा. ६ वा मजला, फ्लॅट नं. ६, पार्क अपार्टमेंट, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

१३ मार्च रोजी कादर शेख हे सकाळी दहाच्या सुमारास घराला कुलूप लावून बाहेर गेले होते. ते परत रात्री घरी आले. त्यावेळी त्यांना घरात चोरी झाल्याचे दिसून आले. चोरट्याने शेख यांच्या घराचे मेन दरवाजाचे कुलूप तोडून बेडरूमचे कुलूपदेखील तोडले. कपाट उचकटून कपाटात ठेवलेले २ लाख ७१ हजार २०० रुपये किंमतीचे सोन्या-चांदीचे दागिने चोरून नेले. म्हणून जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक डेरे पुढील तपास करीत आहेत.



## ▶▶ संक्षिप्त वृत्त...

### डॉ.पोर्णिमा धुमाळे यांचे रविवारी शास्त्रीय गायन


**सोलापूर दि.१४ मार्च-**

स्व. पंडित प्रभूदेव सरदार यांच्या जन्मशताब्दी निमित्त त्यांचे कुटुंबीय आणि शिष्यवर्ग यांच्या वतीने रविवार दिनांक १६ मार्च रोजी सायंकाळी ५-३० वाजता हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या लोकमान्य टिळक सभागृहात डॉ पौर्णिमा धुमाळे यांच्या गायनाचा कार्यक्रम आयोजित केला आहे. अशी माहिती शुभांगी देशक यांनी दिली आहे. डॉ. पौर्णिमा धुमाळे या आग्रा घराण्याच्या सुप्रसिद्ध गायिका आहेत. त्यांना तबल्यावर संजय देशपांडे तर संवादिनीवर लीलाधर चक्रदेव हे साथसंगीत करणार आहेत. भारतीय शास्त्रीय संगीताच्या परंपरेने समृद्ध असलेल्या कुटुंबात जन्मलेल्या डॉ. धुमाळे यांनी आई डॉ. सुलभा ठकार यांच्याकडून संगीताचे प्राथमिक प्रशिक्षण घेतले. खासकरून सादरीकरणाच्या बहारदार शैलीसाठी त्या प्रसिद्ध आहेत. त्यांचे गायन म्हणजे दुर्मिळ राग आणि रचनांचा सुरेख मिलाफ आहे. तरी सर्व रसिक श्रोत्यांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहावे हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला आहे असे आवाहन प्रभूदेव सरदार यांच्या शिष्यवर्गांनी केले आहे.

### अमोल देशमुख यांना अभिनयाचे रौप्य पदक

**सोलापूर दि.१४ मार्च-**

सांस्कृतिक कार्य संचालनालयाद्वारे घेण्यात येणारी हिंदी राज्य नाट्य स्पर्धा नेहमीप्रमाणेच पुणे, मुंबई आणि नागपूर या तीन ठिकाणी घेण्यात आली या तीन ठिकाणी मिळून एकूण ५८ नाटकांनी सादरीकरण केले. या सर्व नाटकांमध्ये सोलापुरातील दिग्दर्शक आणि अभिनेते अमोल देशमुख यांना त्यांच्या खिडकीया या नाटकासाठी अभिनयाचे रौप्य पदक मिळालेले आहे. यापूर्वी हे नाटक मराठी राज्य नाट्य स्पर्धेत सादर झालेले होते रविशंकर झिंगरे यांच्या या संहितेचे हिंदी रूपांतर जैद हसन शेख या कलावंताने केले.



### महाराष्ट्र प्रश्नचिन्ह फाउंडेशन तर्फे आज ग्राहक मेळावा

**सोलापूर दि.१४ मार्च-**

महाराष्ट्र प्रश्नचिन्ह फाउंडेशन, ऑल इंडिया ह्यूमन राईट असोसिएशन शाखा सोलापूर, मूकनायक प्रतिष्ठान आणि चौडेश्वरी दिव्यांग बहुउद्देशीय संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार दि. १५ मार्च २०२५ रोजी सायंकाळी ४ वाजता ग्राहक मेळावा आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती संस्थापक बसवराज येरनाळे यांनी पत्रकार परिषदेत दिली. सोलापुरातील रंगभवन चौक येथील समाज कल्याण केंद्रात हा मेळावा होणार आहे. जागतिक ग्राहक दिनानिमित्त बँक कर्ज मुक्ती संदर्भात हा मेळावा होणार आहे. ग्राहक, कर्जदार, जमीनदार, ठेवीदार यांच्यावर होत असलेल्या अन्यायाविरुद्ध यावेळी चर्चा करण्यात येणार आहे. यावेळी संबंधितांनी उपस्थित राहावे, असे आवाहन संस्थापक येरनाळे यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस हेमंत ढवळशंख, आनंद भीम नपल्ली, सुरज बिलोरे आदी उपस्थित होते.

### शाळेजवळ खेळताना स्टेजवरून पडल्याने बालक जखमी

**सोलापूर दि.१४ मार्च-**

एमआयडीसी परिसरातील नेताजी प्रशालेजवळ खेळत असताना स्टेजवरून पडल्याने सात वर्षाचा बालक जखमी झाला. हा प्रकार गुरुवारी दुपारी दोनच्या सुमारास घडला. नागेश आळप्पा नाईकवाडी (वय ७, रा. नेताजी शाळा) असे जखमी झालेल्या बालकाचे नाव आहे. गुरुवारी दुपारी दोनच्या सुमारास नागेश हा शाळेच्या परिसरात खेळत होता. त्यादरम्यान तो स्टेजवरून पडल्याने त्याच्या डोक्याला मुकामार लागला. रात्री ७.३० वाजता आजी ललिता कुर्ले यांनी उपचारास दाखल केले.

### कचरा जाळताना भडका उडून तरुणी भाजली

**सोलापूर दि.१४ मार्च-**

घरासमोरील गोळा केलेला कचरा पेटविल्यानंतर आगीचा भडका उडून तरुणी भाजून जखमी झाली. हा प्रकार ४ मार्च रोजी सकाळी १० वाजता घडला. कावेरी संतोष घाटे (वय १८, रा. हुबळी कर्नाटक) असे तरुणीचे नाव आहे. कावेरी ही सोलापुरातील एमआयडीसी परिसरातील आशा नगरात राहण्यास होती. ती घटनेच्या दिवशी हुबळी येथील गोकुळ रोडवरील जगदीश नगरात होती. तिने तेथील राहते घरासमोर झालेला कचरा गोळा केल्यानंतर तो पेटविला. अचानक त्या आगीचा भडका उडून कावेरीच्या कपडयाने पेट घेतल्याने ती भाजून जखमी झाली. नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

# अमरावतीच्या विमानसेवेला मिळाला मुहूर्त मात्र, सोलापूरच्या विमानसेवेचं घोंगडं भिजतच!

### ▸ सोलापूरच्या विकासाकडे वरिष्ठ नेत्यांनी फिरविली पाठ

**तभा वृत्तसेवा । अविनाश गायकवाड**
**सोलापूर, दि. १४ मार्च-**

येथील बोरामणी विमानतळाबरोबर जाहीर झालेली शिर्डी विमानसेवा जोरात सुरू असून, अमरावती येथे बेलोरा विमानतळावरून प्रवासी वाहतूक सेवा सुरू होण्याच्या मार्गातील महत्वाचा टप्पा पूर्ण झाला असून, अमरावती विमानतळाला नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने (डीजीसीए) परवाना दिला असल्याची माहिती खुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'ट्वीट' करून दिली आहे. दरम्यान, सोलापूर विमानतळाचं मात्र घोंगडं अजून का भिजत घातलं असल्याचा सवाल सोलापुरातील जाणकार मंडळी सरकारला विचारत आहे. तर सत्तेतील वरिष्ठ नेत्यांनी मात्र सोलापूर शहर-जिल्हा विकासाकडे पाठ फिरविली असल्याची खंत काही अनेकांनी दै. तरूण भारतशी संवाद साधताना व्यक्त केली.



'रिजनल कनेक्टिव्हीटी स्कीम' अंतर्गत अमरावती विमानतळ आता अधिकृत परवानाधारक विमानतळ म्हणून घोषित झाले आहे. अलायन्स एअरची मुंबई-अमरावती-मुंबई ही विमानसेवा सुरुवातीला आठवड्यातून तीनदा सेवा देईल. येत्या ३१ मार्चपासून प्रवासी विमानसेवा सुरू करण्याचे सरकारचे नियोजन आहे. अमरावती विमानतळावर नुकतीच 'एअर कॅलिबरेशन ऑफ प्रिसिजन अप्रोच पाथ इंडिकेटर' अर्थात 'पीएपीआय' चाचणी यशस्वीरीत्या पूर्ण केली आहे. त्यामुळे अमरावतीकरांना मुंबईपर्यंत विमानाने ये-जा करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या ठिकाणाहूनही ७२ आसनी विमान उडू शकणार आहे. मग सोलापूरहून सुरू होणाऱ्या ७२ आसनी विमानसेवेचा परवाना नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाकडून का दिला जात नाही? असाही सवाल सोलापुरातील जाणकार नागरिकांतून विचारला जात आहे.

सोलापूरच्या विमानसेनेचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाल्यानंतर ही विमानसेवा सुरू करण्यासाठी सोलापूर विकास मंच, माजी आ. संजयमामा शिंदे, आ. सचिन कल्याणशेट्टी, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी प्रचंड परिश्रम घेतले मात्र हायटेक नेत्यांनी यांची दाळ शिजू दिली नाही. स्वत: मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोलापूरच्या विमानसेवेबाबत ६ जानेवारी २०२५ रोजी एक व्हिसीद्वारे बैठक घेवून संबंधित यंत्रणेला लवकर विमानसेवा सुरू करण्याबाबत निर्देश दिले होते. आता २ महिने उलटले तरी विमानसेवा सुरू झाली नाही.

६ जानेवारीला सोलापूर विमानसेवेचा आढावा घेण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्हिसीद्वारे घेतलेल्या बैठकीसाठी केंद्रीय उड्डयन मंत्री मुरलीधर मोहोळ, केंद्रीय आणि राज्य एअरपोर्ट ॲथॉरिटीचे संबंधित अधिकारी, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, पोलिस आयुक्त एम. राजकुमार यांच्यासह स्थानिक प्रशासनातील २ प्रांत व इतर अधिकारी उपस्थित होते. या बैठकीवेळी जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी सोलापूरच्या विमानसेवेतील अडचणी मुख्यमंत्र्यांसमोर मांडल्या होत्या. त्या ऐकून घेतल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विमानसेवेच्या संबंधित यंत्रेणेशी आणि मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्याशी संवाद साधून सोलापूरच्या विमानतळाबाबत असलेल्या आवश्यक त्या सर्व परवानगी देण्यासाठी तत्काळ पूर्तता करून लवकरात लवकर ही विमानसेवा चालू करावी, असे निर्देश दिले. यामुळे जानेवारी महिनाखेर ही विमानसेवा सुरू होण्याचे संकेत मिळत होते. मात्र अजून तरी विमानसेवेबाबत कसलीच हालचाल होत नसल्याने स्थानिकच्या पुढाऱ्यांनी आणि जिल्हा प्रशासनानेही या सेवेबाबत अक्षरशः हात टेकले आहेत. निवडणुकीपूर्वी एका पत्रकार परिषदेत मंत्री मोहोळ यांनीही सोलापूरकरांना ही विमानसेवा लवकर सुरू करण्याचे आश्वासन दिले होते. गेल्या अनेक वर्षांपासून सुरु असलेल्या मागणीला यश येत नसल्याने सोलापूर विकास मंचचे सदस्य, चेंबर ऑफ कॉमर्सचे पदाधिकारी, स्थानिक उद्योजकांतूनही नाराजी निर्माण होत आहे. ही विमानसेवा सुरू झाल्यानंतर शहरात विविध उद्योग वाढतील आणि शहरातील बेरोजगारीचेही निर्मुलन होईल. या विमानसेवेमुळे शहरातील उद्योजकांना मुंबईतील काम एका दिवसात करून परत त्याच दिवशी घराकडे येता येणार आहे. शहरातील महामार्ग, रेल्वे आणि आता विमानसेवा सुरू झाल्याने शहराची आता औद्योगिक क्रांतीही होईल.

● **हायटेक नेत्यांना पडला सोलापूरचा विसर :** मंत्रालयातील हायटेक नेते निवडणुकांत सोलापुरात आल्यावर नाना प्रकारची आश्वासने जनतेला देतात मात्र मतदान मिळून सत्ता स्थापनेनंतर त्यांना जनतेच्या आश्वासनांचा विसर पडत आहे. सोलापुरातील दोन उड्डाणपुले, विविध भागातील नवीन एमआयडीसी स्थापना, विमानसेवा, टेक्सटाईल पार्क, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, सुशिक्षित बेरोजगार प्रश्न, उजनी पर्यटन विकास, पंढरपूर-अक्कलकोट तीर्थक्षेत्र विकास यासह इतरही अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. या प्रश्नांवर प्रसारमाध्यमांद्वारे वारंवार आवाज उठविला जातो मात्र एकाही हायटेक नेत्यांना सोलापूरच्या विकासावर चर्चा करायला...ते मार्गी लावायला सवड मिळत नाही का? याबाबतही जाणकार सोलापूरकरांतून उलट-सुलट चर्चा सुरू झाली आहे.

● **आ. देवेंद्र कोठेंनी विमानसेवा चालू करण्याचा उचलला विडा :** शहरातील जुने आणि मातब्बर आमदार या विमानसेवेबाबत हवा तसा प्रयत्न करताना दिसून येत नाहीत. मात्र आता नव्याने निवडून आलेल्या आ. देवेंद्र कोठेंनी विमानसेवा सुरू करण्यासाठी प्रयत्न चालू केले आहेत. त्यांच्या प्रयत्नांना कितपत यश येईल, हे येणारा काळच सांगणार आहे. त्यांनी मुख्यमंत्र्यांशी याबाबत चर्चाही केल्याचे सांगितले. आता लवकरच ७२ आसनी विमासेवेसाठी डिजीसीएची परवानगी मिळेल आणि सोलापुरात लवकरच विमानसेवा सुरू होईल आणि नवनवे उद्योजक सोलापूरला येतील, असा आशावादही आ. कोठे यांनी एका कार्यक्रमात आज (दि. १४) व्यक्त केला.

### जेष्ठ निरूपणकार विवेक घळसासी यांचे
## विवाह संस्था: दशा आणि दिशा विषयावर उद्या प्रबोधन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ मार्च-**



गेल्या दोन दशकांपासून कै. हरिभाऊ नाशिककर यांनी कौस्तुभ ब्राम्हण वधु-वर सुचक केंद्र ही संस्था नावलौकिक रूपास आणत त्यांनी या माध्यमातून जवळपास पाचशे लग्न जुळविली. त्यांचाच वारसा पुढे चालवत सन २०२२ व २०२३ साली दोन विवाह पुस्तक प्रकाशित करत रविवार, दि. १६ मार्च २०२५ रोजी सकाळी १० वाजून १५ मिनिटांनी डॉ. किर्लोस्कर सभागृहात रविंद्र नाशिककरांचे तृतीय पुस्तक प्रकाशन ज्येष्ठ निरूपणकार विवेक घळसासी यांचे हस्ते करण्यात येणार आहेत.

दरम्यान, याच वेळी श्री घळसासी यांचे विवाह संस्था: दशा आणि दिशा या विषयावर प्रबोधन होणार आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी डॉ. श्रीकांत येळेगांवकर असून, यावेळी जनता बँकेचे चेअरमन सुनिल पेंडसे, उद्योजक दत्ताअण्णा सुरवसे, ज्येष्ठ साहित्यीक श्रुती वडकबाळकर, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यवाह संतोष कुलकर्णी, जिल्हा सरकारी वकिल ॲड. प्रदिप सिंग रजपूत, जेष्ठ पत्रकार अभय दिवाणजी, जुळे सोलापूरचे सामाजिक कार्यकर्ते सहयोग ब्राम्हण सेवा मंडळाचे अध्यक्ष श्रीकांत कुलकर्णी, जनता बँकेचे संचालक आनंदराव कुलकर्णी यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती राहणार आहे. या कार्यक्रमासाठी सहयोग ब्राम्हण सेवा मंडळाचे श्रीकांत कुलकर्णी, ब्रम्हगर्जना संस्थेचे विक्रम ढोनसळे व सर्व पदाधिकारी विशेष परिश्रम घेत आहेत. तरी ज्येष्ठ निरूपणकार विवेक घळसासी यांचे विवाह संस्था दशा आणि दिशा या विषयावरील विचार ऐकण्यासाठी सर्वांनी वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन क्रीडा संघटक रविन्द्र नाशिककर यांनी केले आहे.

## स्व. डॉ. स्वर्णलताताई भिशीकर यांची श्रध्दांजली सभा उद्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ मार्च-**



'ज्ञान प्रबोधिनी' हराळीच्या प्रमुख विश्वस्त, पुणे 'तरुण भारत'च्या माजी संपादक, ज्येष्ठ मार्गदर्शक डॉ. स्वर्णलताताई भिशीकर यांचे प्रदीर्घ आजाराने सोलापूर येथे सोमवार, दि. ३ मार्च रोजी रात्री निधन झाले. तर मंगळवार, ४ मार्च रोजी मोदी स्मशानभूमी येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. दरम्यान, सोलापूर येथील ज्ञान प्रबोधिनीमध्ये रविवार, दि. १६ मार्च रोजी सायंकाळी ५ ते ७ वाजेपर्यंत स्व. डॉ. स्वर्णलताताई भिसेकर यांच्या श्रध्दांजली सभेचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती ज्ञान प्रबोधिनीचे कार्याध्यक्ष गिरीश बापट, कार्यवाह सुवर्णा गोखले, सहकार्यवाह अमोल गांगजी यांनी दिली.

पुणे येथील प्रख्यात संपादक कै. चं.प. तथा बापूसाहेब भिशीकर यांच्या डॉ. लताताई या कन्या होत्या. सोलापूर येथील केळकर दांपत्याने बालविकास मंदिर शाळा, ज्ञान प्रबोधिनीकडे हस्तांतरित केल्यानंतर त्या सोलापूरला स्थायिक झाल्या. पुणे ज्ञान प्रबोधिनी संस्थापक कर्मयोगी अप्पासाहेब पेंडसे यांची जीवन मूल्ये त्यांनी तरुण वयात आत्मसात केली होती. सोलापूर आणि हराळी येथे भव्य वास्तूंची निर्मिती आणि उत्तम संस्कारसंपन्न तरुण पिढी घडविण्यात त्यांचे योगदान अतुलनीय राहिले आहे. सोलापूरला आल्यावर त्यांनी प्रबोधिनीत सत्संग केंद्राची स्थापना केली. ज्ञानेश्वरी, दासबोध, पतंजली योगसूत्रे याद्वारे त्या साधकांना नेमके मार्गदर्शन करीत असत. पुण्याचे डॉ. माधवराव नगरकर तथा स्वामी माधवानंद यांच्या प्रमुख उपस्थितीत सत्संग शिबिरे, गुरू पौर्णिमा उत्सव आयोजित करण्यात लताताईंचा सिंहाचा वाटा होता. त्यांच्या जाण्याने आध्यात्मिक क्षेत्राची मोठी हानी झाली आहे. 'राष्ट्राय स्वाहा' असं समर्पित जीवन जगणाऱ्या डॉ. स्वर्णलताताई चंद्रशेखर भिसेकर या अनंतात विलीन झाल्या आहेत. त्यांच्याविषयी आपल्या चित्तरूपी ओंजळीतील स्मृतीरूपी फुले श्रध्देने समर्पित करण्याची इच्छा सर्वांनाच आहे. यासाठी या श्रध्दांजली सभेचे आयोजन करण्यात आले आहे.



## गो उत्पादन निर्मितीसाठी सहकार्य करणार : आ. देशमुख
### वडकबाळ गोशाळेकडून आमदारांना शुभेच्छा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ मार्च,**

वडकबाळ येथील श्री कट्टेवादेवी गोशाळेच्या गोउत्पादन निर्मितीमध्ये व मार्केटिंग करण्यासाठी सर्वोतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन देऊन गोमय संस्कृती निर्माण व्हावे, अशी इच्छा आमदार सुभाष देशमुख यांनी व्यक्त केले.

सध्या धकाधकीच्या व धावपळीच्या युगात सर्वच रोगांवर गोमय उत्पादन रामबाण उपाय आहे. देशी गाईंच्या संवर्धन व संगोपनासाठी गोशाळा गरजेचे आहेत. त्यामुळे गोशाळेतील गाईंच्या संवर्धनासाठी गोमय उत्पादन काळाची गरज बनली आहे. श्री कट्टेव्वादेवी गोशाळा वडकबाळ यांच्या वतीने विविध गोउत्पादने व गोमयमाळ भेट देऊन आमदार देशमुख यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आले. यावेळी ते बोलत होते. यावेळी गोशाळेचे अध्यक्ष उमा बिराजदार, गोसेवक अश्विनी बिराजदार, गोप्रेमी श्रीदेवी रेवतगावकर, सपना लोभे आदी उपस्थित होते. गोशाळेच्या अध्यक्षा उमा बिराजदार म्हणाल्या, वडकबाळ येथील गोशाळेतून सर्वच रोगांवरील उपचारासाठी गोमय औषधे व उत्पादने निर्मिती सुरू आहे. सुदृढ शरीर व निरोगी मन ठेवण्यासाठी गोमय उत्पादने वापरल्यास देशी गाईंचे महत्व वाढून संवर्धन होण्यास मदत होणार असल्याचे सांगितल्या.

# शहारात इकोफ्रेंडली रंगांची वाढती क्रेझ
### रंगपंचमीनिमित्त बाजारपेठेत रंग दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ मार्च**

रंगांची उधळण करण्यासाठी सोलापूर शहरातील महत्वाच्या बाजारपेठेत रंगपंचमी निमित्त इको फ्रेंडली रंगांची क्रेझ वाढत चालली आहे. काचेरी रंगांना फाटा देत ग्राहकांनी इको फ्रेंडली रंग खरेदी करण्यास प्रारंभ केला आहे. त्यामुळे बाजारपेठेत इको फ्रेंडली रंगांची मागणी वाढलेली दिसत आहेत.

दरम्यान, सोलापूर शहर व जिल्ह्यातून याच इको फ्रेंडली रंगांना ग्राहकांमधून पसंती दिली जात आहे. रंगपंचमीचा उत्साह अधिक द्विगुणित करण्यासाठी इको फ्रेंडली रंग बाजारपेठेत उपलब्ध झाले आहेत. शहराच्या महत्त्वाच्या मधला मारुती या बाजारपेठेत स्टार्च व चिंचुका पावडर, फुलांचा सुगंध यांच्यापासून हे इको फ्रेंडली रंग तयार केले जातात. कोरोना काळात या रंगांची मागणी दुप्पटीने वाढली होती. यामध्ये आता आणखीन वाढ होत आहे. सध्या सोलापूर जिल्ह्यातून या रंगांना होलसेल आणि किरकोळ दुकानात मागणी मिळत आहे. शरीराला कोणताही आंपायकारक नसणारे हे रंग चिमुकल्या बाळगोळपांना फायदेशीर ठरत आहेत. काचेरी रंगांपासून मानवी शरीराला धोका निर्माण होतो. त्यामुळे या इको फ्रेंडली रंगांची उधळण करण्यासाठी बालगोपाळ सज्ज झाले आहेत.

बाजारपेठेत होलसेल आणि किरकोळ अशा दोन्ही दरामध्ये इको फ्रेंडली रंग उपलब्ध आहेत. दहा किलो ते १०० ग्रॅम पर्यंतचे रंगांची पाकिटे बनवण्यात आले आहेत. धुलीवंदन आणि रंगपंचमी निमित्त या रंगांना ग्राहकांमधून पसंती दर्शवली जात आहे.यापूर्वी केवळ काचेरी रंगांपासून रंगपंचमीचा सण साजरा केला जात असे, परंतु आता बदलत्या परिस्थितीत नागरिकांकडून इको फ्रेंडली रंगांना प्राधान्यक्रम देण्यात येत आहे.



### बाजारपेठेत सप्तरंगी रंग दाखल




रंगपंचमी सणाच्या पार्श्वभूमीवर इको फ्रेंडली रंगांना मागणी वाढत आहे. सप्तरंगी इको फ्रेंडली रंग बाजारात उपलब्ध झाले आहेत. यांना रंगांच्या दरामध्ये कोणतेही वाढ झालेली नाही. परंतु पिचकाऱ्यांच्या दरामध्ये वाढ झालेली आहे. प्लास्टिकचे भाव वाढल्याने पिचकारी महाग झालेली आहे.पिचकाऱ्यांच्या दरात सुमारे १० टक्के दरात वाढ झाल्याने पिचकारीचे दर ३०० रुपयांच्या घरात गेले आहेत.

**-गौरव सुगंधी, विक्रेते मधला मारुती बाजारपेठ**

### इकोफ्रेंडली रंग वापरणार

अंगावरून न जाणारा काचेरी रंगांना फाटा देत,नव्या इको फ्रेंडली रंगांनी सण साजरा करणार आहोत. सध्या बाजारपेठेत इको फ्रेंडली रंगांची ऑर्डर देण्यासाठी आलेलो आहोत. कोरोना काळापासून इको फ्रेंडली रंगांना प्राधान्यक्रम दिले जात आहे.

**- सुनील माने, ग्राहक**



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - १०५६

**त्याचा बहुरुपी नट ।**
**नव्हें वैष्णव तो चाट ।।**

वैष्णव म्हटले की आपणासमोर आदरातिथ्यास पात्र असणारे व्यक्तिमत्व उभे राहते. कारण मानवतेचा आधारस्तंभ होण्यासाठी जे गुण आवश्यक असतात ते वैष्णवात असतात, असा आपला विश्वास आहे. वैष्णवांबद्दलचा आपला विश्वास अगदी योग्य असला तरीही नेम का वैष्णव म्हणजे कोण ? याबद्दलची आपली कल्पना चुकीची असू शकते. कपाळाला गंध, गळ्यात माळ, मुखात नाम, अंगावर विशिष्ट प्रकारचा पेहराव आदि बाह्य बाबी ज्याच्याकडे आहेत त्याला आपण वैष्णव म्हणतो. आपली नेमकी चुक येथेच होते. कारण एखादया वैष्णवाच्या या वेशात चांडाळ, वाईट, चोर, लुटारू, व्यवहारी व्यक्तीही राहू शकतो. असा वेष धारण करून लोकांना लुबाडत असेल, व्यवहार करीत असेल, वादास कारणीभूत होत असेल तर त्याचा हा वेष बहुरुपीचा वेष समजावा. त्याला कोणत्याही परिस्थितीत वैष्णव म्हणू नये. या अनुषंगाने बोलतांना तुकाराम महाराज म्हणतात, त्याचा बहुरुपी नट। नव्हें वैष्णव तो चाट ।।


तुकाराम महाराज

आपण स्वत:चे अंतरंग जाणत नाही तर दुसऱ्यांचे काय जाणणार? आपण आपले स्थानही बऱ्याचवेळा आपल्या बाह्य सौंदर्यावरून निश्चित करीत असतो. त्यामुळे साहजिकच इतरांनाही आपण बाह्यदृष्टीने पाहतो. वैष्णवांचा वेश धारण केलेल्या लोकांच्या वर्तनाकडे आपण पाहत नाही. बाह्य पेहराव पाहताच आपण त्याचा आदर करतो. मुळात वैष्णव म्हणजे नेमके कोण? याचेच ज्ञान नसल्याने एखाद्या पेहरावधारी वैष्णवाला आपण टोकू शकत नाही. पण वैष्णव म्हणजे नेमका कोण? याचे ज्ञान झाले तर आपण खऱ्या वैष्णवाला ओळखू शकतो. आपले असे ओळखणे व्यावहारिक वैष्णवांना त्यांची जागा दाखवू शकते आणि खऱ्या वैष्णवांची महती वाढवू शकते. आपणाला वैष्णवाचे खरे ज्ञान नसेल तर व्यावहारिक वैष्णवांना आपल्याकडून पुष्टी मिळू शकते. वैष्णवांचा पेहराव असलेले काही स्वार्थी लोक सातत्याने आमच्या कार्यालयात येत असत. आम्ही वारीला चाललो आहोत, आम्हाला धन, धान्य, पैसा, जेवण आदि द्या, असे स्पष्टपणे हे लोक म्हणत. मी या प्रत्येकांना विचारत की भिक्षा मागा पण वारीला जा, असा संदेश देणारा ज्ञानोबा-तुकोबा माऊलींचा किंवा इतर संतांचा एखादा अभंग, ओवी, श्लोक आहे का? या प्रश्नाचे ते समाधानकारक उत्तर देऊ शकत नाहीत. याचाच अर्थ हे व्यावहारिक लोक आहेत. तसेच यांना ज्ञानोबा तुकोबां माऊलींही समजले नाहीत आणि वैष्णव म्हणजे नेमके कोण? याचे यांना ज्ञानही नाही. असे लोक जेव्हा देहू, आळंदीवरून पंढरपूरकडे निघणाऱ्या दिंडीत सामील होतील तेव्हा, यांना खरा वैष्णव, वारकरी काय असतो हे लक्षात येईल.

**जय जय राम कृष्ण हरी ।।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| **वार : शनिवार** | **दिनविशेष - चांगला दिवस,** |
| **दि. १५ मार्च २०२५** | **आम्रकुसुम प्राशन,** |
| **विक्रम संवत् २०८०-८१** | **वसंतोत्सवारंभ** |
| **शके - १९४६** | **....राहू काल....** |
| **संवत्सर - क्रोधी नाम** | **रविवार : दु.४.३० ते ६.००** |
| **मास - फाल्गुन** | **सोमवार : स. ७.३० ते ९.००** |
| **शु. चतुर्दशी (१०.३५)** | **मंगळवार : दु. ३.०० ते ४.३०** |
| **ऋतु - वसंत** | **बुधवार : दु. १२ ते १.३०** |
| **नक्षत्र - उ. फाल्गुनी (०८.५३)** | **गुरुवार : दु. १.३० ते ३.००** |
| **योग - गंड (१३.५९)** | **शुक्रवार : स.१०.३० ते १२** |
| **करण - तैतिल (२७.४३)** | **शनिवार : स. ९ ते १०.३०** |

### राशीभविष्य

**मेष :** व्यावहारीक समस्यांमुळे आपण त्रस्त व्हाल. धैर्याने आणि संयमाने कामे कराल. व्यापार, नौकरीमधील स्थिती मध्यम राहील. कौटुंबिक सहकार्य आज मिळणार नाही. शक्यतो प्रवास टाळा.

**वृषभ :** नवीन व्यवसायास सुरूवात करू शकता. नम्रता ठेवल्यामुळे व्यवहारात हमखास यश मिळेल. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा. दांम्पत्य जीवन सुखी राहील. व्यवहारात सावधानी बाळगा. वाचनाची गोडी वाढले.

**मिथुन :** जीवनात नवीन संधी निर्माण होईल. तणावमुक्त होऊन कार्य करा. व्यावसायिक स्पर्धेत यश मिळण्याचे योग आहेत. बेफीकीरीने कामे करून नका.

**कर्क :** आर्थिक बाबतीमधील प्रकरणे आज सुरळीत पार पडतील. विद्यार्थी वर्गासाठी आजचा दिवस शुभ आहे. काही घटनांमध्ये आपल्याला आज मन:स्ताप सहन करावा लागेल.

**सिंह :** संततीकडून चांगल्या बातम्या कळाल्यामुळे आनंदी रहाल. देण्या-घेण्याच्या व्यवहारात सावधानी बाळगा. वाचनाची गोडी वाढले. शक्यतो प्रवास टाळा.

**कन्या :** लोकांशी संप वाढल्यामुळे आपली कामे पार पडतील. व्यापार व्यवसायात विस्तार होईल. दुसऱ्यावर रोष करू नका. कौटुंबिक स्थितीत सुधारणा होईल.

**तुळ :** राजकारणात चांगली संधी मिळण्याची आवश्यकता आहे. परमेश्वरावरील विश्वास दृढ होईल. रागावर नियंत्रण ठेवा. व्यापार फायदेशीर राहणार आहे.

**वृश्चिक :** उपयोगी चर्चा घडून येईल. टाळत असलेले कामे पुर्ण होण्याचा योग आहे. व्यवस्यातील विस्ताराच्या दृष्टीने केलेल्या योजना यशस्वी होतील. मुलांची काळजी राहील.

**धनु :** प्रतिष्ठित व्यक्तींची भेट आपल्यासाठी फायदेशीर ठरणार आहे. मानसिक संतोष निर्माण होईल. व्यवसाय चांगला चालेल. विरोधकांपासून सावध रहा. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा. जीवन सुखी राहील.

**मकर :** व्यवसायात किंवा रोजगारात मोठे परिवर्तन घडून येण्याची शक्यता आहे. लोकप्रियता वाढणार आहे. शासनाकडून पैसा किंवा सन्मान मिळेल. जीवनसाथी बरोबर वाद विवाद होण्याची शक्यता आहे.

**कुंभ :** सामजिक कामात वेळ जाईल. अचानक लाभ होण्याचा योग आहे. नौकरीमध्ये असणाऱ्यांची बदली किंवा पदोन्नती मिळण्याचा योग आहे. निष्कारण चिंता निर्माण होईल.

**मीन :** कामकाजामध्ये व व्यापारात विचारपूर्वक निर्णय घ्या. कौटुंबिक सहकाय कमी प्रमाणात मिळेल. आर्थिक बाबतीत समाधानी रहाल. मानसिक संतोष निर्माण होईल.

# दुचाकी चोरणाऱ्या टोळीचा पर्दाफाश; तिघांना अटक, एकजण फरार

## १० दुचाकी हस्तगत; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १४ मार्च -**

सोलापूर ग्रामीण पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी दुचाकी चोरणाऱ्या टोळीचा पर्दाफाश करून टोळीतील तिघांना अटक केली तर एक जण अद्याप फरार आहे. या टोळीकडून पोलिसांनी चोरीच्या १० दुचाकी हस्तगत केल्या आहेत. या टोळीकडून सोलापूर शहर, सोलापूर ग्रामीण, पुणे शहर, पुणे ग्रामीण, सांगली, कर्नाटकातील हुमनाबाद येथील गुन्हे उघडकीस आले आहेत.

जिंदावली झापर आतार (वय ३०, रा. जेऊर, ता. अक्कलकोट), भुताळे उर्फ पिंटू हनुमंत चेंडके (वय २८, रा. दोड्याळ, ता. अक्कलकोट) आणि बाबुशा सुनिल मस्के (वय २५, रा. दोड्याळ, ता. अक्कलकोट) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. तर त्यांचा एक साथीदार गणेश नडगम हा फरारा आहे. दुचाकी चोरीच्या गुन्ह्यांचा तपास करताना स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांना मिळालेल्या माहितीवरून पोलिसांनी जिंदावली आतार, भुताळे चेंडके, बाबुशा मस्के या तिघांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडे चौकशी केली. त्यावेळी त्यांनी त्यांच्या आणखी एका साथीदाराच्या मदतीने विविध ठिकाणाहून दुचाकी चोरल्याचे सांगितले. पोलिसांनी या तिघांकडून चोरीच्या १० दुचाकी जप्त केल्या आहेत. दुचाकी चोरणाऱ्या या टोळीकडून सोलापूर ग्रामीण जिल्ह्यातील अक्कलकोट दक्षिण, मोहोळ, पंढरपूर शहर, सांगली जिल्ह्यातील कवठेमहांकाळ, सोलापूर शहरातील जोडभावी पेठ, पुणे शहरातील चंदननगर, पुणे ग्रामीणमधील इंदापूर पोलिस ठाण्यातील दुचाकी चोरीचे गुन्हे उघडकीस आणले. या तिघांना अक्कलकोट दक्षिण पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे. ही कामगिरी पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलिस अधिक्षक प्रितम यावलकर, पोलिस निरीक्षक सुरेश निंबाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक विजय शिंदे, पोलिस उपनिरीक्षक श्रीकांत गायकवाड, हवालदार रवि माने, पोलिस नाईक धनराज गायकवाड, सुरज रामगुडे, विनायक घोरपडे, मनोज राठोड, सलीम बागवान, सतीश बुरकुल यांनी केली.



# प्रा.ज्ञानेश्वर जाधव यांना राज्यस्तरीय इनोव्हेटिव्ह टीपीओ पुरस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ मार्च -**

विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी उद्योगजगताशी समन्वय साधून उल्लेखनीय कार्य करणारे एसपीएम पॉलिटेक्निक, कुमठे येथील प्रशिक्षण व स्थानिक अधिकारी प्रा. ज्ञानेश्वर जाधव यांना महाराष्ट्र असोसिएशन ऑफ ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर्स तर्फे राज्यस्तरीय इनोव्हेटिव्ह टीपीओ पुरस्कार-२०२५ प्रदान करण्यात आला.

हा पुरस्कार ७ व ८ मार्च २०२५ रोजी लोणावळा, पुणे येथे असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विशेष समारंभात प्रदान करण्यात आला.याप्रसंगी पिंपरी-चिंचवडचे आ. अमित गोरखे, लोणावळा शहराच्या नगराध्यक्ष सुरेखा जाधव आणि प्रसिद्ध मराठी सिने-अभिनेत्री रूपाली भोसले यांच्या हस्ते प्रा. ज्ञानेश्वर जाधव यांना हा सन्मान देण्यात आला. याप्रसंगी असोसिएशन अध्यक्ष डॉ. शितलकुमार रवंदले, डॉ. संजय जाधव आदींची प्रमुख उपस्थिती होती. संस्थेच्या वतीने मुख्य विश्वस्त जयकुमार माने, विश्वस्त स्वाती माने, प्रा.रोहिणी चव्हाण आदींनी जाधव यांचे अभिनंदन केले.



# सोलापुरात लाडक्या बहिणींचा संताप

**शिवसेना उबाठाच्या उपनेत्या अस्मिता गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली निवेदन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ मार्च-**

राज्यातील मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेचे थकीत अनुदान त्वरीत मिळावे तसेच महायुतीने निवडणुकीच्या जाहीरनाम्यात नमूद केल्याप्रमाणे दरमहा २१०० रूपयाचे अनुदान लाडक्या बहिणींना तातडीने लागू करावे या मागणीसाठी शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उपनेत्या अस्मिता गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले.

यावेळी शशिकला चिवडशेट्टी, शहर संघटक प्रिती नायर, स्वाती रूपनर, उपजिल्हा संघटक ज्योती माळवदकर, गीता मदन, श्रीदेवी बगले, मीनाक्षी गवळी, मिना सुरवसे, जोहरा रंगरेज, सुनिता लोंढे, सुनंदा शिरूर, नागमणी भंडारी, दिपाली पवार, आशा कदम, शहनाज गायकवाड उपस्थित होते.

# सोनी महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय परिषद




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ मार्च -**

देशभक्त हरिनारायण बंकटलाल सोनी महाविद्यालय, सोलापूर येथे पॅराडाइम शिफ्ट इन टेक्नॉलॉजी द एआय रिव्होल्युशन या विषयावरील व्दितीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले.

या आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष अतुल लाहोटी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संगणक तज्ञ, लेखक व व्याख्याते अच्युत गोडबोले, अभिजीत काबरा, गोविंद झंवर, डॉ. विठ्ठल कृष्णा, पूजा खराडे न्युयॉर्क युएसए यांनी या परिसंवादात ऑनलाईन सहभाग नोंदविला. प्रास्ताविक डॉ. वासंती अय्यर यांनी केली. तसेच दुस-या दिवशी प्रा. गोपालकृष्ण जोशी, बेंगलोर येथील माधव केशवन, पुणे येथील रवींद्र बगले, डॉ. दर्शन रुईकर, डॉ. ऋषिकेश हरकुट उपस्थित होते. दिल्ली येथील चित्रा छाबरा, कॅलिफोर्निया युएसए येथील सुचेता अय्यर यांनी या परिसंवादात ऑनलाईन सहभाग नोंदविला. या परिषदेसाठी डॉ. रश्मी दिक्षीत व डॉ. मनिषा निरगुडे हे रिसर्च पेपर सादरीकरण सत्रासाठी तज्ञ म्हणून उपस्थित होते. या परिषदेत निनाद भागवत, सुचेता अय्यर, वंदना मठपती यांनी रिसर्च पेपर सादर केले.

या परिषदेसाठी ५३ जणांनी रिसर्च पेपर सादर केले. या आंतरराष्ट्रीय परिषदेतील रिसर्च पेपर महाविद्यालयाच्या आयएसएसएन या रिसर्च पुस्तकेत प्रकाशित करण्यात आले. या आंतरराष्ट्रीय परिषदेच्या संयोजिका डॉ. वासंती अय्यर डायरेक्टर व प्रा. डॉ. आशा रोकडे प्राचार्या देशभक्त हरिनारायण बंकटलाल सोनी महाविद्यालय या होत्या.

आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी महाविद्यालयाचे अध्यक्ष लक्ष्मीकांत सोमाणी, सचिव मधुसुदन करवा, सहसचिव डॉ. गिरीष हरकुट उपस्थित होते. तसेच संचालिका डॉ. वासंती अय्यर व प्रा. डॉ. आशा रोकडे प्राचार्या यांचे मार्गदर्शन लाभले. मसूत्रसंचालन प्रा. प्रिती कुलकणी व आभार प्रदर्शन प्रा.अरविंद बगले, प्रा. हरदिपकौर बोमरा, प्रा.नवनाथ भंडारे यांनी केले.




# प्रु गिफ्ट सिलेक्ट बचत प्लॅन सादर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ मार्च-**

आयसीआयसी आय प्रुडेंशियल लाइफ इन्शुरन्सने आयसीआयसीआय प्रु गिफ्ट सिलेक्ट हा नवा दीर्घकालीन बचत प्लॅन सादर केला आहे,जो ग्राहकांना निश्चित उत्पन्नाची खात्री देतो आणि त्यांना गरजेच्या वेळी पैसे काढण्याची सुविधा देतो.या प्लॅनमध्ये ग्राहकांना अनेक लवचिक पर्याय उपलब्ध आहेत.

याशिवाय, यामध्ये जीवन विमा देखील आहे,जो कुटुंबासाठी आर्थिक सुरक्षा प्रदान करतो.या प्लॅनची खासियत म्हणजे वाढत्या उत्पन्नाचा पर्याय,ज्यात उत्पन्न दरवर्षी ५% चक्रवाढ दराने वाढते.अमित पालटा म्हणाले,आयसीआयसीआय प्रु गिफ्ट सिलेक्ट हा असाच एक प्लॅन आहे,जो ग्राहकांना त्यांच्या आर्थिक उद्दिष्टांनुसार आणि रोख प्रवाहाच्या गरजांनुसार निश्चित उत्पन्नाची हमी देतो.

# ग्रामसंघाच्या उपजिविकेसाठी ड्रोनदीदी उपक्रम : सीईओ

**उमेदअंतर्गत महिलांना ड्रोन वाटप**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ मार्च-**

महाराष्ट्र राज्यात प्रथमच सोलापूर जिल्ह्यात हा प्रकल्प राबविण्यात येत असून यासाठी 'ड्रोन दीदी' व ड्रोन सहाय्यक यांनी प्रशिक्षण घेऊन त्याचा वापर ग्राम संघाच्या उपजिविकेसाठी करून राज्यात सोलापूर जिल्ह्याचा लौकिक वाढवावे, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी केले.



महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवन्नती अभियानअंतर्गत मंगळवारी सोलापूर जिल्ह्यातील सात तालुक्यांसाठी फवारणीसाठी ड्रोनचे वाटप जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्याहस्ते करण्यात आले. यावेळी प्रकल्प संचालक सुधीर ठोंबरे, उमेदचे जिल्हा अभियान व्यवस्थापक सचिन चवरे उपस्थित होते. यावेळी बोलताना मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम म्हणाले की, उमेदच्यावतीने प्रत्येक वर्षी औजार बँकेतून शेतीसाठी वेगवेगळया प्रकरची औजारे वाटप करून शेतीच्या माध्यमातुन महिलांची उपजीविकासाठी प्रयत्न केले जातात.

यावेळी जिल्हा व्यवस्थापक संतोष डोंबे, दयानंद सरवळे, राहुल जाधव,मीनाक्षी मडिवली, अनिता माने, शितल म्हांता,तालुका अभियान व्यवस्थापक अवधूत देशमुख, योगेश जगताप, कृनाल पाटील, आण्णा आवताडे, योगेश बोडके उपस्थित होते. सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ,माढा, सांगोला, अक्कलकोट, करमाळा, उत्तर सोलापूर, सांगोला या तालुक्यातील ग्रामसंघांना ड्रोन वाटप करण्यात आले. ७० लाखांचे कर्ज काढून या सात ड्रोनची खरेदी करण्यात आली आहे.



# ए. जी. पाटील पॉलिटेक्निकच्या ३९ विद्यार्थ्यांची नामांकित कंपनीमध्ये निवड

**विद्यार्थ्यांचे सर्व स्तरातून होत आहे कौतुक**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ मार्च-**

नॅशनल बोर्ड ऑफ ऍक्रेडिएशन, नवी दिल्ली कडून पुनर्मानांकन प्राप्त झालेल्या विजापूर रोड वरील ए. जी. पाटील पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांची कमिन्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेडे, पुणे या नामांकित कंपनीमध्ये निवड झाली.

या अधिकाऱ्यांनी ए.जी. पाटील पॉलिटेक्निकच्या तृतीय वर्ष मेकॅनिकल इंजिनिअरिंग, इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग व इलेक्ट्रॉनिक्स अँड टेली कम्युनिकेशन इंजिनिअरिंग या विभागातील ३९ विद्यार्थ्यांची निवड केली. सर्व विद्यार्थ्यांचे शांती एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष एस. ए. पाटील, संस्थेचे उपाध्यक्ष एस. एस. पाटील, प्राचार्य डॉ. एम. ए. चौगुले व महाविद्यालयाचे उपप्राचार्य श्री. एस. के. मोहिते यांनी अभिनंदन केले.

महाविद्यालयाचे ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर प्रा. एम. एम. कुलकर्णी व शैक्षणिक समन्वयक एस. एन. गवंडी आणि मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभाग प्रमुख आर. एस. मोटगी व विभागीय प्लेसमेंट समन्वयक प्रा. ए. आर. मळेकर, प्रा. पी. एस. दारा (सिव्हिल), प्रा. जै. सी. सचदेव (कॉम्प्युटर) प्रा. एल. एस. केंदुले (इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग) प्रा. के. डी. साळुंखे (इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग) यांनी हे प्लेसमेंट ड्राईव्ह यशस्वी होण्यासाठी प्रयत्न केले.

# भवानी पेठ मड्डी वस्ती येथे तरुणाचा खून

**पत्नीला बाईचे लफडे सांगितल्याच्या कारणावरुन खून**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १४ मार्च -**

दारू पित असल्याचे तसेच जुगार मटका खेळण्याबरोबरच बाईचे लफडे पत्नीला सांगितल्याच्या करणावरून शहरातील मड्डी वस्ती परिसर येथे तरूणाचा खून करण्यात आला असून याप्रकरणी जोडभावी पेठ पोलिसांनी दोघांना अटक केली आहे.

नागेश संतोष विटकर (वय २०, रा. महालक्ष्मी झोपडपट्अी, वीरतपस्वी शाळेसमोर, भवानी पेठ, सोलापूर) असे खून झालेल्या तरूणाचे नाव आहे. याबाबत लिंबुबाई संतोष विटकर (वय ३५) यांच्या फिर्यादीवरुन अभिषेक अंबादास बंदपट्टे (रा. जुना घरकुल, सोलापूर), अविनाश अंबादास बंदपट्टे (रा. महालक्ष्मी झोपडपट्टी, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



अभिषेक बंदपट्टे यांची पत्नी लक्ष्मी हिस नागेश विटकर याने अभिषेक याला दारूचे व्यसन आहे, तो जुगार मटका खेळतो, बाईचे लफडे करतो असे सांगितले होते. त्याचा राग मनात धरून १२ मार्च रोजी रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास महालक्ष्मी झोपडपट्टी येथे अभिषेक बंदपट्टे याने मयत नागेश याला हातोडीच्या व लाकडी दांडक्याने तोंडावर जबर मारहाण करून जखमी केले'' तसेच उजव्या पायावर छातीवर पाठीवर मारहाण केले. तसेच अविनाश बंदपट्टे यांनी देखील हाताने लाथाबुक्याने मारहाण करून गंभीर जखमी करून नागेश यास जीवे ठार मारले आहे म्हणून जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास जोडभाई पेट पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक चव्हाण हे करत आहेत.

## संघ हीच जीवनगाथा

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार (जन्म १ एप्रिल १८८९, मृत्यू २१ जून १९४०). आपल्यासमोर संघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अलक. म्हणजे अति लघु कथा. ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; समजायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्वे प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण, या अर्थाने मी अलक लिहिले आहे.



**- सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती, मो. ९९६००५३५२१

### अलक:- (७८) सृजनात्मक

गुरुजी म्हणतात झाडावरचे फळ तोडल्याने झाडाला हानी होत नाही; तर झाडाला लाभ होतो. परंतु या भूमीतून अधिक फसल निर्माण करण्याच्या लोभाने, आम्ही भिन्न रासायनिक खतांचा वापर केला, तर कदाचित काही दिवस- काही वेळा खूप पीक मिळेलही. पण कालांतराने जमिनीची उत्पादन क्षमताच कमी होईल. आज अमेरिकेत किंवा विदेशात लाखो एकर भूमी या अशा प्रयोगामुळे उजाड /बंजर होऊ घातली आहे. ही विनाश लीला समजून घ्या. कारखान्यात मशीनच्या क्षयनिधीची व्यवस्था करणे गरजेचे असते. परंतु प्रकृतीच्या या कारखान्यात स्वतः भगवंतांनी अक्षय विकासाची व्यवस्था केली आहे. परंतु आम्ही प्रकृतीच्या अंधाधुंद उपयोगासाठी आपली शक्ती खर्च करणे बरोबर नाही. भगवंतांनी मनुष्याला केवळ उपभोग- प्रवण प्राणी म्हणून जन्माला घातले नाही. जसे इंजिनाला चालवायला कोळसा हवा, परंतु कोळसा खाण्यासाठी इंजिन बनवले नाही. उलट कमीत कमी इंधनातून अधिकात अधिक शक्ती कशी मिळेल, हा बचत दृष्टिकोन हवा. अशी अर्थव्यवस्था मानवी असेल. ती संहारात्मक न होता सृजनात्मक हवी. सुधारणेमुळे प्रकृतीचे शोषण न होता पोषण झाले पाहिजे. प्रकृतीचे दोहन करणे, तिचे स्तन्य जीवनदायी करणे अशी व्यवस्था हवी.

**- क्रमशः**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# दक्षिण सोलापूर पंचायत समितीकडून मनरेगाची ११८० कामे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ मार्च,**


ग्रामीण भागातील मजूरांना रोजगाराची हमी देण्यासाठी केंद्र व राज्य सरकारकडून राबविण्यात येत असलेल्या मनरेगा अंतर्गत दक्षिण सोलापूर पंचायत समिती कार्यक्षेत्रात ११८० कामे सुरू आहेत.

यामध्ये २०२४ -२५ मध्ये फळबाग लागवड ४७, घरकुल ५७, शोषखड्डे ८, बांधावरील वृक्षलागवड २६ तर विहीर २६ असे मनरेगाची एकूण १६५ कामे सुरू असून सन २०१६ ते २०२४ पर्यंत मनरेगाची १०१५ कामे करण्यात आली आहेत. दक्षिण पंचायत समितीकडून मनरेगाची ११८० कामे प्रगतीपथावर आहेत. २५ लाख रूपयापर्यंतची कामे पंचायत समितीकडून करण्यात येते.

ग्रामीण भागातील रोजगारांना विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी सरकारकडून महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना सुरू



करण्यात आली. यामध्ये रोजगारांना केंद्र सरकारकडून १०० दिवस तर राज्य सरकारकडून २६५ दिवस कामाची हमी देण्यात येते. मागेल त्याला काम याअंतर्गत सरकार कडून रोजगार हमी योजनेची कामे सुरू करते. या योजनेमुळे रोजगारासाठी स्थलांतर होण्याचे प्रमाण कमी करणे हा सरकारचा उद्देश्य आहे. त्यामुळे स्त्री अथवा पुरूष असा भेदभाव न करता एका मजुराला एका दिवसासाठी २९७



रूपये पगार देण्यात येते. या योजनेतून वैयक्तीक व सार्वजनिक असे दोन प्रकारे कामे करण्यात येतात. यामध्ये नवीन विहिरीसाठी ५ लाख, घरकुलसाठी २६ हजार, शोषखड्यासाठी ५ हजार असे देण्यात येते. शिवाय रस्त्यासाठी ५ ते १० लाख तर बांबु लागवडीसाठी ७ लाख अनुदान देण्यात येते. यामध्ये विहीरीसाठी ९०० दिवस तर घरकुल व शोषखड्यासाठी ९० दिवस रोजगार उपलब्ध होते.

### मोफत योजनांमुळे अल्प प्रतिसाद

सरकारकडून मोफत धान्य, लाडकी बहीण , निराधार योजना व कामगार कल्याण योजना व इतर अनेक मोफत योजना सुरू करणायात आल्याने ग्रामीण भागातील मजूरांची संख्या घटली आहे. त्यामुळे मनरेगाच्या कामांना अल्प प्रतिसाद मिळत आहे.

### मजूरांना रोजगाराजी हमी

गरीब मजूरांना पाच किलोमीटर अंतर परीसरात मागेल त्याला काम या माध्यमातूम मनरेगातून कामे उपलब्ध करून दिली जातात. मजूरांनी ग्रामपंचायतीकडे रोजगाराची मागणी केल्यास शासनाच्या नियमांसह सर्व सोईसुविधा उपलब्ध करून १०० दिवसांचे रोजगार दिली जाते.

**- शंकर कवितके, गटविकास अधिकारी, पंचायत समिती**

### यंत्रसामुग्री वापरास बंदी

मनरेगा अंतर्गत कामे करीत असताना अंगमेहनतीप्रमाणे रोजगार मागणी केलेल्या मजूरांना रोजगाराची हमी देण्यात आली आहे. यामध्ये मनुष्य बळ अथवा मानवी कष्ट बंधनकारक असून यंत्रसामुग्री वापरास बंदी आहे.

## संक्षिप्त वृत्त



### मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियानामध्ये शारदेय गुरुकुल स्कूल प्रथम

**टेंभूर्णी, दि. १४ मार्च-**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेअंतर्गत राज्य शासनाने राबवलेल्या 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' (टप्पा क्रमांक - २) या अभियानामध्ये श्री. शारदेय गुरुकुल पब्लिक स्कूल, टेंभूर्णी शाळेने खासगी शाळा गटात माढा तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावून तीन लाखांचे पारितोषिक, प्रमाणपत्र व सन्मान चिन्ह मिळाले आहे. शाळेचे प्रा. एस. व्ही. इंगोले, यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व विद्यार्थ्यांनी आणि शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी एकत्र येऊन या स्पर्धेसाठी प्रयत्न केले. माढा येथे जिल्हा परिषद सोलापूर व पंचायत समिती शिक्षण विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तालुकास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार व तालुकास्तरीय मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या पुरस्काराच्या वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. हा पुरस्कार माढा तालुक्याचे विद्यमान आमदार अभिजीत आबा पाटील यांच्या हस्ते देण्यात आला. यावेळी गटशिक्षणाधिकारी विकास यादव, विस्तार अधिकारी दिगंबर काळे, केंद्रप्रमुख संतोष वरकुटे उपस्थित होते. या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन बाळासाहेब देशमुख, सचिव.हर्षवर्धन देशमुख, संचालक सुरज देशमुख, संस्थेच्या कार्यकारी संचालिका प्रियंका देशमुख, रावसाहेब देशमुख यांनी अभिनंदन केले.



### सहकार महर्षी महाविद्यालयातील संगणक विभागाची वॉलस्टार कंपनीस भेट

**अकलूज, दि. १४ मार्च-**

येथील सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्च, शंकरनगर-अकलूज या अभियांत्रिकी महाविद्यालयामधील पदविका तृतीय वर्ष संगणक अभियांत्रिकी इंजिनीरिंग विभागामधील विद्यार्थ्यांची विकास समिती अध्यक्षा स्वरूपाराणी जयसिंह मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कोल्हापूरमधील वॉलस्टार टेक्नॉलॉजी प्रायव्हेट लिमिटेड विभागास भेट देण्यात आल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रवीण ढवळे यांनी दिली. विद्यार्थ्यांना उद्योग कामकाजाची ओळख करून देण्यासाठी आणि शैक्षणिक शिक्षण आणि वास्तविक जगाचे अंतर कमी करण्यासाठी ही भेट आयोजित करण्यात आली होती. विद्यार्थ्यांना कंपनीचे ध्येय, दृष्टी आणि त्यांनी दिलेल्या सेवांच्या श्रेणीची ओळख करून देण्यात आली. विद्यार्थ्यांनी वेब डेव्हलपमेंट, मोबाइल ॲप डेव्हलपमेंट आणि डिजिटल मार्केटिंगसह विविध विभागांना भेट दिली. या इंडस्ट्रियल व्हिजिटचे नियोजन प्रा. जी. एम.फडे, समन्वयक प्रा. व्ही.एम. शेख, प्रा.आर.सी. गोडसे, प्रा. एस. आर. देशमुख, प्रा. एम.एम.ननवरे यांनी काम पाहिले.



### कल्याणशेट्टी महाविद्यालयात सावित्रीबाई फुले यांना अभिवादन

**अक्कलकोट, दि. १४ मार्च-**

मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयात सावित्रीबाई फुले पुण्यतिथी निमित्त अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी संस्थेचे जेष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, अक्कलकोटचे तहसीलदार विनायक मगर यांची प्रमुच उपस्थिती होती. सावित्रीबाई फुले यांच्या विचारानुसार महिलांनी परिवर्तन शील विचार स्वीकारले आहे. समाजात कृतिशील बदलाचे वारे वाहत आहे. त्यामुळे स्त्री-पुरुष समानता आली आहे, असे तहसीलदार विनायक मगर यांनी यावेळी सांगितले. प्रारंभी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. स्वागत मलकप्पा भरमशेट्टी यांनी केले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. एस.आर. लोखंडे यांनी केले सूत्रसंचलन प्राध्यापिका हर्षदा गायकवाड यांनी केले तर आभार प्रा. राजशेखर पवार यांनी मानले.



### अभिजीत जाधव यांना आदर्श शिक्षक पुरस्कार

**नातेपुते, दि. १४ मार्च-**

सोलापूर जिल्हा माध्यमिक शिक्षक सेवक सहकारी संस्था मर्यादित बाळे, सोलापूर यांच्यावतीने दिला जाणारा जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार जनता विद्यालय व ज्युनिअर कॉलेज मळोली (ता माळशिरस) येथील सहशिक्षक अभिजीत श्रीमंत जाधव यांना प्रदान करण्यात आला. हुतात्मा स्मृती मंदिर सोलापूर येथे पुरस्कार वितरण सोहळा माजी शिक्षक आ. दत्तात्रय सावंत यांच्या हस्ते संपन्न झाला तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी चेअरमन राजेंद्र माळी होते. यावेळी व्हा.चेअरमन विद्या पाटील, संचालक तात्यासाहेब काटकर, सचिव चंद्रकांत भोसले उपस्थित होते. प्रगत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष व पंचायत समिती सदस्य रणजितसिंह जाधव, सरपंच अर्चना जाधव, चेअरमन सत्यजित जाधव, मुख्याध्यापक टी. आर. लवटे, पर्यवेक्षक ए.एस. पानसरे, शिक्षक व ग्रामस्थांनी त्यांचे निवडीबद्दल अभिनंदन केले.

## 'डेव्हलपलिंग कम्युनिकेशन स्कील्स' विषयावर घेण्यात आली कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १४ मार्च-**

येथील श्री शिवाजी महाविद्यालयात कर्मवीर स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, गणित विभाग व संख्याशास्त्र विभाग यांच्यावतीने चार दिवशीय 'डेव्हलपलिंग कम्युनिकेशन स्कील्स या विषयावर कार्यशाळा संपन्न होत आहे. दि.१३ ते १६ मार्च दरम्यान होणाऱ्या या कार्यशाळेतून विद्यार्थ्यांना मूलभूत इंग्रजी संप्रेषण कौशल्ये कशी वृद्धिंगत करता येतील यावर भर देण्यात येणार आहे.

तसेच करिअर व दैनंदिन व्यवहारात इंग्रजी भाषेचे महत्त्व व उपयुक्तता सांगण्यात येणार आहे. या कार्यशाळेचा उद्देश विद्यार्थ्यांच्या मनातील इंग्रजी विषयाची भीती दूर सारुन त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करणे हा आहे. यासाठी संप्रेषणातील विविध घटकांचा समावेश करण्यात आला आहे. बँक, शाळा, महाविद्यालय, कार्यालय आदी ठिकाणी इंग्रजीचा होणारा उपयोग यावर भर देण्यात येणार आहे. तसेच स्पर्धा परीक्षाभिमुख इंग्रजीचा ऊहापोह करण्यात येणार आहे. वंडर गर्ल जान्हवी पवार यांचे व्हिडिओज दाखविण्यात येणार आहेत. व्हिडिओ सादरीकरण, भाषण, गटचर्चा, वादविवाद, व्यक्ती वर्णन, कथन, मुलाखत, सारांश लेखन, निबंध लेखन, भूमिका पालन आदी घटकांद्वारे श्रवण, संवाद, वाचन, लेखन कौशल्ये



वृद्धिंगत करण्यावर भर असणार आहे. टेन्स हा घटक आकृत्यांच्या साह्याने स्पष्ट करण्यात येणार आहे. वर्तमानपत्रे व मासिकांचे वाचन करताना शब्दसंपत्ती कशी वाढविता येईल याच्या ट्रिक्स सांगितल्या जाणार आहेत. डॉ. राहुल पालके यांच्या मार्गदर्शनखाली हे उपक्रम राबविण्यात येणार आहेत. यावेळी प्रा. डॉ. ए. बी. शेख यांनी मनोगत व्यक्त केले. प्रा. एम. वाय. शिंदे, प्रा.एम. आर. मस्के, प्रा.ए. ए. मोटकुळे, डॉ. ए.एम. गायकवाड उपस्थित होते.

### आर्या कॉलेजची आयुर्वेदिक कंपनीला भेट

**टेंभूर्णी, दि. १४ मार्च-**

श्री विठ्ठल शिक्षण प्रसारक मंडळ टेंभूर्णी संचालित आर्या कॉलेज ऑफ फार्मसी टेंभूर्णी येथील औषधनिर्माण शास्त्र पदविका प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांनी औद्योगिक क्षेत्रभेट दिली. बारामती येथील विश्वचैतन्य आयुर्वेदिक रसशाला येथे भेट देऊन विद्यार्थ्यांना औषध निर्माण कंपनीतील सर्व विभागाची माहिती देण्यात आली जसे की प्रोडक्शन, कॉलिटी कंट्रोल, पॅकेजिंग आदी बाबींची माहिती देण्यात आली. भेटीदरम्यान औद्योगिक कंपनीमधील वेगवेगळ्या उत्पादनासाठी चालणाऱ्या कार्यप्रणाली अगदी जवळून निरीक्षण केल्याने विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या उपकरणाची माहिती घेता आली. यावेळी प्राचार्य धनंजय चव्हाण यांनी कंपनीची माहिती दिल्याबद्दल व्यवस्थापकांचे आभार मानले. प्रा. हर्षवर्धन वाघमारे, विजय शिंदे, प्रा. संजीवनी कुटे आणि अमृता कसबे यांनी परिश्रम घेतले.

## महिलांनी मन आणि मनगट मजबूत ठेवावे : वैशाली गुंड

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १४ मार्च-**

जीवनाचा प्रवास खूप खडतर असतो महिलांनी भावनांवर ताबा ठेऊन संघर्ष करत असताना कोणत्याही परिस्थिला सामोरे जाण्यासाठी मन आणि मनगट मजबूत ठेवावे, असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्त्या वैशाली गुंड यांनी केला.

आलेगाव (ता. द. सोलापूर) येथील जि.प.शाळेच्या प्रांगणात ग्रामपंचायत आलेगाव, श्री स्वामी विवेकानंद पतसंस्था आचेगाव, नियोजन समिती आलेगाव, जि. प. शाळा आलेगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आंतर राष्ट्रीय महिला दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पुष्पा पाटील या होत्या. व्यासपीठावर अंबिका पाटील, मीनाक्षी परमशेट्टी, डॉ. सरोज पाटील, ग्रामसंघांचे अध्यक्ष उमदेवी पाटील गटप्रवर्तक प्रियंका पुल्लूर, वनिता माळी उपस्थित होते. महिला दिनानिमित्त विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरवात क्रांतिज्योती सावित्री बाई फुले यांच्या प्रतिमा पूजनानी करण्यात आले. या नंतर मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. गावातील सरकारी व निमसरकारी संस्था मध्ये काम करणाऱ्या महिलांचा तसेच अंध व अपंग विधवा, महिला उद्योजका,एकल माता आदींचा सत्कार करण्यात आला. विविध स्पर्धातील विजेत्यांना बक्षीस प्रदान करण्यात आले. कार्यक्रमाचे नियोजन राजकुमार बाईटपल्ली, शिवानंद पाटील, शशिकंत चोरमरे, जोतिराम माळी, विजयकुमार चिंचोळ, सतीश कदम, बबन खांडेकर यांनी केले. सूत्रसंचालन विद्या माळी यांनी तर आभार विजया माळी यांनी मानले.

## उद्योगपती अंकुश काकडे यांचा अन्नछत्रमध्ये सत्कार



**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १४ मार्च-**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मजय विजयसिंह भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जन्मेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली अन्नछत्र मंडळाने धर्माची परंपरा जोपासली असल्याचे मनोगत पुणे येथील उद्योगपती अंकुशराव काकडे यांनी व्यक्त केले.

पुणे येथे मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजय भोसले यांनी अंकुशराव काकडे यांच्या निवासस्थानी भेट दिली असता श्री व सौ काकडे यांचा सत्कार न्यासाच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी मयुर काकडे व कर्नल श्री व सौ शिंदे यांचा देखील सत्कार करण्यात आला. यावेळी शिरीष मावळे, बाळासाहेब देसाई-कुलकर्णी, संतोष भोसले, शिवराज स्वामी, स्वामीनाथ गुरव, मैनोद्दीन कोरबू, अश्पाक काझी, सरफराज शेख, गणेश भोसले, महांतेश स्वामी, प्रशांत शिंदे, संतोष माने उपस्थित होते.



## सह्याद्रीमध्ये चंद्रिकाताई चौहान यांचे व्याख्यानाने महिलादिन उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.११ मार्च-**

सह्याद्री कॉलेज ऑफ फार्मसी, मेथवडे, (ता.सांगोला) येथे आंतर राष्ट्रीय महिलादिन उद्योगवर्धिनी चंद्रिकाताई चौहान यांच्या उद्योजकता विकास या विषयावरील व्याख्यानाने उत्साहात साजरा करण्यात आला. व्याख्यानाचे

उदघाटनावेळी चंद्रिकाताई चौहान, वर्षा विभुते, संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. दिलीपकुमार इंगवले, प्राचार्य डॉ.मनोजकुमार पाटील, उद्योजकता विकास कक्षाचे प्रा.एस. एस.काळे उपस्थित होते.

चंद्रिकाताई चौहान यांनी मनोगतात उद्योग-व्यवसाय म्हणजे महिलाना यशाचे विश्र् दाखवणारा आरसा असून विविध प्रकारचे व्यवसाय सुरु करून महिला स्वावलंबी होऊ शकतात. महिला सक्षमीकरणाबरोबरच कौशल्य प्रशिक्षण देऊन महिला यशस्वी उद्योजिका बनू शकतात हे विविध उदाहरणासहित सांगितले. तसेच त्यांनी विद्यार्थ्यांचे समुपदेशन करताना विविध सल्ले देऊन आपले अनुभव विशद केले. आपल्या उद्योगवर्धिनी संस्थेमार्फत चालणारे विविध महिला सक्षमीकरणाचे उपक्रम व कौशल्य प्रशिक्षण यांची माहिती देऊन सांगता केली. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांची समर्पक उत्तरे देऊन त्यांनी शंकांचे निरसन केले. प्रास्ताविक प्रा.ए.व्ही.सपाटे यांनी तर सुत्रसंचलन प्रा.एस. पी.जोकार यांनी केले.

## अकलूज येथे मूकनायक परिसंवाद कार्यक्रम

### नितेश कराळे करणार मार्गदर्शन



**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १४ मार्च-**

अकलूज येथे प्रतिवर्षीप्रमाणे मूकनायक प्रतिष्ठानच्यावतीने मूकनायक परिसंवाद या कार्यक्रमाचे रविवार दि. १६ मार्च रोजी आयोजन करण्यात आले असून या कार्यक्रमास आमदार राजू खरे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे तर फिनिक्स ॲकॅडमीचे संचालक तथा प्रसिद्ध व्याख्याते नितेश कराळे मास्तर यांचे प्रबोधनपर मार्गदर्शन ऐकावयास मिळणार आहे तरी सर्वांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन मूकनायक प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.

अन्नपूर्णा सांस्कृतिक हॉल अकलूज या ठिकाणी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून व्याख्याते कराळे यांची उपस्थिती असून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता आणि स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून युवकांनी यश कसे गाठावे यावर मार्गदर्शनपर विचार ऐकावयास मिळणार आहेत. कार्यक्रमाच्या सुरुवातीस सुप्रसिद्ध गायक विजय सरतापे यांच्या गायनांचा कार्यक्रम होणार आहे. सदर कार्यक्रमाचा सर्वांनी लाभ घ्यावा असे आवाहन मूकनायक प्रतिष्ठानचे पत्रकार बांधव नागेश लोंढे, डी एस गायकवाड, बाळासाहेब गायकवाड, सागर खरात, आनंदकुमार लोंढे, सुजित सातपुते, कैलास कांबळे यांच्या वतीने करण्यात आले आहे.

### विविध क्षेत्रातील मान्यवरांना पुरस्कार

या कार्यक्रमात दिला जाणारा पुरस्कार हा मानाचा आणि सन्मानाचा समजला जातो. यंदा पत्रकार क्षेत्रातील उत्कृष्ट पत्रकारिता हा पुरस्कार एल डी वाघमोडे, विधीज्ञ क्षेत्रातील पुरस्कार ॲड.सुमित सावंत, साहित्य क्षेत्रातील पुरस्कार बा.ना.जाधव तर शैक्षणिक क्षेत्रातील पुरस्कार सुनंदा वाघमारे काटे यांना जाहीर झाला असून त्यांना या कार्यक्रमात पुरस्कार देऊन यथोचित सन्मान करून गौरविण्यात येणार आहे.

### पुस्तके खरेदी करण्याची सुवर्णसंधी...

सदरच्या परिसंवाद कार्यक्रमात वैचारिक पुस्तके खरेदी करण्याची देखील सुवर्णसंधी प्राप्त होणार असून यासाठी विविध पुस्तकांचे बुक स्टॉल लावण्याचेही नियोजन आयोजकांनी केले आहे त्यामुळे सवलतीच्या दरात या ठिकाणी पुस्तके उपलब्ध होणार आहेत.



## चिखलठाण प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांनी बनविले पर्यावरणपूरक रंग

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.१४ मार्च-**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, चिखलठाण नं. २ येथे विद्यार्थ्यांसाठी पर्यावरणपूरक रंग तयार करण्याची कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी जास्वंद, झेंडू, गुलाब इत्यादी नैसर्गिक घटकांचा उपयोग करून सुरक्षित आणि पर्यावरणस्नेही रंग तयार केले.

होळी व रंगपंचमीच्या दिवशी हे सण साजरे करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर रासायनिक रंगांचा वापर केला जातो हे रंग आरोग्यासाठी घातक असतात अशा प्रकारचे रंग डोळ्यात गेल्याने डोळ्यांना इजा झाल्याची अनेक उदाहरणे आहेत रासायनिक रंगाचे दुष्परिणाम लक्षात घेऊन हे दुष्परिणाम टाळून प्राथमिक सणाचा आनंद घेण्यासाठी नैसर्गिक पर्यावरण पूरक रंग हा उत्तम पर्याय ठरतो याबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण व्हावी यासाठी शाळेचे मुख्याध्यापक श्री. अरुण हंगे आणि उपशिक्षक श्री. वैभव पाथ्रुडकर यांनी विद्यार्थ्यांना रासायनिक रंगांमुळे होणारे दुष्परिणाम समजावून सांगितले आणि पर्यावरणपूरक रंग वापरण्याचे महत्त्व स्पष्ट केले. तसेच, रंगपंचमी कशी नैसर्गिक पद्धतीने साजरी करावी याचे मार्गदर्शन केले. या उपक्रमामुळे पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण झाली.

आपला
जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# प्रमोद कोरे जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि.१४ मार्च -**



येथील स्वामी विवेकानंद विद्यालयाचे शिक्षक प्रमोद कोरे यांना जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने नुकतेच सन्मानित करण्यात आले. सोलापूर जिल्हा माध्यमिक शिक्षक व सेवक सहकारी पतसंस्थेच्यावतीने हा पुरस्कार श्री. कोरे यांना नुकताच जाहीर झाला होता. आपल्या सेवा कालावधीमध्ये शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातील त्यांचे योगदान लक्षात घेवून त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. सोलापूर येथील हुतात्मा स्मृती मंदिरात माजी शिक्षक आमदार दत्तात्रय सावंत यांच्या हस्ते, बाळे पतसंस्थेचे चेअरमन राजेंद्र माळी व सर्व संचालकांच्या उपस्थितीत सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देवून श्री. कोरे यांना गौरविण्यात आले. यावेळी संगीताताई फाटे, प्रा.संभाजी चव्हाण, अनिता जाधव, मुख्याध्यापक रामेश्वर भोसले ,सुधीर नाईकनवरे, सुनिता कोरे, डॉ.सुप्रजा कोरे व सर्व शिक्षक सेवक वृंद उपस्थित होते.शाहू शिक्षण संस्थेचे संस्थापक माजी मंत्री प्रा.लक्ष्मणराव ढोबळे यांनी त्यांचे अभिनंदन केले.



## संक्षिप्त वृत्त...



### भक्त निवास येथे होळी उत्साहात साजरी

**अक्कलकोट दि १४ मार्च-**

दुष्ट आचार विचार समाजातील अनिष्ठ रुढी दुर्गुण मत्सर द्वेश अहंकार व्यसनाची होळी करून संत सज्जनाचा सहवास करा असे आवाहन स्वामी भक्त नरेश अहिर पुणे यांनी केले. भक्त निवास अक्कलकोट येथे होळी प्रज्वलित करून पुजन प्रसंगी नरेश अहिर बोलत होते. याप्रसंगी अमोल अव्हाड अखिलेश नायकु सागर आलकुरे राजु गवणकर संजय पाठक मनोज काळे शिवाजी चव्हाण राजु बमनाळीकर महेश देसाई बाळू शिंदे वाघेश कुंभार सचिन कुंभार भिमा मलवे लकी कुर्ले दिनेश रोही काशिनाथ पुजारी मनोज शिर्के : सादिक शेख आदि कर्मचारी कल्याणराव इंगळे पॉलिटेक्निकल कॉलेज च्या वसतीगृहाचे विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. स्वामीभक्त नरेश अहिर राजू गवणकर यांनी यावेळी उपस्थित स्वामी भक्त विद्यार्थ्यांना भेळ प्रसाद वाटप केले.



### अक्कलकोट होमगार्ड पथकाच्यावतीने महिला कर्मचाऱ्याचा सत्कार

**अक्कलकोट दि . १४ मार्च -**

जागतिक महिला दिनानिमित्त अक्कलकोट होमगार्ड पथकाच्या वतीने दक्षिण पोलीस स्टेशन व उत्तर पोलीस स्टेशन मधील सर्व महिला होम गार्ड व महिला पोलीस कर्मचाऱ्याचा सन्मान व गौरव दक्षिण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक महेश स्वामी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कार्यक्रमास नॉर्थ व साऊथ पोलीस कर्मचारी व गणपतराव कलशेट्टी खेडगी, सामादेशक अधिकारी विजयकुमार हंद्राळमठ, पुरुष होमगार्ड अधिकारी खाजप्पा दसाडे, संजय करपे, रा चप्पा चानकोटे, राजू पाटील, सायबण्णा लोणी, सिध्दाराम घटकांबळे, सिन्नर, लक्ष्मण पवार, राईस जामदार, सचिन बिराजदार, आनंद गायकवाड, महेश पुराणिक, म्हेत्रे, जावेद मुल्ला, सोनू सोनकांबळे, कल्लाप्पा पवार व सर्व होमगार्ड पथक उपस्थित होते.



### राजश्री दुधगी यांना आदर्श लिपिका पुरस्कार प्राप्त

**वळसंग ११ मार्च:**

वळसंग (ता.द.सोलापूर) येथील श्री शंकरलिंग माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेत वरिष्ठ लिपिका राजश्री दुधगी यांची सोलापूर जिल्हा माध्यमिक शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी पतसंस्था मर्यादित बाळे यांच्या वतीने देण्यात येणाऱ्या आदर्श शिक्षकेत्तर कर्मचारी पुरस्कार२०२५ या जिल्हास्तरीय पुरस्कारासाठी आदर्श लिपिका म्हणून निवड करण्यात आली होती. हा पुरस्कार प्रदान सोहळा कार्यक्रम हुतात्मा स्मृती मंदिर सोलापूर येथे संपन्न झाला. पुणे विभागाचे माजी शिक्षक आमदार दत्तात्रय सावंत यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले. सौ. दुधगी यांचा संस्था व प्रशालेतर्फे सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष पंचायत समिती दक्षिण सोलापूरचे गटशिक्षणाधिकारी जयश्री सुतार हे होते. यावेळी श्री सिद्धेश्वर वुमेन्स पॉलिटेक्निकल कॉलेजच्या प्राध्यापिका कुमारी प्रिती शरणप्पा केशट्टी, संस्थेचे अध्यक्ष श्रीशैल दुधगी, संस्थेचे सदस्य विश्वनाथ थळंगे, शिवशरण प्याटी, प्रकाश दुधगी, मल्लिनाथ थळंगे, रमेश दुधगी, बसवराज शाबादे यांच्यासह दुधगी परिवारातील सदस्य उपस्थित होते. पस्थित सर्व मान्यवरांचे स्वागत शैला निंबाळ यांनी केले. प्रमुख पाहुण्यांची ओळख शिक्षिका स्नेहा हळगोदे यांनी करुन दिले. उपस्थित सर्व मान्यवरांच्या हस्ते क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्रस्तावना प्राचार्य वीरेश थळंगे यांनी केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमंत भोसले यांनी तर आभारप्रदर्शन गंगाधर बिराजदार यांनी केले.

### पिलीव येथील विश्रामगृहाजवळील पुलावर तरसाचा मृत्यू

**पिलीव दि १४ मार्च -**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील विश्रामगृह परिसरात गेल्या काही दिवसापासून तरसाचा वावर पाहवयास मिळत होता.यामुळे नागरिकामध्ये भितीचे वातावरण होते.मात्र गुरुवारी पहाटे सदरचा तरस पुलावर मृत अवस्थेत आढळुन आला.नक्की सदरच्या तरसाचा मृत्यु हा अज्ञात वाहनाच्या धडकेने झाला की कशाने याबाबतची माहीती निश्चितपणे समजु शकली नाही. नक्की तरसाचा मृत्यु कशामुळे झाला आहे याविषयी तर्क वितर्क लढविले जात आहेत.

# पंढरपूर नगरपरिषदेचे ६ लाख ४६ हजाराचे शिलकी अंदाजपत्रक मंजूर

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १४ मार्च -**


नगरपरिषदा नगरपंचायती तरतुदीनुसार पंढरपूर नगर परिषदेचे मुख्याधिकारी डॉ. प्रशांत जाधव यांनी प्रशासक सचिन इथापे यांच्याकडे अंदाजपत्रक मंजुरीसाठी सादर केले होते. त्यानुसार सन २०२४-२५ चे सुधारित व सन २०२५-२६ चे सहा लाख ४६ हजार २१७ रुपयांच्या शिलकी अंदाजत्रकास नगरपरिषदेचे प्रशासक सचिन इथापे यांनी मंजूरी दिली.

या अंदाजपत्रकामध्ये १५ व्या वित्त आयोग, वैशिष्ट्यपूर्ण योजना, विशेष वैशिष्ट्यपूर्ण योजना, नगरोत्थान राज्यस्तर, नगरोत्थान जिल्हास्तर, रमाई आवास योजना, प्रधानमंत्री आवास योजना, अग्निशमन सुरक्षा अभियान, यमाई तलाव सुशोभीकरण, प्राथमिक सोयी सुविधा विकास, मूलभूत सोयी सुविधा, स्वच्छ भारत अभियान, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी सुधार योजना, पाणीपुरवठा विषयक कामे, रस्ते दुरुस्ती, रस्ते बांधणी, नवीन गटारी आदी कामांसाठीच्या निधीची तरतूद करण्यात आलेली आहे.

**अंदाजपत्रकातील ठळक तरतूदी**

महिला बालकल्याण विकास २२ लाख. दिव्यांग निधी २२ लाख. लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नागरी सुधार योजना ५ कोटी.नगरोत्थान राज्यस्तर रस्ते विकास ३० कोटी. नगरोत्थान राज्यस्तर पाणी पुरवठा २९ कोटी ७६ लाख. नगरोत्थान राज्यस्तर भुयारी गटार योजना ३० कोटी. नगरोत्थान जिल्हास्तर ५ कोटी. दलितेतर वस्ती सुधारणा योजना २ कोटी. प्रधानमंत्री आवास योजना ३ कोटी. रमाई आवास योजना ३ कोटी. माझी वसुंधरा अभियान ३ कोटी. रोडलाईट पाणीपुरवठा जलशुद्धीकरण केंद्र मलसिद्धीकरण केंद्र विज बिल १० कोटी ४१ लाख. स्मशानभूमी सुधारणा २५ लाख. गटार व नाले २५ लाख. काँक्रीट रस्ते १ कोटी. डांबरी रस्ते १ कोटी अशी तरतूद अंदाजपत्रकामध्ये मंजूर करण्यात आल्याची माहिती मुख्याधिकारी डॉ. प्रशांत जाधव व लेखापाल करुणा शेळके यांनी दिली.

पंढरपूर नगर परिषदेचे सन २०२५-२६ चे अंदाजीत वार्षिक उत्पन्न प्रारंभिक शिलकेसह २६६ कोटी ४ लाख ६ हजार रूपयांचे असून खर्च २६५ कोटी ९७ लाख ५९ हजार ७८३ रूपयांचा अंदाजीत आहे. वर्षाखेरीस रक्कम रुपये ६ लाख ४६ हजार २१७ इतकी अंदाजे शिल्लक राहील.



## अक्कलकोटमधे आद्य जगद्गुरू रेणुकाचार्य जयंती उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि १४ मार्च -**

येथील वीरशैव लिंगायत मंचाच्या वतीने बुधवारी मल्लिकार्जुन मंगल कार्यालयात आद्य जगद्गुरू रेणुकाचार्य जयंती उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी प्रतिमापूजन ज्येष्ठ समाजसेवक मल्लिनाथ स्वामी, उद्योजक राजशेखर कापसे, गुरलिंग येळमेली, तालुका संयोजक सूर्यकांत कडबगावकर यांच्या हस्ते करण्यात आले. मल्लिनाथ स्वामी यांनी जगद्गुरू रेणुकाचार्य यांचे जीवन चरित्र कथन केले. रुद्रय्या स्वामी, धानय्या स्वामी, संतोष स्वामी, शिवशंकर स्वामी, अशोक स्थावरमठ, राहुल वाडे, धनराज पाटील, सौरभ हळके, प्रितीश किलजे, संतोष वगाले सर व अन्य समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जोशी हायस्कूलमध्ये पर्यावरणपूरक होळी



**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि. १४ मार्च-**

येथील रामभाऊ जोशी हायस्कूल अंतर्गत वसुंधरा पर्यावरणमंडळच्या वतीने पर्यावरणपूरक होळीचे आयोजन केले.

यावेळी मुख्याध्यापक हेमंत कदम, पर्यवेक्षक धनवंत करळे, वसुंधरा पर्यावरण मंडळाचे समन्वयक महादेव पुजारी, जेष्ठ शिक्षक नरसिंग एबोते, विनय कुलकर्णी, नागेश घुले, अभिषेक चोपडे, विज्ञान शिक्षिका मनिषा ढोबळे, दर्शिका खोबरखेडे आदी उपस्थित होते. यावेळी स्काऊट मास्टर महादेव पुजारी यांनी येणाऱ्या पिढीसाठी पर्यावरण रक्षण करणे अत्यंत आवश्यक असून त्यासाठी वृक्षारोपण केले पाहिजे असे सांगून पर्यावरणपूरक होळी करणे का आवश्यक आहे? याचे महत्व विषद केले. पर्यावरण समतोल राखण्यासाठी प्राणी,पक्षी यांचे जतन व संवर्धन केले पाहिजे त्यासाठी कोणते उपाय करावेत याविषयी माहिती सांगीतली. होळी साजरी करताना वृक्षतोड न करता पर्यावरणाचे नुकसान होणार नाही याची दक्षता घेऊन होळी साजरी करावी असे आवाहन केले. विद्यार्थ्यांनी शाळा परिसरातील कचरा गोळा करून पर्यावरणपूरक होळी साजरी केली. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सोमनाथ माने, गणेश गायकवाड, अश्विनी शिंगटे, अफ्रिन शेख, सुभाष चौगुले, अमित गायकवाड आदींनी परिश्रम घेतले.

# साठवण तलावासंदर्भात माळशिरस तालुक्याला ठेंगा

**जिल्ह्यातील ७४ पाझर तलाव होणार साठवण तलाव**

**तभा वृत्तसेवा,**
**सदाशिवनगर, दि. १४ मार्च -**

जिल्ह्यातील ७४ पाझर तलावांचे रुपांतर साठवण तलावात करण्यास नुकतीच मंजुरी देण्यात आली. यामध्ये सांगोला, पंढरपूर, बार्शी, मोहोळ, उत्तर, सोलापूर, अक्कलकोट, करमाळा, माढा, दक्षिण सोलापूर, मंगळवेढा या तालुक्यातील पाझर तलावांचा समावेश आहे. मात्र माळशिरस तालुक्यात ९९ पाझर तलाव असताना एकाही पाझर तलावाचा समावेश करण्यात आलेला नाही. त्यामुळे याबाबतीत तालुक्याला ठेंगा दाखवण्यात आल्याचे दिसत आहे.

तालुक्याच्या पश्चिम भागाला सतत दुष्काळाचा सामना करावा लागतो. त्यावर मात करण्यासाठी व येथील कामगारांना काम मिळण्यासाठी रोजगार हमी मधून अनेक पाझर तलाव तयार करण्यात आले. तालुक्यात ९९ पाझर तलाव असून या पाझर तलावांची साठवण क्षमता गाळ साठल्यामुळे कमी झाली आहे. गतवर्षी या तलावातील गाळ काढण्यासाठी योजना आखण्यात आली परंतु ती कागदावरच राहिली. अनेक पाझर तलावातून पाण्याची गळती होत आहे. पावसाच्या लहरीपणामुळे या परिसरांत सरासरीपेक्षा नेहमीच पाऊस कमी होतो त्यामुळे हे तलाव पूर्ण क्षमतेने भरले जात नाहीत. जानेवारी फेब्रुवारी महिन्यातच पाणी पुरवठ्याच्या विहीरी कोरडया पडत असल्याने गावांना टँकरने पाणीपुरवठा करावा लागतो. त्यासाठी प्रशासनाचा लाखो रुपयांचा खर्च होतो शासनाने या तलावांची साठवण क्षमता वाढविल्यास व दुरुस्ती केल्यास सिंचन क्षेत्र वाढून नागरिकांची पिण्याच्या पाण्याची सोय होणार आहे. जिल्ह्यातील ७४ पाझर तलावांचे साठवणमध्ये रूपांतर करण्यास मान्यता मिळाली परंतु माळशिरस तालुक्यातील एकही पाझर तलावाचा समावेश साठवण तलावात केलेला नाही त्यामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांकडून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

याबाबत माळशिरस पंचायत समितीचे लघु पाठबंधारे विभागाचे उपअभियंता तेजस चिखलीकर यांना विचारले असता सदरच्या तलावाची निवड जिल्हास्तरावरून झाली असून याबाबत मला कोणतीही कल्पना नाही असे सांगून हात झटकले.



पाझर तलावातून साठवण तलावात रूपांतर करताना माळशिरस तालुका वगळण्यात आल्याचे लक्षात आल्यानंतर जिल्हा जलसंधारण अधिकारी मोहोद्दिन जमादार यांच्याशी संपर्क केला. त्यांनी मृद व संधारण विभागाकडून ना हरकत प्रमाणपत्रासाठी जी नावे आले त्यानाच ना हरकत प्रमाणपत्र दिले आहे असे सांगितले. मृद व संधारणचे दयासागर दामा यांच्याशी विचारणा केली असता यापूर्वी कामे झाली आहेत पण माळशिरस मधील नावे असल्याचे सांगितले परंतु नावे दिली नाहीत.

**- बाळासाहेब सरगर अध्यक्ष भाजप सोलापूर जिल्हा किसान मोर्चा**



तालुक्यातील जळभावी येथील पाझर तलावाचे साठवण तलावात रूपांतर केले गेले तर साठवण क्षमता वाढली जाणार आहे. गावाला कधीही पाण्याच्या टँकरची आवश्यकता लागणार नाही. तसेच तलावाखालील विहिरीची पाण्याच्या पातळीत वाढ होऊन सिंचन क्षेत्र वाढले जाऊ शकते. याबाबत ग्रामपंचायतीने प्रस्ताव देखील दाखल केला आहे. परंतु या बाबत कोणताही निर्णय झाला नाही.

**- पुष्पा शिंदे, माजी सरपंच, जळभावी ता माळशिरस**

**पंढरपूर बाजार समितीमध्ये**

# बेदाण्यास मिळाला प्रति किलो ५११ रुपयांचा उच्चांकी दर

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १४ मार्च -**

येथील कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये मंगळवारी बेदाण्याची सुमारे १७५ गाड्यांची आवक होवून सुमारे १५० गाड्यांची विक्री झाली. यावेळी बेदाण्याला उच्चांकी ५११ रूपये प्रति किलो दर मिळाला. तर सरासरी दोनशे रूपये प्रति किलो दर निघाला.

दरम्यान येथील बाजार समितीत बेदाणा आवक चांगली असुन खरेदीदार व्यापारी मोठया संख्येने येत आहेत. या बरोबरच मंगळवारी (ता.११) बाजार समिती मधील पार्श्वनाथ ट्रेडर्स प्रो. स्वप्नील कोठाडिया यांचे आडत दुकाना मध्ये आकाश धनाजी वसेकर (रा.बार्डी ता.पंढरपूर ) यांच्या ३३ बॉक्स बेदाण्यास ५११ रूपये प्रती किलो इतका उच्चांकी दर मिळाला. हा माल मे. राजेश्वरी ट्रेडींग कंपनी, तासगांव यांनी उच्चांकी दराने खरेदी केला. मे.सोमनाथ सदाशिव डोंबे



यांचे आडत दुकाना मध्ये सोमनाथ महादेव गोरे (रा.कोन्हेरी ता. मोहोळ ) यांच्या १० बॉक्स बेदाण्यास ५०० रूपये प्रती किलो दर मिळाला. हा माल मे. रोहिणी ट्रेडींग कंपनी सांगली यांनी खरेदी केला. तसेच मे. तुलसी ट्रेडींग कंपनी यांचे आडत दुकाना मध्ये लक्ष्मण दासु व्यवहारे (रा. करकंब, ता.पंढरपूर) यांच्या १९ बॉक्स बेदाण्यास ४२१ रूपये प्रती किलो दर मिळाला सदर माल मे.एस. मनिलाल कंपनी, तासगांव यांनी खरेदी केला. मे. बसंतराज ट्रेडर्स यांचे आडत दुकानात नामदेव विठ्ठल मोरे (रा.बावी ता.माढा ) यांच्या ७५ बॉक्स बेदाण्यास ४०० रूपये प्रती किलो दर मिळाला. हा माल मे.एम.सारडा, सांगली यांनी खरेदी केला अशी माहिती बाजार समितीचे सभापती हरिष गायकवाड व उपसभापती राजुबापू गावडे यांनी दिली.

माजी आमदार प्रशांत परिचारक यांच्या नेतृत्वाखाली पंढरपूर बाजार समितीचे काम काज उत्तम प्रकारे चालु आहे. तसेच बेदाणा सौद्यासाठी युटोपियन शुगर्सचे चेअरमन उमेश परिचारक यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभते आहे असे सभापती हरिष गायकवाड व उपसभापती राजुबापू गावडे यांनी सांगीतले. यावेळी बेदाणा असोसिएशनचे अध्यक्ष व संचालक सोमनाथ डोंबे, यासीन बागवान, महादेव लवटे, महादेव बागल, व अन्य संचालक आडते, व्यापारी, तसेच बाजार समितीचे अधिकारी, कर्मचारी आदी उपस्थित होते.

**दर चांगला मिळत असल्याने प्राधान्य**

पंढरपूर कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये शेतकऱ्यांच्या सोयीसाठी बेदाण्याचे सौदे दर मंगळवार व शनिवार रोजी दुपारी १ वा. असतात. मालाला उठाव व मागणी चांगली आहे. व्यापारी मोठ्या प्रमाणावर माल खरेदीसाठी येत आहेत. आवक चांगली असुन, दर चांगला मिळत असल्याने शेतकरी माल विक्रीसाठी पंढरपूर बाजार समितीस प्राधान्य देत आहेत.शेतकरी बंधुंनी जास्तीत जास्त माल पंढरपूर बाजार समितीमध्ये आणावा असे आवाहन पंढरपूर कृषी बाजार समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

**कौतुकाची थाप**

शेतकरी आकाश धनाजी वसेकर (रा.बार्डी) व आडते स्वप्नील कोठाडिया यांचे बाजार समितीचे सभापती हरिष गायकवाड यांनी व युटोपियन शुगर्सचे चेअरमन उमेश परिचारक यांनी समक्ष बेदाणा मालाची पहाणी करून कौतुक केले.

## मंद्रूपमध्ये उपद्रवी बुलेटस्वारांमुळे विद्यार्थी व नागरिक त्रस्त

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रूप, दि. १४ मार्च -**

मंद्रूप येथील बाजारपेठ आणि शाळा महाविद्यालयांच्या परिसरात उपद्रवी बुलेटस्वारांचा त्रास वाढला आहे. मोठमोठ्या आवाजात गाड्या चालवणे, स्टंटबाजी करणे यामुळे नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण आहे. विशेषतः शालेय वेळेत आणि कॉलेज सुटल्याच्या वेळी हे प्रकार अधिक वाढले आहेत. त्यामुळे विद्यार्थी आणि पालक त्रस्त झाले आहेत.

बाजारपेठेत आणि शाळा-महाविद्यालयांसमोर बुलेटच्या सायलेन्सरमध्ये बदल करून बंदुकीच्या गोळीप्रमाणे आवाज काढला जात आहे. त्यामुळे नागरिकांच्या मनात भीतीचे वातावरण आहे. याशिवाय वेगवान गाड्यांमुळे विद्यार्थ्यांचे लक्ष विचलित होत आहे. तसेच अपघात होण्याची शक्यताही आहे. स्थानिक नागरिक आणि पालकांनी या प्रकारावर रोष व्यक्त करत तातडीने पोलीस कारवाईची मागणी केली आहे. काही बुलेटस्वार मुद्दाम बंदुकीच्या गोळीप्रमाणे आवाज काढत रस्त्यावरून भरधाव वेगाने जातात. मंद्रूप पोलीस प्रशासनाकडून या उपद्रवी गटावर तातडीने कारवाई होण्याची नागरिकांची अपेक्षा आहे.

## कुर्डुवाडी नगरपालिकेवर पाण्यासाठी मोर्चा

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डुवाडी, दि.१४ मार्च -**

कुर्डुवाडी शहराला पाच ते सहा दिवसातून एकदा पाणी येते .पाणीपट्टी मात्र वर्षाची घेतली जाते. ऐन उन्हाळ्यात पाण्यासाठी शहरवासीयांचे प्रचंड हाल होत आहेत. याचा निषेध म्हणून बैलगाडीतून जागरण गोंधळ घालत नगर परिषदेवर मोर्चा काढण्यात आला. नगरपालिकेच्या ढिसाळ नियोजनामुळे शहराचा पाणीपुरवठा विस्कळीत झाला आहे. वर्षातील केवळ ७० दिवस पाणी येत . याबाबत निषेध म्हणून शहरातून नगरपरिषदेवर बैलगाडीतून जागरण गोंधळ घालत मुख्याधिकारी प्रशांत भोसले यांना निवेदन देण्यात आले. यावेळी गणेश घुगे, शुभांगी श्रीरामे, जयश्री माने, पिंटू सोलंकर यांच्यासह अन्य आंदोलक उपस्थित होते.

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## पीएम श्री उर्दु शाळा बनली बनली ग्रीन शाळा

**तभा वृत्तसेवा**
**तेर, दि.१४ मार्च -**

धाराशिव तालुक्यातील तेर येथील पीएमश्री जिल्हा परिषद उर्दू शाळेत लॉन हिरवळीची लागवड दि.१३ रोजी पीएमश्री योजनेअंतर्गत स्कूल ग्रीनरी करण्याकरिता लॉन हिरवळीची लागवड करण्यात आली. शाळेतील परिसर सुंदर करण्यासाठी फूल झाडांची व हिरवळीची लागवड करण्यात आली.



शाळेत एकूण २००० स्क्वेअर फिट हिरवळीची लागवड करून प्ले-ग्राउंड हिरवळ युक्त करण्यात आले. यामुळे विद्यार्थ्यांकरिता शालेय परिसरात आनंददायी वातावरण निर्मितीसाठी खूप फायदा होणार आहे. यामुळे विद्यार्थी शाळेत राहतील आणि निसर्गरम्य वातावरणात शिकतील या निमित्ताने हिरवळीची लागवड करण्यात आली.

यासाठी मुख्याध्यापक शहा तय्यबअली आणि शिक्षकांनी मेहनत घेतली.



### संक्षिप्त वृत्त...



#### लामतुरे वस्तू संग्रहालयास जिल्हाधिकाऱ्यांची भेट

**तेर, दि.१४ मार्च -**

धाराशिव जिल्हाचे नुतन जिल्हाधिकारी किरण किर्ती पुजार यांनी तेर येथील कै. रामलिंगअप्पा लामतुरे शासकीय वस्तू संग्रहालयास भेट दिली व नवीन इमारतीची पाहणी केली. सध्या कै. रामलिंगप्पा लामतुरे शासकीय वस्तू संग्रहालयात जवळपास २४ हजार ७६६ पुरातन अवशेषाचा संग्रह उपलब्ध आहे. या संग्रहालयाच्या नवीन इमारतीचे बांधकाम शेवटच्या टप्प्यात आहे. यावेळी उपस्थित रेवनसिद्ध लामतुरे, दिपक खरात, सुमेध वाघमारे आदी उपस्थित होते.

#### लोहाऱ्यात शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन

**लोहारा, दि.१४ मार्च -**

राजरथ चॅरिटेबल ट्रस्ट संचालित सर्व जनरल हॉस्पिटल पद्मानगर बार्शी रोड लातुर व सोमेश्वर मल्टि स्पेशालिटी हॉस्पिटल लोहारा यांच्या संयुक्त विद्यमाने सर्वसामान्य नागरिकांसाठी शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन लोहारा शहरातील सोमेश्वर मल्टि स्पेशालिटी हॉस्पिटल येथे दि.१६ मार्च रोजी सकाळी ९ ते दुपारी १ या वेळेत सर्व रोग निदान शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबीरात आतड्यांचे सर्व आजार, अपेंडिस (ओपन दुर्बीनद्वारे), हर्निया (ओपन दुर्बीनद्वारे), हार्डोसिल, सुनता, मुळव्याध, भगंदर, वेरीकोज वेन, हाता-पायावरील सुज जंतुसंसर्ग, त्वचारोपन, सर्व प्रकारच्या गाठी, कर्क रोग, मुत्ररोग, मुतखडे, मज्जातंतु सबंधित रोग त्यावरील उपचार, प्लास्टिक सर्जरी (सौंन्दर्य सबंधीत शस्त्रक्रिया), हाडासबंधीत उपचार, दुर्बिणीद्वारे अत्याधुनिक शस्त्रक्रिया अत्यल्प दरात करण्यात येणार आहेत. या शिबिराचा जास्तीत जास्त नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन आयोजनकांच्या वतीने करण्यात आले आहे.

#### अरुण शेरखाने यांचे निधन

**धाराशिव, दि.१४ मार्च -**

शहरातील संत ज्ञानेश्वर मंदिर जवळच्या सर्वात जुन्या असलेल्या शेरखाने सुपर सर्विसेस पेट्रोल पंपाचे मालक अरुण कडप्पा शेरखाने (वय ६८) यांचे दि.११ मार्च रोजी पहाटे दुःखद निधन झाले. यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, एक मुलगी, ७ भाऊ, चार बहिणी, सुना व नातवंडे असा मोठा परिवार आहे.

# तीर्थक्षेत्रात युवा पीढी ड्रग्जच्या व्यसनात; अनेकांचे संसार उद्वस्त

**▶▶ ड्रग्स प्रकरणाची सखोल चौकशी नारकोटिक्स कंट्रोल ब्यूरो (एनसीबी) या एजन्सीकडुन करण्याची मुख्यमंत्र्यांकडे मागणी...**

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१४ मार्च -**

ड्रग्ज अंमली पदार्थासह अवैद्य बेकायदेशीर धंद्याच्या विळख्यात तिर्थक्षेत्र तुळजापूर गुंतले असल्याने येथील चालु असलेल्या ड्रग्ज विक्रीसह अवैद्य धंद्यात गुंतलेल्या आका आणि बोक्यांवर कायदेशिर कठोरातील कठोर कार्यवाही करण्याच्या मागणीचे निवेदन मुख्यमंत्री, पालकमंत्री, जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, आणि पोलीस निरीक्षक यांना समाजसेवक राजाभाऊ माने यांनी दि.११ मार्च रोजी दिले आहे.

सदरील निवेदनात असे म्हटले आहे की, तुळजापूर हे तिर्थक्षेत्र असुन साडेतीन शक्तीपीठापैकी एक तिर्थक्षेत्र आहे राज्यातुन व परराज्यातुन लाखोच्या संख्येने भाविक आई तुळजाभवानीच्या दर्शनास येत असतात. अशा तिर्थ क्षेत्रात सर्व प्रकारच्या अमली पदार्थाचे सेवनात व अवैद्य बेकायदेशीर धंद्याच्या विळख्यात तीर्थ क्षेत्रातील युवा पिढी अडकलेली असुन, अनेकांचे संसार उध्वस्त होत आहेत. तुळजापूर शहरात अवैद्य धंदे, ड्रग्ज, गांजा, गुटखा, वैश्या व्यवसाय, मटका, जुगार, ऑनलाईन चक्री इत्यादी चालविण्याऱ्यांचे ठाव ठिकाणे नमुद करुन तसेच बोक्यांचे बेकायदेशिर चालु असणारे धंदे, तत्कालिन पोलिसांच्या आर्शिवादाने चालु आहेत. अशा



अवैध धंद्यांवर कार्यवाही केली जात नाही. तुळजापूरातील युवा पीढी ड्रग्ज आमली पदार्थाच्या सेवनात गुतण्याचे प्रथम कारण म्हणजेच अक्का आणि बोका असुन तुळजापूर युवा पीढी ड्रग्जच्या विळख्यात गुंतली आहे. ड्रग्स प्रकरणाची निःपक्षपाती पोलीसी खाक्या दाखवुन चौकशी झाल्यास अनेक गंभीर बाबी समोर येणार याबाबतची सखोल चौकशी करण्याकामी संशयाचे मोबाईल एनसीबी तपासल्यास सत्य समोर येणार आहे. युवक ड्रग्ज कोणाकडुन खरेदी करुन सेवन करीत होते या बाबीची मुळापर्यंत चौकशी होणे म्हणजेच ड्रग्ज अमली पदार्थाची मुठमाती करण्यासारखी आहे. तसेच संशयित ड्रग्स सेवन करणाऱ्यांची मेडीकल चाचणी कराच म्हणजे अनेक गंभीर बाबी समोर येणार आहेत. बोक्याचे आका असल्यानेच ड्रग्स प्रकरणात नावे समोर येत नाहीत. तुळजापूर शहरात अनेक बेकायदेशीर धंदे असुन अशा व्यवसायिकांची दहशत असल्याने त्याच्या विरोधात उघडपने कोणीही बोलण्यास व साक्ष देण्यास तयार नाहीत. ड्रग्ज प्रकरणात गुंतलेला व सध्या जिल्हा करागृहात असलेला मुख्य ड्रग्ज विक्री माफिया अमित अशोक अरगडे हा बेकायदेशीर असणाऱ्या सर्व धंद्यात भागीदार होता. आरगडे यास आर्थिक पुरवठा करणारा कोण? व ड्रग्ज विक्री भागीदार कोण? इत्यादी बाबत सखोल चौकशी करण्याकामी नारकोटिक्स कंट्रोल ब्यूरो (एनसीबी) या एजन्सी कडुन होणे म्हणजेच तुळजापूर युवा पीढीला पडलेला ड्रग्जचा विळखा हाणुन पाडण्यासारखे आहे.

तुळजापूर येथील चालु असलेल्या ड्रग्ज विक्री सह अवैद्य धंदे याबाबतच सखोल चौकशी करण्याकामी नारकोटिक्स कंट्रोल ब्यूरो (एनसीबी) कडुन चौकशी करण्यात यावी अशी मागणी सदरील निवेदनात केली आहे. निवेदनावर राजाभाऊ माने यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## मलकापूर शिवारात वाघाच्या हल्ल्यात दुभती गाभण गाय ठार

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.१४ मार्च -**

कळंब तालुक्यातील मलकापूर येथे बुधवारी (ता.१२) वाघाने गोठ्यातील एका गायीची शिकार तर एक दुभती गाभण गाय गंभीर जखमी केल्याची घटना घडली.

शेतकरी संतोष लोमटे गुरुवारी सकाळी धार काढण्यासाठी गेले असता सदरील प्रकार समोर आला. वनविभागाला सदरील घटनेची माहिती देताच वनविभागाचे गस्त पथक, पुण्याची रेस्क्यू टीम मलकापूर शिवारात दाखल झाली असुन वाघानेच गायीची शिकार केल्याचा अंदाज आल्याने वाघाला रेस्क्यू करण्याची तयारी केली असुन वाघाला पकडण्यासाठी सापळा लावला आहे. गेल्या अनेक दिवसांपासून गुंगारा देणारा वाघ वनविभागाच्या तावडीत सापडणार का? याकडे जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

मलकापूर (ता.कळंब) येथील शेतकरी बुधवारी रात्री संतोष सर्जेराव लोमटे बुधवारी रात्री शेतातून गाईच्या धारा काढून घरी आले. गुरुवारी सकाळी गाईच्या धारा काढण्यासाठी गेले असता गोठयातील दोन गाई जखमी अवस्थेत दिसल्या एक गाय नरड्याचा चावा घेतल्याने ठार झाली. संतोष लोमटे यांचे एक गाय ठार तर एक जखमी झाल्याने दीड लाख रुपयाचे नुकसान झाले.

## वाशी तालुक्यात ज्वारी काढणीसाठी मजूर मिळेनात; मजुरासाठी बळीराजाची वणवण

**तभा वृत्तसेवा / सुधीर घोलप**
**वाशी, दि.१४ मार्च -**

वाशी तालुक्यात मोठ्या प्रमाणात ज्वारीची पेरणी झाली आहे. सध्या ज्वारी काढण्याची सुगी सुरू झाली. परंतु आता शेतकऱ्यांना ज्वारी काढणीसाठी मजूर मिळेना गेलेत. बळीराजाच्या नशीबी सतत संघर्ष पुजला आहे, असेच म्हणावे लागेल.

अनेक संकटांना तोंड देत बळीराजा पीक पिकवतो कधी अतिवृष्टी तर कधी दुष्काळी परिस्थिती यातून सावरून पुन्हा ताठ मानेने उभे राहतो. यंदा राज्यात चांगला पाऊस पडला. विहीर, बोर तलावांना मुबलक पाणीसाठा उपलब्ध असल्याने शेतकऱ्यांनी बागायती पिकासह गहू, ज्वारी, हरभऱ्याची पेरणी मोठ्या प्रमाणात केली. पीकही चांगले आले पण त्याला आता पीक काढणीसाठी मजूर मिळेनात यासाठी बळीराजाला संघर्ष करावा लागत आहे. कोणी ज्वारी काढायला घेता का, कोणी ज्वारी काढायला घेता का म्हणत मजुरांसाठी बळीराजाची वणवण सुरू आहे. ज्वारीची भाकर आणि गरम चमचमीत रसा म्हणलं की अह जेवण नादच खुळा. पण ही ज्वारीची भाकर तयार होण्यासाठी आधी



बळीराजाला मातीत गाडून घ्यावं लागतं. अहोरात्र कष्ट करावं लागतं. नंतर ते चांगलं पीक येतं. मग त्याची मळणी होऊन ज्वारी तयार होते. आणि पुन्हा त्याचे पीठ होऊन आपल्याला भाकरी खायला मिळते. मग आपण म्हणतो काय भाकरी लागली.

पण ती भाकरी आपल्यापर्यंत यायला बळीराजाला काय संघर्ष करावा लागत आहे. हा कसा कोणाला दिसत नाही.




लातूर
जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com सोलापूर तरुण भारत

## महिलांनी वर्तमानकाळातील सुत्रांचे पालन करावे : मोलवाने

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.१४ मार्च -**

शिस्त, वेळेचे नियोजन, सातत्य, आत्म विश्वास, दूरदृष्टी, इच्छाशक्ती, सृजनशीलता अशा वर्तमान काळातील सूत्रांचे पालन प्रत्येक महिलांनी जिवनामध्ये तंतोतंत केले तरच यश हमखास मिळते, असे प्रतिपादन विलासराव देशमुख फाउंडेशनच्या सामाजिक विभागाचे समन्वयक सौ संगीता मोलवाने यांनी केले.

श्री वेताळेश्वर शिक्षण संस्था संचलित लातूर कॉलेज ऑफ फार्मसी, लातूर कॉलेज ऑफ फिजिओथेरपी, लातूर कॉलेज ऑफ सायन्स, लातूर कॉलेज ऑफ नर्सिंग, राजीव गांधी इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटेक्निक, लातूर कॉलेज ऑफ आयटीआय यांच्या संयुक्त विद्यमानाने जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष भीमाशंकर बावगे, उपाध्यक्ष जयदेवी बावगे, सचिव वेताळेश्वर बावगे, संचालक नंदकिशोर बावगे, संचालिका माधुरी बावगे, प्राचार्य डॉ. श्रीनिवास बुमरेला, प्राचार्य डॉ. वीरेंद्र मेश्राम, प्राचार्य रूपाली गिरी यांची प्रमुख उपस्थिती होती. सचिव वेताळेश्वर बावगे, डॉ. श्रीनिवास बुमरेला यांनी महिला दिनानिमित्त मनोगत व्यक्त केले. प्रा. प्रज्ञा वागदरे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. संस्कृती शिरोरे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

कार्यक्रमास सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## ▶▶ संक्षिप्त वृत्त...

### महिला दिनानिमित्त महिलांचा सत्कार संपन्न

**निलंगा, दि.१४ मार्च -**

तालुक्यातील औराद शहाजानी येथील मास्टर दीनानाथ मंगेशकर महाविद्यालयातील महिला सक्षमीकरण विभागाच्या वतीने जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. जागतिक महिला दिननिमित्त राजकीय, शैक्षणिक, उद्योग, वैद्यकीय इत्यादी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत असलेल्या औराद शहाजानी येथील कर्तृत्ववान महिलांचा त्यांच्या कार्यालयीन ठिकाणी व स्वगृही जाऊन महाविद्यालयाच्या वतीने शाल व गुलाबपुष्प देऊन सत्कार करण्यात आला. तसेच त्यांच्याशी संवाद साधत कार्याचा गौरवही करण्यात आला. यामध्ये सरपंच आरती बालाजी भंडारे, प्रा.डॉ. संध्या शर्मा, उद्योग क्षेत्रातील शोभा कुंभार व वैद्यकीय क्षेत्रातील डॉ. ज्योती माने यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. विजयकुमार पवार, महिला सक्षमीकरण विभागाच्या समन्वयक डॉ. शीतल गुंजटे, डॉ. सुचिता किडीले, डॉ. सत्यशीला जोंधळे, प्रा. प्रज्ञा कुलकर्णी, प्रा. अंजना मुळे, प्रा. आकांक्षा मुळे, प्रा. पूनम सूर्यवंशी उपस्थित होते.

### खेळाडूंची स्पर्धेसाठी निवड

**निलंगा, दि.१४ मार्च -**

महाराष्ट्र महाविद्यालय निलंगा येथील विद्यार्थी सूर्यवंशी रोहिणी, सूर्यवंशी संध्या, सूर्यवंशी प्रियंका, सूर्यवंशी साक्षी, या विद्यार्थिनीची निवड अखिल भारतीय बॉल बॅडमिंटन स्पर्धा अलगप्पा विद्यापीठ, कराकुंडी, तामिळनाडू येथे दि.२९ मार्च ते १ एप्रिल या कालावधीत होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ बॉल बॅडमिंटन स्पर्धेसाठी निवड झाली आहे. तसेच लोहार वैभव या विद्यार्थ्यांची श्रीनगर, कश्मीर येथे होणाऱ्या अखिल भारतीय पावर लिफ्टिंग आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी निवड झालेली आहे. या सर्व विद्यार्थ्यांना क्रीडा संचालक प्रा.डॉ. गोपाळ मोघे यांचे मार्गदर्शन लाभले आहे. खेळाडूंच्या या यशाबद्दल महाराष्ट्र शिक्षण समिती, निलंगा चेअध्यक्ष विजय पाटील निलंगेकर, बब्रुवान सरतापे, सचिव, महाराष्ट्र शिक्षण समिती, निलंगा तसेच प्राचार्य डॉ. माधव कोलपुके व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

### आदर्श कामागार पुरस्कार सोहळा संपन्न

**वलांडी, दि.१४ मार्च -**

तालुक्यातील वलांडी येथे प्रहार कामगार संघटनेचेच्या वतिने आदर्श कामगार व जेष्ठ कामगार पूरस्कार वितरण सोमवार दि.१० मार्च सकाळी ११ वाजता विविध मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आला. या आयोजित कार्यक्रमात उद्घाटक म्हणून उपस्थित राजाभाऊ चौगूले जिल्हाध्यक्ष प्रहार जनशक्ती, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच राणी ताई भंडारे, प्रेमलता भंडेताई,विनोद तेलंग,माजी सरपंच राम भंडारे, ज्ञानेश्वर भोसले, जम्मू मूसा आदी मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते जेष्ठ कामगार आदर्श कामागारांना सन्मान चिन्ह देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी अंतेश्वर सूर्यवंशी, अक्रम शेख, जलील बौडीवाले, मूकेश कांबळे, बालाजी सोनवने आदीने परीश्रम घेतले.

### शिवनेरीत यशवंतराव चव्हान यांना अभिवादन

**शिरूर अनंतपाळ, दि.१४ मार्च -**

येथील शिवनेरी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतिने महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री ज्यांनी महाराष्ट्र एकसंघ ठेवून मुंबई महाराष्ट्रात कायम ठेवण्यात त्यांची महत्त्वाची भूमिका असून ते कुशल प्रशासक, कवी यशवंतराव चव्हाण यांची जयंती त्यांच्या प्रतिमेचे पुजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरुण धालगडे, रासेयोचे कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. पांडूरंग मुठ्ठे यांच्या हस्ते करून पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी यशवंतराव चव्हाण यांच्या जीवन कार्यावर राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ.डि.के. धुमाळे यांनी प्रकाश टाकला. यावेळी रासेयोचे कार्यक्रम अधिकारी डॉ. अमोल इंगळे सह प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थीत होते.

### स्व. हाके पाटील यांच्या स्मरणार्थ वृद्धाश्रमास देणगी

**अहमदपूर, दि.१४ मार्च -**

श्री गणेश शिक्षण प्रसारक मंडळ मांडुरकी, अहमदपूरचे तत्कालीन संस्थापक सचिव स्वर्गवासी अशोकराव हाके पाटील यांची १४ मार्च रोजी पुण्यतिथी साजरी केली जाते. यानिमित्ताने संस्थेच्या वतीने अहमदपूर तालुक्यातील काजळ हिपरगा येथील सुखमणी वृद्धाश्रमास बांधकामासाठी ५२ हजार १०० रुपयाची देणगी देण्यात आली. श्री गणेश शिक्षण प्रसारक मंडळ मांडूरकी च्या वतीने जिल्ह्यात अनेक नामांकित संस्था कार्यान्वित आहेत या संस्थेचे तत्कालीन सचिव स्व. अशोकराव पाटील यांची १८ वी पुण्यतिथी आहे. यावेळी संस्थेच्या सचिव प्राचार्य रेखा तरडे हाके, कुलदीप हाके, शिवलिका हाके, प्राचार्य हरिदास, सुनंदा कुलकर्णी, कलावती भातांब्रे, लिला डबीर, दैवशाला शिंदे, आशा रोडगे, मिना तोवर, संगिता आबंदे, लक्ष्मण जेलेवाड, संतोष मुळे, गायकवाड, पनाळे राजकुमार, शेख जिलानी, राजुरे, गोदाम आदी उपस्थित होते.

### विपश्यना कर्त्यांचा सत्कार

**अहमदपूर, दि.१४ मार्च -**

प्रत्येक माणूस तान तणावाचं जीवन जगत असताना कार्यालयीन कर्मचाऱ्यांच्यावर कामाने वाढणारा मानसिक तणावा मुळे ते सुद्धा ताणतणवाचं जीवन जगत आहेत. आजचा माणूस पैसा आणि प्रसिद्धीच्या मागे लागल्यामुळे तो स्वच्छंदी जीवन विसरून गेलेला आहे. या सर्व बाबीवर रामबाण उपाय म्हणजे विपश्यना शिबिरात जाऊन दहा दिवस पंधरा दिवस किंवा वीस दिवस विपश्यना करून ताण तणाव रहित जीवनाला प्रारंभ करणे. छत्रपती शाहू राजे योगा ग्रुपचे सदस्य माधव तिगोटे, कांबळे, पांडुरंग धर्माधिकारी यांनी बालाघाट मधील गोंदिया येथील शिबिरामध्ये दहा दिवसाचं विपशना शिबिर पूर्ण केल्याने त्यांचा १२ मार्चला अहमदपूर येथील योगा मैदानावर सर्वांच्या उपस्थित होते.

# आ. अमित देशमुख व डॉ. भातांब्रे यांच्यात बंद दाराआड खलबते

## नुतन काँग्रेस जिल्हाध्यक्ष पदाबाबत चर्चा...

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.१४ मार्च -**

लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष श्रीशैल्य उटगे यांनी नुकतेच विधानसभा निवडणुकीत लातूर जिल्ह्यात झालेल्या काँग्रेस पक्षाच्या पराभवाची नैतिक जबाबदारी स्वीकारून काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सपाकाळ यांच्या कडे आपल्या ग्रामीण जिल्हाध्यक्ष पदाचा राजीनामा दिला आहे. या रिक्त झालेल्या पदासाठी काँग्रेस पक्षात मोठ्या प्रमाणात रस्सीखेच दिसून येत आहे.त्यातच आमदार अमित देशमुख हे व्यक्तिगत भेटीसाठी निलंगा विधानसभा मतदारसंघात दौऱ्यावर आले असताना निलंगा येथील डॉ.अरविंद भातांब्रे यांच्या हॉस्पिटल ला भेट दिली. त्यावेळी आमदार अमित देशमुख यांनी डॉ. अरविंद भातांब्रे यांच्याशी बंद दाराआड चर्चा केली.

नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत निलंगा विधानसभा मतदारसंघातून डॉ.अरविंद भातांब्रे यांना काँग्रेस पक्षाची उमेदवारी मिळेल अशी जोरदार चर्चा होती. डॉ. अरविंद भातांब्रे यांनी संघटनात्मक पातळीवर, वैद्यकीय व सामाजिक तसेच सहकार महर्षी दिलीपराव देशमुख व आ. अमित देशमुख यांच्या उपस्थितीत निलंगा विधानसभा मतदारसंघात विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात जनसंपर्क करून कार्यकर्त्यांचे संघटन निर्माण केले होते. परंतु ऐनवेळी काँग्रेस पक्षाकडून अभय साळुंके यांची उमेदवारी जाहीर झाली. विधानसभा निवडणुकीत डॉ. अरविंद भातांब्रे यांनी पक्षाचा निर्णय व जिल्हा स्तरावरील नेते मंडळी यांच्या आदेशाचे पालन करून कसलीही नाराजगी न दाखवता महाविकास आघाडीतील सर्वांना सोबत घेऊन काँग्रेस पक्षाचे अधिकृत उमेदवार अभय साळुंके यांचा पुर्ण ताकदीने प्रचार केला. त्यामुळे निलंगा विधानसभा मतदारसंघात अटीतटीची लढत झाल्याचे दिसून आले.

या सर्व बाबींचा विचार करता भविष्य काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूका लक्षात घेता सामान्य माणसाला मदत करणारा व कार्यकर्त्यांना वेळ देणारा, निष्कलंक चेहरा काँग्रेस पक्षाचा जिल्हाध्यक्ष करण्यासाठी नेते मंडळी कडून चाचपणी सुरू आहे. भविष्य काळात निलंगा विधानसभा मतदारसंघातून जिल्हाध्यक्षपदी डॉ. अरविंद भातांब्रे यांची निवड करून आमदार अमित देशमुख हे जातीय समीकरण व डॉ. अरविंद भातांब्रे यांच्या केलेल्या कामाची पावती म्हणून डॉ. भातांब्रे यांची जिल्हाध्यक्षपदी निवड करतील का हे पाहणे महत्त्वाचे आहे.

मात्र या दोघांमध्ये बंद दाराआड काय खलबते झाली. याबाबत निलंगा विधानसभा मतदारसंघात जोरदार चर्चा घडताना दिसत आहे.



## औसा खरेदी-विक्री संघाच्या नूतन संचालकाचा गोंद्रीत सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.१४ मार्च -**

औसा तालुका शेतकरी खरेदी विक्री संघाच्या निवडणुकीत शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख संतोष सोमवंशी यांच्या नेतृत्वाखाली बिनविरोध विजयी झालेल्या सर्व बिनविरोध विजयी झालेल्या सर्व नूतन संचालकाचा तालुक्यातील गोंद्री येथे सत्कार करण्यत आला.

क्रांतीकारी शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष राजीव कसबे, शिवसेना उपजिल्हाप्रमुख संतोष सूर्यवंशी, युवासेना जिल्हाप्रमुख दिनेश जावळे, शहरप्रमुख सुरेश भुरे, खरेदी विक्री संघाचे उपसभापती शेखर चव्हाण, बाजार समितीचे माजी उपसभापती किशोर जाधव, माजी तालुकाप्रमुख संजय उजळंबे, विधानसभा संघटक श्रीराम कुलकर्णी, अल्पसंख्याक तालुकाध्यक्ष सलीम पटेल, शिवाजी हांडे, महादेव पाटील, गणेश जाधव, हिप्परसोगा सरपंच मनोज सोमवंशी, श्रीधर साळुंके, नंदकुमार साळुंके, नवनाथ लवटे, केशव डांगे, बालाजी धुमाळ, राजेंद्र साळुंके, शाहूराज जाधव यांचा सत्कार करण्यात आला.

श्रीहरी काळे, नारायण भोसले, हंसराज लंगर, महेश लंगर, संदीपान कांबळे, सत्तार ढालाईत, विलास पाटील, विलास लंगर, हजीर ढालाईत, केशव माळी, नरहरी काळे, धनराज कदम, अमर भोसले, मुस्ताक शेख, महताब ढालाईत विठ्ठल कांबळे, उध्दव लंगर, भागवत लंगर, सुभाष लंगर यांनी पुढाकार घेतला होता.

## अमेरिकेच्या वॉशिंग्टन डिजिटल विद्यापीठाकडून माजी प्राचार्य शिवाजीराव नवरखेले यांना डॉक्टरेट पदवी प्रदान

**तभा वृत्तसेवा**
**चाकूर, दि.१४ मार्च -**

चाकूर येथील भाई किशनराव देशमुख महाविद्यालयाचे माजी प्राचार्य प्रा.शिवाजीराव बळीराम नवरखेले यांना अमेरिकेच्या वॉशिंग्टन डिजिटल विद्यापीठाने नुकतीच दिल्ली येथे १ मार्च रोजी एका कार्यक्रमात मानद डॉक्टरेट पदवीने सन्मानित केले आहे.



प्रा. शिवाजीराव नवरखेले यांच्या शैक्षणिक आणि सामाजिक कार्याची दाखल घेवून वॉशिंग्टन डिजिटल विद्यापीठाचे मानद शैक्षणिक सल्लागार डॉ. रणदिमा पथैरगे, डॉ. मुरईल रोबर्ट, बसेम हेलिस, लुईस ओबेन्ग यांनी त्यांना मानद डॉक्टरेट पदवी प्रदान केली. माजी प्राचार्य शिवाजीराव नवरखेले कुशल प्रशासक आणि इंग्रजी विषयाचे तज्ञ म्हणून ओळखले जातात.

कार्यक्रमाला भारतातील विविध विद्यापीठाचे नामवंत तज्ञ मंडळी उपस्थित होती. सध्या त्यांचे, गाव सोडून जाताना हे आत्मचरित्र आणि प्रभावी प्रशासन असे दोन पुस्तके प्रकाशनाच्या वाटेवर आहेत. डॉक्टरेट पदवी मिळाल्याबद्दल माजी प्राचार्य नवरखेले यांचे सर्वस्तरारून अभिनंदन होत आहे.

## शिवसेनेत संघटनात्मक कार्य करणाऱ्यांचा योग्य सन्मान केला जाईल : जिल्हाप्रमुख माने

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.१४ मार्च -**

राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे विविध विकास कामांच्या माध्यमातून राज्यातील जनतेला न्याय देण्याचे प्रयत्न करीत आहेत. तसेच शिवसेना वाढवण्यासाठी अहोरात्र प्रयत्न करीत आहेत. शिवसैनिक म्हणून आपणही आपल्या जिल्ह्यामध्ये शिवसेना वाढीसाठी प्रयत्नशील राहणे गरजेचं आहे, असे प्रतिपादन जिल्हाप्रमुख शिवाजी माने यांनी केले.

संघटनेची शिस्त पाळून जे पदाधिकारी व कार्यकर्ते संघटनेची बांधणी व्यवस्थित पध्दतीने करण्यासाठी मेहनत घेतील व तसेच लोकांचा विश्वास संपादन करून शिवसेना नेते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मनातली शिवसेना लातूरमध्ये रुजवण्यासाठी प्रयत्न करतील या सर्व पदाधिकाऱ्यांचा व कार्यकर्त्यांचा योग्य तो सन्मान केला जाईल, अशी ग्वाही शिवसेना जिल्हाप्रमुख शिवाजी माने यांनी दिली. लातूर जिल्ह्यातील निलंगा, देवणी, शिरूर अनंतपाळ व औसा या तालुक्यातील शिवसेनेच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक गुरुवार दि.१३ मार्च रोजी निलंगा येथे आयोजित करण्यात आली होती.

यावेळी विनोद आर्य, सुधीर पाटील, अर्चना बिरादार, विधीज्ञ वर्षा शिंदे, उषाताई जाधव, भगवान जाधव, विकास शिंदे, धनराज बिरादार, मुस्तफा शेख, विनोद धुमाळे, पप्पू भाई, सहदेव कोळपे, केदार पाटील उपस्थित होते.

## स्त्री सुरक्षिततेच्या दृष्टीने समाजाची मानसिकता बदलणे आवश्यक : डॉ. शालिनी कदम

**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.१४ मार्च -**

भारतीय संस्कृतीमध्ये स्त्रीला खूप मोठे सन्मानाचे स्थान दिलेले आहे. तसेच स्त्रीने आपल्या कर्तृत्वाने विविध क्षेत्रात अत्यंत मोलाची भरही घातली आहे. परंतु आज 'स्त्रीजन्मा ही तुझी कहाणी' असे म्हणण्याची वेळ आली आहे. स्त्रियांच्या सुरक्षिततेचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. तेव्हा स्त्रीसुरक्षा ही सर्वांची जबाबदारी असून, स्त्रीसन्मान हा प्रत्येकाचा स्वभाव बनला पाहिजे, असे मत डॉ. शालिनी कदम यांनी व्यक्त केले.



येथील विचार विकास मंडळ संचलित महात्मा गांधी महाविद्यालयामध्ये जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून महिला विशेष कक्ष अंतर्गत 'महिला सुरक्षा आणि कायदे' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना डॉ. शालिनी कदम यांनी निर्भया, पोखर्डी, बदलापूर आदी घटनांचा उल्लेख करून वर्तमानकालीन स्त्रीजीवनावर प्रकाश टाकला आणि स्त्रीसन्मान व सुरक्षिततेच्या दृष्टीने पुरूषी स्वभाव व समाजाची मानसिकता बदलणे आवश्यक असल्याचे मत प्रकट केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विचार विकास मंडळाचे अध्यक्ष अँड किशनराव बेंडकुळे हे होते. अध्यक्षस्थानी मनोगतातून त्यांनी, स्त्रियांनी चूल आणि मूल या पारंपरिक मर्यादा ओलांडून आज राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील विविध क्षेत्रात स्त्रीने घेतलेल्या भरारीचे विशेष कौतुक केले व नारीशक्तीचा गौरव केला. याप्रसंगी विचारपीठावर विचार विकास मंडळाचे सहसचिव सुरेशराव देशमुख, प्राचार्य प्रोफेसर डॉ. एस.आर. शेळके, प्रो.डॉ. अनिल कांबळे, डॉ. अनिल जाधव, प्राचार्या झेबाबेरला नादर यांची उपस्थिती होती.

प्रास्ताविक प्रो.डॉ. राजश्री भामरे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. राजेश्री जाधव यांनी केले. आणि आभार प्रा. भाग्यश्री मंगरूळकर यांनी मानले.

## वलांडीत १ कोटी १६ लाख रुपयांच्या वीजबिल वसुली; मोहिमेला वेग

**तभा वृत्तसेवा**
**वलांडी, दि.१४ मार्च -**

देवणी तालुक्यातील वलांडी येथील विद्युत वितरण कार्यालयाने १ कोटी १६ लाख रुपयांच्या चालू आणि थकीत वीजबिल वसुली मोहिमेला गती दिली आहे. वलांडी परिसरातील २६ गावांतील ५५८७ वीज ग्राहकांकडून चालू व थकबाकी वसुलीसाठी कठोर कारवाईत वीज तोडणी करण्यात येत आहे.

वलांडी येथील ३३ के.व्ही. विद्युत वितरण कार्यालय अंतर्गत २६ गावांचा समावेश असून, येथे कनिष्ठ अभियंता आणि कर्मचाऱ्यांचे निवासस्थानासह कार्यालय कार्यरत आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार कनिष्ठ अभियंता एस.डी. वंगवाड यांच्या नेतृत्वाखालील पथक गावोगावी जाऊन ग्राहकांना वीजबिल भरण्यासाठी सक्तीचे आवाहन करत आहे. समृद्धीचे विकासाचे नाते प्रकाशाचे, ग्राहक समाधान हे ध्येय महावितरणचे या धोरणांतर्गत घरगुती, व्यापारी, दुकानदार, चक्कीधारक, वेल्डिंग व्यावसायिक तसेच शासकीय आणि निमशासकीय ग्राहकांकडील वीजबिल वसुलीसाठी विशेष मोहीम राबवली जात आहे.

या मोहिमेत उपविभागीय अभियंता आर. के. लिंबोने यांच्या मार्गदर्शनाखाली कनिष्ठ अभियंता एस.डी. वंगवाड व त्यांचे सहकारी एस.जी. धनूरे, दीपक गायकवाड, विनोद येडले, विनोद इंगोले, ज्ञानेश्वर रेणुके, आर.व्ही. नाईक यांचा समावेश आहे.

## शेतीपंपाचा विद्युत पुरवठा सुरळीत करावा; अन्यथा आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.१४ मार्च -**

तालुक्यातील लिंबाळा येथे गेली चार वर्ष पासून फक्त पाच तासाच विद्युत पुरवठा केला जात आहे. शेतीपंपासाठी आठ तास विद्युत पुरवठा तात्काळ करावा अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा शिवसेना युवासेनेच्या व महिला आघाडीच्या वतीने महावितरणला देण्यात आला.

लिंबाळा गावास शेतीपंपासाठी गेली चार वर्षापासून दिवसा फक्त पाच तासच विद्युत पुरवठा केला जात आहे. लातूर जिल्ह्यातील सर्वच गावांना आठ तास पुरवठा व लिंबाळा गावाला पाचच तास विद्युत पुरवठा का? असा प्रश्न शेतकरी करत आहेत. चार वर्षापासून लिंबाळा या गावचे शेतकरी आपल्या कार्यालयास आठ तास विद्युत पुरवठा व्हावा यासाठी खेटे मारत आहेत. अद्यापपर्यंत त्यांच्यासाठी आठ तास विद्युत पुरवठा अद्याप पर्यंत केला नाही. त्याबद्दल आजपर्यंत काहीही उपाययोजना केल्या गेल्या नाहीत. महावितरणच्या अशा गलथान कारभारामुळे शेतकरी, शिवसेना, युवासेना व महिला आघाडीच्या वतीने महावितरण कार्यालयासमोर होळी पेटवण्यात आली व शासनाचा निषेध व्यक्त करण्यात आला. लिंबाळा गावातील शेतकऱ्यांसाठी दिवसा आठ तास शेतीपंपासाठी विद्युत पुरवठा करण्यात यावा अन्यथा शिवसेना व युवासेनेच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा युवासेनेचे उपजिल्हाप्रमुख प्रा. अण्णासाहेब मिरगाळे यांनी निवेदनाद्वारे मुख्य कार्यकारी अभियंता, महावितरण कार्यालय निलंगा यांना दिला आहे.

निवेदन देताना प्रा. अण्णासाहेब मिरगाळे, अनिल आरीकर, लाईकपाशा शेख, रेखा पुजारी, मंगलबाई कांबळे, दैवत सगर, मेहराजबी शेख, ज्ञानेश्वर जाधव, नारायण माने, सचिन सूर्यवंशी, दत्ता माने, बालाजी सूर्यवंशी, प्रशांत माने, विष्णू बिराजदार, कमलाकर कांबळे, बालाजी खांडेकर, संतोष फलसरी, बाळू बेस्ते इत्यादी शेतकरी उपस्थित होते.

## बेवनाळ येथील शेतकऱ्याचा टरबूज शेतीतील यशस्वी प्रयोग

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.१४ मार्च -**

शिरूर अनंतपाळ तालुक्यातील बेवनाळ येथील शेतकऱ्याने पारंपरिक शेतीला फाटा देऊन साध्य केली. मंडई बाग शेतीची किमया स्वतःच्या शेतीत पाणी उपलब्ध झाल्यानंतर बहुतेक शेतकरी ऊस हाच एक बागायती पीक म्हणून पहिली पसंती देतात. पण तालुक्यातील बेवनाळ या गावचे प्रयोगशील शेतकरी जनार्दन तातेराव पाटील यांच्याकडून मात्र नेहमीसाठी शेतीमध्ये मंडई बाग शेतीतील प्रयोग केले जातात.



कधी विस्तीर्ण अशा पद्धतीने अनेक एकारामध्ये कांदा लागवड केली जाते. तर कधी टमाट्याची लागवड असते. तर कधी अनेक एकरावरती गोबी आणि फुलकोबी अशा अनेक पद्धतीचे भाज्या वर्गीय पिकांची लागवड यांच्याकडे नेहमीच असते. यावेळेस त्यांच्याकडून ४५ गुंठ्यावरती इंडस कंपनीचे ब्लॅक सुप्रीमो या व्हरायटीच्या टरबूजाची लागवड करण्यात आलेली आहे. आणि हे लागवड केलेली टरबूज अगदी ५५ दिवसातच पाच ते सहा किलोचे नग यांच्या शेतात तयार झालेले आहेत. अशा पद्धतीचे दर्जेदार टरबुजाचे पीक परिसरात कोठेही आढळून येत नाही. पीक मात्र अनेक शेतकऱ्याकडे असेल पण पिकाची गुणवत्ता मात्र यांच्या शेतातील एक वेगळ्याच पद्धतीची दिसून येत आहे. यामुळे या ठिकाणी अनेक प्रयोगशील शेतकरी भेट देऊन या पिकाची पाहणी करून जातात यांच्या टरबुजाचे उत्पादन जवळपास ३० टन निघण्याचा अंदाज अनेक कृषी तज्ञाकडून व्यक्त केला जात आहे.

या प्रयोगशील शेतीच्या संदर्भात शेतकरी जनार्धन तातेराव पाटील यांच्याशी संवाद साधले असता यांचे मित्र व कृषी सल्लागार म्हणून बाळू तांबोळकर यांचे मार्गदर्शन आपल्या यशस्वी शेतीसाठी आजपर्यंत खूप मोलाचे ठरलेले आहे. आणि अजूनही त्यांच्याकडून आम्हाला वेळोवेळी अतिशय काळजीपूर्वक सल्ले मिळतच असतात असे यांच्याकडून कृतज्ञता पूर्ण भावना व्यक्त करण्यात आल्या हे मात्र विशेष.

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## अवैध व्यवसाय, गुन्हेगारी प्रवृत्तीला थारा देऊ नये

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. १४ मार्च -**
शहरातील अंबाजोगाई रोड परिसरात मंगळवारी सायंकाळी मद्यधुंद टोळक्याने एका तरुणाला बेदम मारहाण केल्याची घटना घडली असून, पोलिसांनी तातडीने कारवाई करत संबंधित आरोपींना अटक केली आहे. पोलिसांनी दाखवलेली ही तत्परता समाधानकारक असली तरी असे प्रकार घडूच नयेत यासाठी दक्षता घेणे आवश्यक बनले असल्याचे माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांनी म्हटले आहे.

सामाजिक, धार्मिक सलोखा राखून कायम शांत राहणारे शहर म्हणून लातूरचा राज्यात आणि देशात लौकिक आहे. त्यामुळेच शैक्षणिक, औद्योगिक, व्यापारी क्षेत्रात या शहराची प्रगती होत आहे. अलीकडच्या काळात घडलेल्या काही घटनांमुळे या लौकिकाला धक्का पोहोचत आहे. त्यामुळे लातूर शहर व जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था जिल्हा पोलीस प्रशासनाने उत्तम राखावी, अशा सूचना आमदार देशमुख यांनी नुकत्याच पार पडलेल्या जिल्हा नियोजन समिती बैठकीत दिल्या होत्या.

मंगळवारी शहरात एका तरुणाला टोळक्याकडून मारहाण झाल्याची माहिती मिळाली. कायदा मोडणाऱ्यांवर तत्काळ कडक कार्यवाही करावी, अशा सूचना पोलीस यंत्रणेला दिल्या होत्या, असे आमदार देशमुख यांनी म्हटले आहे. लातुरातील कायदा आणि सुव्यवस्था कायम राहावी, येथील शांतता भंग पावणार नाही याची दक्षता घ्यावी, आगामी काळात शहरासह जिल्ह्यात अवैध व्यवसाय चालणार नाहीत, तसा कोणी प्रयत्न केला तरी त्यावर कठोर कारवाई करावी, अशा सूचनाही देशमुख यांनी सबंधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. पालकमंत्री भोसले यांच्याशी नियोजन समिती बैठकीच्या दरम्यान जिल्ह्यातील कायदा सुव्यवस्था या संदर्भात आपण बोललो होतो असे ते म्हणाले.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

### संक्षिप्त वृत्त...

## मुक्तांगण इंग्लिश स्कुल मध्ये चिमुकल्यांची होळी साजरी

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. १४ मार्च -**
विशालनगर परिसरातील श्री साईबाबा मंदिरासमोरील मातोश्री कलावती प्रतिष्ठान संचलित मुक्तांगण इंग्लिश स्कूलमध्ये मोठया उत्साहात होळी साजरी केली.



यावेळी शाळेच्या शिक्षिका मयुरी देशमुखयांनी होळी या सणाची माहिती विद्यार्थ्यांना दिली. चांगल्या गोष्टीचा वाईट गोष्टीवर विजय हे या सणातून आपल्याला मुख्यत्वे सांगितले जाते. स्वतः मधील दुर्गुण होळीत नष्ट करून सदगुण सोबत घेऊन पुढे चालण्याची शिकवण या होळीच्या सणातून आपणास मिळतेअसे सांगितले.रांगोळी काढून त्यामध्ये एरांडाचा दांडा उभा करून त्यांच्या भोवती लाकडे गोवऱ्या रचल्या, होळीची पूजा व नारळ अर्पण करून प्रमुख पाहुणेच्या हस्ते होलिका दहन करण्यात आले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलनशाळेच्या शिक्षिकाप्रणिता सुरवसे यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेच्या सर्व शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## दयानंद विज्ञानमध्ये चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. १४ मार्च -**
येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयात महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.यावेळी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांनी आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले.
याप्रसंगी उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे,पर्यवेक्षिका डॉ.संध्या कोल्हे,कनिष्ठ लघुलेखक बन्सी कांबळे,प्रा.अनिलकुमार माळी,प्रा.कविता जाधव,प्रा. विजयकुमार मांदळे, प्रा.कविता गव्हाणे,विनोद घार,किशोर जाधव,सुदाम सातपुते, शेषराव बिराजदार,बालाजी चित्ते,पोपट बाजपाई,नरसिंग जाधव, सुदर्शन काळे यांच्यासह इतर प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## विलास सहकारी साखर कारखाना निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. १४ मार्च -**
विलास सहकारी साखर कारखाना संचालक मंडळाच्या २१ जागासाठी होत असलेल्या निवडणुकीसाठी राज्याचे माजी मंत्री आमदार, संस्थापक चेअरमन अमित विलासराव देशमुख यांच्या नेतृत्वाखालील विलासराव देशमुख सहकार पॅनलच्या २१ उमेदवाराचे अर्ज अर्ज दाखल केले आहेत. राज्याचे माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या युवा नेतृत्वात स्थापन झालेल्या विलास साखर कारखान्याने मागच्या २५ वर्षात उत्कृष्ट कार्य व व्यवस्थापनाची अनेक उच्चांक प्रस्तापीत करुन साखर कारखानदारी क्षेत्रात आदर्श निर्माण केला. यावेळी कारखान्याच्या नेतृत्वाकडून संचालक मंडळासाठी उमेदवार निवडतांना अनुभवी आणि नवख्या उमेदवारांचा उत्तमरीतीने समावेश केला आहे. आता पर्यंतच्या संचालक मंडळातील ५ जुने संचालक, ८ विदयमान संचालक तर ८ नवीन प्रतिनीधी यांचा या २१ उमेदवारात समावेश आहे.

विलासराव देशमुख सहकार पॅनलमध्ये उमेदवारी मिळालेल्या सर्व उमेदवारांनी सहकार क्षेत्रातील मान्यवर नेते व पदाधिकारी यांच्यासह लातूर जिल्हा परीषद प्रागंणातील माजी मुख्यमंत्री आदरणीय विलासराव देशमुख यांच्या पुर्णाकृती पुतळयास अभिवादन करुन लातूर येथे उपविभागीय अधिकारी तथा निवडणुक अधिकारी रोहिणी नऱ्हे विरोळे यांच्या कार्यालयात उमेदवारी अर्ज दाखल केले. अमित देशमुख, वैशाली देशमुख, लताबाई देशमुख , रविंद्र काळे, नरसिंग बुलबुले, पटेल रसुल दिलदार, पालकर तात्यासाहेब , पाटील रंजीत , मोरे गोवर्धन , शिंदे वैजनाथराव यांच्याह इतरांनी उमेदवारी अर्ज दाखल केले.

# ग्रंथालय कर्मचाऱ्यांचे प्रश्न मान्य करुन घेण्यास कटिबध्द

## आ.अभिमन्यु पवार यांनी दिली ग्वाही



**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. १४ मार्च -**
मी गतवर्षीच मुक्तेश्वरांच्या साक्षीने राज्यातील सार्वजनिक ग्रंथालयांचे पालकत्व स्विकारले आहे. म्हणून उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या नेतृत्वात सार्वजनिक ग्रंथालयांना चाळीस टक्के अनुदान वाढ,दर्जा बदल आणि नवीन ग्रंथालय मान्यता मिळण्याच्या दृष्टिने दोन बैठका लावल्या आहेत असे सांगून आज सोशल मिडीया कितीही प्रभावी दिसत असला तरी प्रिंट मिडीयाला मरण नाही. पुस्तक म्हणजे विचार आहेत ते जतन करण्याचे घराघराघरात पोहाचेविण्याचे मोलाचे काम सार्वजनिक ग्रंथालये करत आहेत. त्यात काम करणारे ग्रंथालय कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीचा मार्गी लावून घेण्यासाठी आपण सदैव कटिबध्द असल्याची ग्वाही आ. अभिमन्यु पवार यांनी येथे दिली.

लातूर जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघ आणि नागाबुवा वाचनालय, हेळंब यांच्या संयुक्त विद्यमाने,लातूर जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाचे ४० वे वार्षिक अधिवेशन गुरुवारी पार पडले. त्याच्या उद्घाटन प्रसंगी आ.पवार बोलत होते. या सत्राच्या अध्यक्षपदी महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्ष प्रा.डॉ.गजानन कोटेवार हे होते. माजी जिल्हा परिषद अध्यक्ष पंडितराव धुमाळ हे विशेष अतिथी होते तर मंचावर प्रमुख पाहुणे म्हणून थोर विचारवंत डॉ.सोमनाथ रोडे, मराठवाडा विभागाचे सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनील हुसे, जिल्हा ग्रंथालय अधिकारी वंदना काटकर देशमुख, राज्य ग्रंथालय संघाचे माजी अध्यक्ष डॉ.रामेश्वर पवार, राज्य ग्रंथालय संघाचे कार्याध्यक्ष गुलाबराव पाटील, मराठवाडा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष खंडेराव सरनाईक, कार्याध्यक्ष प्रभाकर कापसे,बीड जिल्हाध्यक्ष सुधीर चाटे अदिंची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना आ.पवार म्हणाले की, गाव तिथे ग्रंथालय ही शासनाची भूमिका आहे. ती माझीही आहे. सध्या शासनाची आर्थिक स्थिती बेताची असली तरी सार्वजनिक ग्रंथालयांच्या प्रश्नांसदर्भात शासन सकारात्मक आहे. ग्रंथालय संघाचे राज्याध्यक्ष डॉ.कोटेवार यांची ग्रंथालयाच्या प्रश्नांप्रतीची भूमिका, तळमळीची व रास्त आहे. महापुरुषांनाही संघर्ष केलाच, वाचन केल्याशिवाय ज्ञान मिळणार नाही म्हणून एमपीएस्सीचीही परीक्षा पध्दतीही डिस्क्रीप्टीव्ह करण्यात आली, त्यामुळे अभ्यासू अधिकारी मिळतील. प्राथमिक शिक्षण दर्जे दार झाले पाहिजे यावर आपला भर असून मतदार संघातील सार्वजनिक ग्रंथालयांना निधी देवू. सार्वजनिक ग्रंथालयांचे आणि कर्मचाऱ्यांच्या प्रश्नासाठी आपण योग्य वेळी, योग्य ठिकाणी सार्वजनिक ग्रंथालय संघाच्या खांद्याला खांदा लावून काम करु, कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीबाबतचा योग्य प्रस्ताव द्या. राज्याचे मुख्यमंत्री,अर्थमंत्री व उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांची भेट घेवून यात मार्ग काढू अशीही ग्वाही आ.पवार यांनी यावेळी दिली.

अध्यक्षीय समारोपात डॉ. गजानन कोटेवार यांनी सार्वजनिक ग्रंथालयांचे अनुदान वाढ,दर्जा बदल,नवीन ग्रंथालयांना मान्यता याबरोबरच ग्रंथालय कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांवर प्रकाश टाकून ग्रंथालय चळवळीला आ.अभिमन्यु पवार यांच्यामुळे न्याय मिळेल असा विश्वास व्यक्त केला.

सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनील हुसे यांनी आ.अभिमन्यु पवार यांच्यामुळे ग्रंथालय चळवळीला नवजीवन मिळाल्याचे सांगितले, जिल्हा ग्रंथालय अधिकारी वंदना काटकर यांनी पुणे येथील ग्रंथमेळ्यामध्ये प्रचंड ग्रंथ खरेदी झाल्याने वाचन संस्कृती विस्तारत असल्याचे नमुद केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे राज्य कार्योपाध्यक्ष राम मेकले यांनी केले.तर साने गुरुजी शैक्षणिक संकुलाचे प्रमुख कालिदास माने यांनी स्वागतपर तर भाषण केले.

## भविष्यातील उज्वल यशासाठी चतु:सुत्री महत्वाची

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. १४ मार्च -**
आपल्याला जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर अभ्यासातील सातत्य, वार्षिक नियोजन, नियमित वाचन व त्याचे विश्लेषण आणि योगा, प्राणायाम आणि व्यायाम या चतु:सुत्रीचा अवलंब करावा तरच आपल्याला आपल्या जीवनात यशस्विता निर्माण करता येते असे प्रतिपादन जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी यांनी बोलताना व्यक्त केले.



श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलीत महात्मा बसवेश्वर महाविद्यालय आयक्युएसी आणि महात्मा बसवेश्वर करियर अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने एमपीएससी फाउंडेशन कोर्सच्या उद्घाटन समारंभामध्ये ते उद्घाटक म्हणून बोलत होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर हे होते तर विचारमंचावर प्रमुख अतिथी म्हणून प्रसिद्ध उद्योजक राहुल मिश्रा (बिहार), प्राचार्य प्रोफेसर डॉ. संजय गवई, मुख्य समन्वयक डॉ. भास्कररेड्डी नल्ला, समन्वयक डॉ. बाळासाहेब गोडबोले आणि प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. भाऊसाहेब पुरी यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी जगतज्योती महात्मा बसवेश्वरांच्या प्रतिमेला विनम्रपणे अभिवादन करण्यात आले. पुढे बोलताना रेड्डी म्हणाले की, आपण आपल्या आई-वडिलांचे चेहरे बनले पाहिजे. यशप्राप्तीसाठी परिश्रम आवश्यक आहे. यावेळी अनेकांनी मार्गदर्शन केले.

## महाबँक कर्मचाऱ्यांचे देशभरात क्षेत्रिय कार्यालयासमोर धरणे आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. १४ मार्च -**
बँक ऑफ महाराष्ट्र मधील देशभरातील एआयबीइएचे सभासद २० मार्च रोजी एक दिवसाच्या देशव्यापी संपावर जात आहेत. हा संप प्रामुख्याने सर्व स्तरातील कर्मचाऱ्यांच्या भरतीसाठी आहे. बँकेने २०२१ मधे सफाई कर्मचारी हे पदच रद्द केले. हे काम आऊटसोर्स केले.

त्यांना किमान वेतन देखील दिले जात नाही. कायम स्वरुपी कामगारांचे फायदे जसे की रजा, मेडिकल , सुट्ट्या कांहीच मिळत नाही. या पदावर अनेक वर्षांपासून तात्पुरत्या पदावर काम करणारे हजारो कर्मचारी यामुळे रस्त्यावर आले आहेत. बँकेत ७०० शाखेतून नियमित शिपाई नेमण्यात आलेले नाहीत. बँकेत ३१८ शाखा आहेत जेथे एकही क्लार्क नेमण्यात आला नाही. १२९० शाखा आहेत जेथे केवळ एक क्लार्क आहे जो कॅश मध्ये काम करतो. यामुळे कर्मचाऱ्यांना वेळ संपली तरी जास्त वेळ बसून काम पूर्ण करून जावे लागते. सुट्टीच्या दिवशी कामावर यावे लागते. आजारपण असो की सांसारिक जबाबदाऱ्या यासाठी आवश्यकतेनुसार राजा मिळत नाही. काम आणि वैयक्तिक आयुष्य यातील समतोल बिघडला असल्याचे सांगण्यात आले.

## कृषि संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या गीतांनी लातूरकरांची मने जिंकली

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. १४ मार्च -**
राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने लातूर येथील दयानंद सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या कृषि संस्कृती महोत्सवात लोकप्रिय गायक डॉ.अभिजित कोसंबी, प्रसेनजीत कोसंबी, गायिका प्रज्ञा अन्नम, प्रणाली कदम यांनी व त्यांच्या चमूने सादर केलेल्या कृषि संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या आकर्षक गवळण, जात्यावरच्या ओव्या, भक्तीगीते, पोवाडा, लावणी, अभंग अशी एकापेक्षा एक सरस गाणी सादर करीत लातूरकरांची मने जिंकली.

यावेळी उपस्थित लातूरकरांनी देखील कलाकारांना भरभरून प्रतिसाद देत त्यांचा उत्साह वाढविला.

कृषि संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या आकर्षक मंचावर कार्यक्रमाची सुरूवात गायिका प्रज्ञा अन्नम यांनी सादर केलेल्या गणेश वंदनाने झाली. माळ्याच्या मळ्यामध्ये पाटाचं पाणी जातं...', 'ऐरणीच्या देवा तुला ठिणगी ठिणगी वाहू दे...', 'जीवा शिवाची बैलजोड...', दही दूध लोणी..... , कांदा मुळा भाजी अवघी विठाई माझी....... , दूरच्या रानात केळीच्या बनात....., अशा गाण्यांना दाद मिळाली.

## विनापरवाना जिलेटीनची वाहतूक; चालकास अटक

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. १४ मार्च -**
विहीरीमध्ये आवाज घेण्यासाठी जिलेटीनचा वापर करतात. मात्र, यासाठी पोलीस प्रशासनाची परवानगी घेणे गरजेचे असते. निलंगा तालुक्यातील पानचिंचोली येथील ट्रॅक्टर चालकाने विनापरवाना जिलेटीन, इलेक्ट्रिक डेटोनेटरची वाहतूक केल्याप्रकरणी पोलीस अधीक्षक यांच्या दहशतवाद विरोधी शाखेच्या विशेष पथकाने कारवाई करीत चालकास अटक केली.



औसा तालुक्यातील देवंग्रा शेत शिवारात एकजण ट्रॅक्टरमधून स्फोटक पदार्थांचा साठा बाळगून आहे, अशी माहिती विशेष पथकाला मिळाली होती. त्यानुसार विशेष पथकाने देवंग्रा शेत शिवारात छापा मारून संशयित ट्रॅक्टरची पाहणी केली. विनापरवाना जिलेटिन कांड्या व डेटोनेटरची वाहतूक करणाऱ्या राहुल बालाजी ढाबळे (वय ३४, रा. पानचिंचोली, ता. निलंगा) या ट्रॅक्टर चालकाला पथकातील अधिकारी-कर्मचारी यांनी ताब्यात घेतले. पुढील कार्यवाही औसा पोलीस करीत असून नमूद इसमास अटक करण्यात आली आहे. त्याच्यावर औसा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पथकातील पोलीस उपनिरीक्षक आयुब शेख यांनी फिर्याद दिली. ट्रॅक्टरचालकाकडून ९३ जिलेटिन कांड्या व ४ डेटोनेटर तसेच ट्रॅक्टर, वायर, कॉम्प्रेसिव्ह इंजन, असा १० लाख ५४ हजारांचा माल जप्त केला आहे.पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे यांचे मार्गदर्शनात पोलीस उपनिरीक्षक आयुब शेख यांच्या नेतृत्त्वात सहायक फौजदार जाधव, अंगद कोतवाड, पोलीस अंमलदार रामहरी भोसले, युसूफ शेख तसेच औसा पोलीस ठाण्याचे अंमलदार माने यांनी ही कारवाई केली.

## गरिबीची लाज न बाळगता जिद्द आणि मेहनतीने नेतृत्व सिद्ध करा

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. १४ मार्च -**
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड आणि भारत शिक्षण प्रसारक मंडळ संचलित जयक्रांती महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'विद्यापीठस्तरीय युवती नेतृत्व विकास कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.



या युवती कार्यशाळेत विद्यापीठातील विविध महाविद्यालयातून १२० मुलींनी सहभाग नोंदविला. कार्यशाळेचा समारोप समारंभ नुकताच संपन्न झाला. यावेळी अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीधर कोल्हे तर प्रमुख पाहुणे राष्ट्रवादी युवती काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष राष्ट्रीय अध्यक्षा सक्षणा सलगर यांची उपस्थिती होती यावेळी मंचावर संस्थेचे कार्यकारी संचालक व जयक्रांती ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य प्रशांत घार, शहराध्यक्ष राजा मणियार, तालुका अध्यक्ष बक्तावर बागवान, युवती शहराध्यक्ष कल्पना फरकांदे, राष्ट्रीय सेवा योजना जिल्हा समन्वयक डॉ. केशव आलगुले, कार्यक्रमाधिकारी डॉ. प्रमोद चव्हाण, स्टाफ सेक्रेटरी डॉ. संगीता घार यांचे प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी बोलताना सक्षणा सलगर म्हणाल्या की समाजात अनेक युवती गरिबीचे कारण दाखवून नेतृत्व सिद्ध करण्यापासून दूर जातात.

युवतींना आव्हान आहे की आपलं कर्तृत्व सिद्ध करण्यासाठी गरिबीचे भांडवल न करता त्यावर मात करून वेगवेगळ्या क्षेत्रात यशाच्या उंच शिखरावर आपण जावं आणि आपला नेतृत्व विकास करावा आपले दुःख पुसण्यासाठी कुणाचीही वाट न बघता, आहे त्या परिस्थितीवर मात करून मेहनत, जिद्द, कष्ट, वाचन आणि व्यासंग वाढवून आपल्या मधला नम्रपणा कधीही न ढळू देता प्रत्येक क्षेत्रात आपण आपल्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा उमटवावा. या समाजामध्ये वाट अडवणाऱ्यांची संख्या भरपूर आहे परंतु आपले व्यक्तिमत्व असे बनवा की आपल्या वाटेवर कोणीही उभा टाकण्याची हिम्मत ठेवू नये. यशाच्या उंच शिखरावर गेलेले अनेक लोक स्वतःच्या कर्तुत्वावर मोठी झालेली आहेत. जगामधील वेगवेगळ्या क्षेत्रात यशाच्या उंच शिखरावर गेलेल्या महिलांचा आदर्श घेऊन आपले व्यक्तिमत्व सिद्ध करावे अशी मत यावेळी व्यक्त केले.

प्राचार्य प्रशांत घार म्हणाले की आपल्या बोलण्यामधून, वागण्यामधून आपल्या नेतृत्वाला नाव ठेवण्याची संधी कोणाला देऊ नका, आई-वडिलांचा आदर करा त्यांच्या विश्वासाला तडा जाऊ देऊ नका, युवतीनी मोबाईलचा वापर साधन म्हणून करावा, मोबाईल हा आपले मनोरंजन करू शकतो परंतु दुःख पुसण्याचे काम करू शकत नाही. वेगवेगळ्या क्षेत्रात तुम्हाला यश मिळवायचे असेल तर कॉपी-पेस्ट प्रवृत्ती दूर ठेवून स्वतःमध्ये नवनिर्माणाची क्षमता विकसित करावी असे आवाहन यावेळी केले.

अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. श्रीधर कोल्हे म्हणाले की, यशाच्या उंच शिखरावर गेलेले ९०% लोक हे प्रामाणिकपणा आणि कष्टाच्या बळावर मोठी झालेली आहेत. ज्याच्यामध्ये आकाशाला गवसणी घालण्याची धमक आहे त्याचे व्यक्तिमत्व सिद्ध करण्यात कुणीही अडथळा आणू शकत नाही. भारतीय संविधानाणे सर्वांना समान अधिकार दिलेले आहेत.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. प्रमोद चव्हाण, सूत्रसंचालन डॉ. केशव आलगुले आभार प्रा. प्रज्ञा कांबळे यांनी मानले. यावेळी अनेकांनी उपस्थिती होती.

## सात कलमी कृती कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करावी :जिल्हाधिकारी

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. १४ मार्च -**
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी क्षेत्रीय कार्यालयांना दिलेल्या शंभर दिवसांच्या सात कलमी कार्यक्रमाची जिल्ह्यातील सर्व तालुका व जिल्हास्तरीय कार्यालयांनी प्रभावी अंमलबजावणी करावी. या कामाचे मूल्यमापन करण्यात येणार असून त्यादृष्टीने सर्व कार्यालय प्रमुखांनी केलेल्या कामकाजाचा अहवाल तयार करणे आवश्यक असल्याचे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे म्हणाल्या.



शंभर दिवसीय कार्यक्रमाच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी आयोजित सर्व जिल्हा व तालुकास्तरीय अधिकाऱ्यांच्या बैठकीत जिल्हाधिकारी बोलत होत्या. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपजिल्हाधिकारी संदीप कुलकर्णी, जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी यांच्यासह विविध विभागांचे विभागीय, जिल्हास्तरीय अधिकारी यावेळी उपस्थित होते. तसेच तालुकास्तरीय अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

शंभर दिवसांच्या सात कलमी कृती कार्यक्रमात जिल्ह्यातील प्रत्येक जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय कार्यालयाचा सहभाग आवश्यक आहे.

या उपक्रमात दुसऱ्या टप्प्यात सहभागी झालेल्या कार्यालयांनी ३० एप्रिलपर्यंत सात कलमी कृती कार्यक्रमाची अंमलबजावणी करून २ मे रोजी त्याबाबतचा अहवाल सादर करावा. कार्यालयातील अभिलेखांचे वर्गीकरण, कार्यालय व परिसराची स्वच्छता, क्षेत्रीय भेटी आदी बाबींवर विशेष लक्ष द्यावे, असे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे म्हणाल्या.

प्रत्येक कार्यालयात दिशादर्शक फलक, नागरिक व कर्मचाऱ्यांसाठी पिण्याचे स्वच्छ पाणी, सूचना पेटी, त्या कार्यालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांचे माहिती फलक आदी बाबी कार्यालयात असाव्यात. तसेच स्वच्छतेला प्राधान्य दिले जावे, असे जिल्हाधिकारी म्हणाल्या. तसेच पुढील आठवड्यापासून अचानक विविध कार्यालयांना भेटी देवून तेथील कामकाजाचा आढावा घेणार असल्याचे त्यांनी सांगितले.

सात कलमी कृती कार्यक्रम अंतर्गत समाविष्ट बाबी आणि त्याअनुषंगाने करण्यात आलेल्या कार्यवाहीचा जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांनी यावेळी आढावा घेतला.